हॅलो परभणी
लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. २० जून २०१७ २

म.शि.प्र. मंडळाचे

# श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

## पाहिजेत थेट मुलाखत (Walk in Interview)

संदर्भ :- मा. विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड यांचे नाहरकत प्रमाणपत्र
१. जा.क्र. विशिसंस/उशि/नांवि/अनु-२/सीएचबी/२०१७-१८ २८१८ दि. १५.०६.२०१७

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता खालील विषयासाठी तात्पुरत्या स्वरुपात घड्याळी तासिकेप्रमाणे अधिव्याख्यातांची खालील पदे भरणे आहेत.**

### अ. वरीष्ठ विभाग :

| | |
|---|---|
| **अनुदानीत : (पदवी)** | ऊर्दू (२), इंग्रजी (४), अर्थशास्त्र (२), शारीरिक शिक्षण (३), संगीत (७), संगणकशास्त्र (३), भौतिकशास्त्र (२) रसायनशास्त्र (४), वनस्पतीशास्त्र (२), वाणिज्य (४), लोकप्रशासन (२), समाजशास्त्र (३) |
| **विनाअनुदानित : (पदवी)** | बी.बी.ए. (४), बी.सी.ए. (२), बी.एस्सी. सी. एस (२), भुगोल (१) |
| **कायम विनाअनुदानित: पदव्युत्तर** | इंग्रजी (२), राज्यशास्त्र (२), समाजशास्त्र (२), इतिहास (२), वाणिज्य (२), भौतिकशास्त्र (२), वनस्पतीशास्त्र (२), प्राणीशास्त्र (२), रसायनशास्त्र (२), सुक्ष्मजीवशास्त्र (२), संगणकशास्त्र (२) |
| **शैक्षणिक अर्हता :** | चांगली शैक्षणिक कारकीर्द (Good Academic Record) व पदव्युंत्तर परिक्षेत किमान ५५ टक्के (मागासवर्गीयांसाठी ५० टक्के गुण) आणि नेट/सेट/पीएच.डी. आरक्षण शासकीय नियमाप्रमाणे राहील. |

### ब. कनिष्ठ विभाग व एच.एस.सी. व्होकेशनल (एम.सी.व्ही.सी)

| | |
|---|---|
| **१. कनिष्ठ :** | इंग्रजी (२), जीवशास्त्र (२), मानसशास्त्र (१), भौतिकशास्त्र (१), रसायनशास्त्र (२), वाणिज्य (२), पाली (१), इलेक्ट्रॉनिक्स (२), संगणकशास्त्र (२) पीकशास्त्र (२), इतिहास (१) |
| **२. एमसीव्हीसी:** | अकाऊटींग ॲण्ड ऑडीटींग : (अकौंटींग फायनानशिअल ऑडीट मॅनेजमेंट) शिक्षक (१) व निदेशक (१).<br>हॉर्टीकल्चर : शिक्षक (१), बेकरी ॲन्ड कन्फेक्शनरी (फुड टेक्नॉलॉजी) शिक्षक ०१ |

**शैक्षणिक अर्हता :** शैक्षणिक अर्हता व आरक्षण शासकीय नियमाप्रमाणे राहील.

**(क) महिला वार्डन : पदसंख्या (१)** (महाविद्यालयातील विद्यार्थिनी वसतीगृहासाठी तात्पुरत्या स्वरुपात एकत्रीत मानधन तत्वावर)
**अर्हता :** पदवीधर व शिस्तप्रिय महिलेस प्राधान्य

**मुलाखत दिनांक : वरिष्ठ विभाग (अ) : दि. २८-६-२०१७ (बुधवार) सकाळी १०.०० वा.**
**उर्वरित पदांसाठी (ब व क) : दि. २९.०६.२०१७ (गुरुवार) सकाळी १०.०० वा.**

| | | | |
|---|---|---|---|
| **मा.श्री. प्रकाशराव सोळंके** | **मा.आ.श्री. सतीशराव चव्हाण** | **मा.श्री. हेमंतराव जामकर** | **डॉ. बी.यू. जाधव** |
| अध्यक्ष | सरचिटणीस | प्रमुख स्था.सं.स. | प्राचार्य |

म.शि.प्र. मंडळ, औरंगाबाद — श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

सकाळ
नांदेड, मंगळवार
२७ जून २०१७
४
TODAY परभणी

# चित्रपट समृद्ध करण्याचे माध्यम : देशमुख

**परभणी, ता. २६ (बातमीदार) :** चित्रपट हे मानवी मनाला समृद्ध करण्याचे माध्यम आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय पुरस्कार विजेते लघुपट दिग्दर्शक अमोल देशमुख यांनी रविवारी (ता. २५) केले.

कैझन पिक्चर्स परभणी, अरभाट फिल्म क्लब पुणे व श्री शिवाजी महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने व श्रीराम बाग अ‍ॅग्रो मेडिकल टुरिझम फन पार्क यांच्या सहयोगाने आयोजित परभणी फिल्म क्लबचा चित्रपट रसास्वाद या कार्यक्रमात ते मार्गदर्शन करीत होते. श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात रविवारी (ता. २५) हा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव, डॉ. संजय टाकळकर, दिग्दर्शक अमोल देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात दिग्दर्शक अमोल देशमुख यांचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त लघुपट औषध दाखविण्यात आला. त्यानंतर अमोल देशमुख यांनी प्रत्येक शॉटची माहिती, त्यामागील दिग्दर्शकाचा विचार, स्थळ, काळ, प्रकाश योजना, ध्वनी संयोजना आदी बाबी बदल सखोल माहिती देत चित्रपट कसा पहावा याचे विवेचन केले. प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव, डॉ. संजय टाकळकर, अमोल देशमुख व परभणी फिल्म क्लबचे रवी पाठक यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. रवी पाठक यांनी आपल्या प्रास्ताविकात परभणी फिल्म क्लबचे स्वरूप, उद्देश व संकल्पना स्पष्ट करून रसिक प्रेक्षकांनी या क्लबमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन केले. त्र्यंबक वडसकर यांनी सूत्रसंचालन केले. नागेश कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचर करून दिला. सिद्धार्थ मस्के यांनी आभार मानले.



**परभणी : फिल्म क्लबच्या वतीने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन रविवारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते झाले.**

पुण्य नगरी
बुधवार, १२ ... २०१७

# लोकसंख्या दिनानिमित्त भित्तीपत्रकाचे विमोचन

परभणी / प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात लोकसंख्याविषयी माहिती देणाऱ्या 'लोकसंख्येचा भस्मासूर' या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. प्राचार्य डॉ. बी.यू.जाधव, अॅड.स्वराजसिंह परिहार, उपप्राचार्य डॉ.एस.एन.केशेट्टी, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.टी.आर.फिसफिसे, व्ही.एम.सूर्यवंशी, अल्का शेटे यांच्या उपस्थितीत भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. भित्तीपत्रकाचे संपादन भरत लाड, संतोष शितळे, मीना ढगे या विद्यार्थ्यांनी केले.



परभणी शहरातील शिवाजी महाविद्यालयात लोकमतने सुरु केलेल्या 'स्पर्धेच्या जगात' या सदराचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगीच्या छायाचित्रात पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड, प्राचार्य बाळासाहेब जाधव, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. सुधीर इंगळे, लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी अभिमन्यू कांबळे, व्यवस्थापक मोहन शिंदे, रामानंद व्यवहारे,डॉ. जयंत बोबडे आदी.



जिंतूर येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात लोकमतच्या स्पर्धेच्या जगात या सदराचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगीचे छायाचित्र.



सोनपेठ येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयात लोकमतच्या स्पर्धेच्या जगात या सदराचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगीचे छायाचित्र.

**'लोकमत'चा उपक्रम : विद्यार्थ्यांनी केले जोरदार स्वागत; जिल्हाभरातील विविध महाविद्यालयांमध्ये झाले कार्यक्रम**

# 'स्पर्धेच्या जगात' सदर ठरेल युवकांसाठी मार्गदर्शक

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : आजच्या काळातील स्पर्धा परिक्षेचे महत्त्व ओळखून 'लोकमत'च्या वतीने सुरु करण्यात आलेल्या 'स्पर्धेच्या जगात' या सदराचे बुधवारी जिल्ह्यातील विविध भागांमध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी जोरदार स्वागत केले आहे. अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांसाठी हे सदर उत्कृष्ट मार्गदर्शक ठरेल, अशा प्रतिक्रिया विद्यार्थ्यांसह मान्यवरांनी यानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केल्या.

'लोकमत'च्या वतीने २६ जुलैपासून 'स्पर्धेच्या जगात' हे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकांसाठी सदर सुरु करण्यात आले आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध मान्यवरांनी तसेच विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त करून 'लोकमत'ने सुरु केलेल्या या सदराविषयी आभार व्यक्त केले.

**◆ स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी उपयुक्त- घोरबांड**

परभणी येथील शिवाजी महाविद्यालयात यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड म्हणाले की, 'लोकमत'ने सुरु केलेले हे सदर स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त आहे. पुण्यामध्ये स्पर्धा परीक्षेची मिळणारी माहिती परभणीत 'लोकमत'ने देऊन विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवेत जाण्याचा मार्ग दाखविला आहे. याचा विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार असून विद्यार्थ्यांनीही या सदराचे नियमित वाचन करून स्पर्धा परीक्षेत यश मिळवावे. यश मिळविण्यासाठी शॉर्टकट मार्ग नसतो. त्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागते. जिद्द, चिकाटी अंगी बाळगावी लागते. विद्यार्थ्यांनीही या दृष्टीकोनातून प्रयत्न करावे व स्पर्धा परीक्षेत यश मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना प्राचार्य बाळासाहेब जाधव म्हणाले की, स्पर्धा परीक्षेचे सत्र सुरु करण्याचा मानस महाविद्यालयाचा आहे. त्यातच लोकमतच्या 'स्पर्धेच्या जगात' या सदराने मोठी भर पडणार आहे. परभणीकरांसाठी लोकमतने सुरु केलेले हे सदर एक पर्वणी ठरणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनीही 'स्पर्धेच्या जगात' या सदराचे दररोज वाचन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. सुधीर इंगळे, डॉ. जयंत बोबडे, प्रा.डॉ. श्रीदेवी कडगे, प्रा.डॉ. वैशाली फुके, प्रा. वैशाली भोसले, श्वेता गिरी, समरीन फिरदोस, 'लोकमत'चे व्यवस्थापक मोहन शिंदे यांची उपस्थिती होती. 'लोकमत'चे जिल्हा प्रतिनिधी अभिमन्यू कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी सूत्रसंचालन तर प्रा.डॉ. रामानंद व्यवहारे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**◆ गंगाखेडमध्ये विद्यार्थ्यांचा प्रतिसाद**

लोकमत व द युनिक अकॅडमीच्या वतीने २६ जुलैपासून स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त अशी लेखमाला सुरु करण्यात आल्याने विद्यार्थी व युवकांनी 'लोकमत'च्या अंकाचे जोरदार स्वागत केले. शहरातील श्री संत जनाबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. बजरंग धूत, उपप्राचार्य प्रा. दयानंद उजळंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'लोकमत'च्या अंकाचे विमोचन करण्यात आले. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरूण विद्यार्थ्यांना 'लोकमत'च्या लेखमालेचा मोठा फायदा होईल, असे यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. बजरंग धूत यांनी सांगितले. यावेळी प्रा.डॉ. यु.आर. आघाव, प्रा. डॉ. संजीव कोळपे, प्रा. मधुकर घुगे, प्रा. संतोष गायकवाड, प्रा.डी.बी. चव्हाण, प्रा. राजू भालेराव, प्रा.एन.आर. भेंडेकर, प्रा. संजय क्षीरसागर, प्रा. विश्वराज चिमनगुंडे, प्रा.एस.बी. कणव, प्रा. लटपटे, मधुकर भारती, उत्तम आवंके, सिद्धार्थ भालेराव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोनपेठात : स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन

सोनपेठ- येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयात 'लोकमत'मधील स्पर्धा परीक्षा लेखमालेच विमोचन व मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन २६ जुलै रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वसंत सातपुते होते. लोकमत व युनिक अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने २६ जुलैपासून स्पर्धा परीक्षेची लेखमाला सुरु करण्यात आली आहे. या लेखमालेच विमोचन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयात करण्यात आले. प्रा.डॉ. संतोष रणखांब यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा.डॉ. आंबादास बरवे, प्रा.डॉ. सुनिता टेंगसे, प्रा. डॉ. मुकुंदराज पाटील, प्रा. डॉ. मारोती कच्छवे, प्रा. सखाराम कदम, प्रा. पंडीत जौंधळे, प्रा. डॉ. मोहन मिसाळ, प्रा. अनंत सरकाळे, प्रा. रोहिणी भाग्यवंत, प्रा. विठ्ठल मुलगीर, प्रा. अनंत फाजगे, तुळशीराम गांगर्डे यांच्या प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ
नांदेड, सोमवार
७ ऑगस्ट २०१७
४
TODAY
परभणी

# आंतर महाविद्यालयीन 'ड' झोन बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन



**परभणीः शिवाजी महाविद्यालयात बॅडमिंटन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी हेमंतराव जामकर, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. चंद्रकांत सातपुते आदी.**

**परभणी, ता. ६ (बातमीदार)** : शिवाजी महाविद्यालयात रविवारी (ता. सहा) आंतर महाविद्यालयीन 'ड' झोन बॅडमिंटन स्पर्धेचे रविवारी (ता. सहा) उद्घाटन झाले.

या वेळी स्थानिक मंडळ प्रमुख हेमंतराव जामकर, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. चंद्रकांत सातपुते, डॉ. तिवारी प्रमुख पाहुणे होते. डॉ. विनोद गणाचार्य, डॉ. गुरुदास लोकरे, डॉ. पंडित, डॉ. अभिजित सरनाईक, प्रा. हेमंत शिंदे, डॉ. तुकाराम फिसफिसे, डॉ. साहेबराव देवकते उपस्थित होते. १५ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला. क्रीडा विभागप्रमुख प्रा. संतोष कोकीळ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राजू रेंगे यांनी आभार मानले.

देशोन्नती परभणी -गुरूवार , दि १३ / जुलै २०१७

# श्री शिवाजी महाविद्यालयात भित्तीपत्रकाचे विमोचन

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने लोकसंख्या दिनानिमित्त लोकसंख्या विषयक माहिती देणाऱ्या लोकसंख्येचा भस्मासुर या भित्तीपत्रकाचे विमोचन प्राचार्य डॉ.बी.यु. जाधव यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य ॲड. स्वराजसिंह परिहार, उपप्राचार्य डॉ.एस.एन. केशेट्टी, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. टि.आर. फिसफिसे, प्रा.व्ही.एम. सुर्यवंशी, प्रा.सौ. अलका शेटे यांची उपस्थिती होती. भित्तीपत्रकाचे संपादन भरत लाड, संतोष शितळे, मिना ढगे या बीए तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले.

सकाळ
नांदेड, गुरुवार
१३ जुलै २०१७
३

# TODAY परभणी

## अवतीभवती



परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयात लोकसंख्या दिनानिमित्त मंगळवारी भित्तीपत्रकाचे विमोचन करताना प्राचार्य डॉ. बी. यु. जाधव, ॲड. स्वराजसिंह परिहार, डॉ. एस. एन. केशेट्टी, प्रा. डॉ. टी. आर फिसफिसे.

## श्री शिवाजी महाविद्यालतया भित्तीपत्रकाचे विमोचन

देशोन्नती परभणी बुधवार, दि १२/ जुलै २०१७



परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये समाजशास्त्र विभागाच्या वतीने लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने लोकसंख्येचा भस्मासुर या भित्तीपत्रकाचे विमोचन प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव यांच्याहस्ते करण्यात आले. या प्रसंगी ॲड. स्वराजसिंह परिहार, उपप्राचार्य डॉ. एस.एन. केशेट्टी, प्रा.डॉ. टि.आर. फिसफिसे, प्रा.व्ही.एम. सुर्यवंशी, प्रा. सौ. अलका शेटे व विद्यार्थी दिसत आहेत.

सपर्थ दिलासा
गुरुवार, २० जुले २०१७, पान क्र. ३

# शिवाजी महाविद्यालयात सीबीसीएस पद्धतीवर चर्चासत्र

परभणी, दि.१९ (प्रतिनिधी): येथील श्री शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी (२१ जुलै) सीबीसीएस पद्धतीवर जिल्हास्तरीय एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले असून त्याचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडीत विद्यासागर यांच्याहस्ते होणार आहे.

विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र या विद्या शाखांतील पदवीस्तरावरील द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सीबीसीएस पॅटर्न लागू करण्यात आला असुन या संकल्पनेबाबत तसेच अभ्यासक्रम, रचना, वेळापत्रक, गुणवर्ग पद्धती, ग्रेड पद्धती इत्यादी विषयी महाविद्यालयीन शिक्षकांचे उद्बोधन व्हावे म्हणून या चर्चासत्राचे विद्यापीठ व शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले असल्याची माहिती स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंत जामकर यांनी दिली.

कुलगुरु डॉ.पंडीत विद्यासागर यांच्या बीजभाषणानंतर या चर्चासत्रात प्रभारी कुलगुरु डॉ.जी. एन.शिंदे, अधिव्याख्याता डॉ. वामनराव जाधव, प्राचार्य डॉ. व्ही. के.भोसले, प्राचार्य डॉ.जे.एम. बिसने, सहयोगी अधिष्ठाता डॉ.जी. एस. गट्टाणी, डॉ. वाणी लातूरकर, प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर घोडगे हे विद्या शाखानिहाय मार्गदर्शन व शंका निरसन करणार आहेत. या चर्चासत्राचा समारोप सायंकाळी ४.३० वाजता प्र.कुलगुरु डॉ.जी. एन.शिंदे व प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, संयोजक डॉ.रोहिदास नितोंडे, प्रबंधक विजय मोरे, उपप्राचार्या डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर यांनी दिली.

परभणी / बुधवार दि १९ जुलै २०१७ देशोन्नती

# श्री शिवाजीत एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन

शहर प्रतिनिधी / १८ जुलै

परभणी : वसमत रोडवरील श्री शिवाजी महाविद्यालयात शुक्रवार २१ जुलै रोजी सीबीसीएस पध्दतीवर एक दिवसीय जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आली आहे.

या चर्चासत्राचे उद्घाटन स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर राहणार आहेत. स्वारातीम विद्यापीठाच्या विद्याशाखेच्या पदवीस्तरावरील द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमांना २०१७-१८ पासून Choice based credit system (CBCS) पॅटर्न लागू केला आहे.

याबाबतची संकल्पना अभ्यासक्रम, रचना, वेळापत्रक, गुणवर्ग पध्दती, ग्रेड पध्दती, अध्यापन पध्दती याबाबत महाविद्यालयीन शिक्षकांचे उदबोधन होण्याकरीता चर्चासत्र आयोजीत करण्यात आले आहे. या चर्चासत्रात डॉ. जी. एन. शिंदे, डॉ. वामनराव जाधव, प्राचार्य डॉ. व्हि. के. भोसले, प्राचार्य डॉ. जे. एम. भीसे, डॉ. जी. एस. गट्टांनी, डॉ. वाणी लातूरकर, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर घोडगे मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी साडेचार वाजता चर्चासत्राचा समारोप होणार आहे. समारोपाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव तर प्रमुख प्रमुख पाहुणे म्हणून प्र - कुलगुरु डॉ. जी. एन. शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे. या चर्चासत्रात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक डॉ. रोहिदास नितोंडे, विजय मोरे, उपप्राचार्य डॉ. श्रिनीवास केंद्रेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर यांनी केले आहे.

दैनिक समर्थ

# दिलासा

शनिवार, दि.२२ जूलै २०१७

## चॉईस बेसड् क्रेडीट सिस्टीम प्राध्यापकांनी राबवावी-डॉ.विद्यासागर

परभणी, दि.२१ (प्रतिनिधी): विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्राध्यापकांनी चॉईस बेसड् क्रेडीट सिस्टीमचा स्विकार करून ती व्यवस्थीतरित्या राबवावी असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडीत विद्यासागर यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे श्री शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी आयोजित 'सीबीसीएस' या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरु डॉ.विद्यासागर बोलत होते. महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर अध्यक्षस्थानी होते. डॉ.वामनराव जाधव, डॉ.जोगेंद्रसिंग बिसने, डॉ.वसंत भोसले, केशव दुधाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.रोहिदास नितोंडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ.विद्यासागर म्हणाले, उच्च शिक्षणामध्ये नवनवीन बाबी येत आहेत. अध्ययन आणि अध्यापनामध्ये मोठे बदल होत असून ते आपण विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी स्विकारले पाहिजेत. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास अपेक्षित आहे. त्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा



विद्यापीठाने चॉईस बेसड् क्रेडीट सिस्टीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी प्राध्यापकांनी आपल्यामधील विद्यार्थी जागृत करून अध्ययन अध्यापन करावे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवून कौशल्य निर्माण करावे.

श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य व चर्चासत्राचे संयोजक डॉ.बाळासाहेब जाधव यांनी सर्वांचे स्वागत केल. अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे प्रमुख डॉ.रोहिदास नितोंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.रविशंकर झिंगरे यांनी सुत्रसंचलन, तर प्रबंधक विजय मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

दिलासा

शनिवार, २२ जुलै २०१७,

# शेतकऱ्यांची सामूहिक चळवळ व्हावी-आ.बच्चू कडू



परभणी, दि.२१ (प्रतिनिधी): शेतकऱ्यांना कर्जमाफी केली असली तरी त्यात घोळच अधिक असून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी झाल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नसल्याचे सुतोवाच करीत सरकारच्या नकारात्मक भूमिकेमुळेच शेतकरी देशोधडीला लागला आहे. यासाठी आसूड यात्रेचे प्रयोजन पूर्णत्वाला नेण्यासाठी ही सामुहीक चळवळ व्हावी, असे आवाहन आ.बच्चू कडू यांनी येथे केले.

येथील शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात (कै.) बापूसाहेब जामकर स्मृती निमित्त व्याख्यानात शेतकऱ्यांची कर्जमाफी या विषयावर आ.कडू बोलत होते. याप्रसंगी हेमंतराव जामकर, अड.बाळासाहेब जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्राचार्य डॉ.वसंत भोसले, संग्राम जामकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आ.बच्चू कडू यांचा गौरव मानपत्रासह करण्यात आला. मानपत्राचे वाचन प्रा.अरुण पडघन यांनी केले.

आ.कडू म्हणाले, शेतकर्यांच्या होणाऱ्या आत्महत्या ही आत्महत्या नसून नियोजनबद्धरीत्या वाटचालीतून सरकारकडून होणारी अप्रत्यक्षरीत्या हत्याच आहे. गेल्या कित्येक वर्षात शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्याची खंत व्यक्त करीत प्रत्येक माणसाने आपल्या शेतकरी बापाच्या समस्या समजून घेवून त्या सोडविण्याकामी योगदान द्यावे. स्वामीनाथन आयोगाच्या अंमलबजावणीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहीजेत. ही केवळ शासनाचीच जबाबदारी नसून ती सामुहीक जबाबदारी असल्याचे भान जंनमाणसात निर्माण व्हावे, असेही आवाहन आ.कडू यांनी यावेळी केले. शेतीमालाला रास्त भाव नसल्याने शेतकरी देशोधडीला लागला असून ही वेळ आपणा सर्वांच्या नकारात्मकतेमुळेच आल्याचे मतही आ.कडू यांनी व्यक्त केले. सूत्रसंचलन प्रा.रामप्रसाद देशमुख यांनी केले.

सकाळ
नांदेड, शनिवार
२२ जुलै २०१७
२
परभणी



परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित चर्चासत्राचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते करण्यात आले.

# चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम राबवावी

**परभणी, ता. २१ (बातमीदार):** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राध्यापकांनी चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीमचा स्वीकार करून ती व्यवस्थितरीत्या राबवावी, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विद्यासागर यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने शुक्रवारी (ता. २०) आयोजित 'सीबीसीएस' या विषयावरील चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. विद्यासागर बोलत होते. स्थानिक नियोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर अध्यक्षस्थानी होते. डॉ. वामनराव जाधव, डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, डॉ. वसंत भोसले, केशव दुधाटे, प्राचार्या डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. रोहिदास नितोंडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. डॉ. विद्यासागर म्हणाले, उच्च शिक्षणामध्ये नवनवीन बाबी येत आहेत. अध्ययन आणि अध्यापनामध्ये मोठे बदल होत असून ते आपण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वीकारले पाहिजेत. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास अपेक्षित आहे. त्यासाठी नांदेड विद्यापीठाने चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी प्राध्यापकांनी आपल्यातील विद्यार्थी जागृत करून अध्ययन अध्यापन करावे. हा उपक्रम राबविणारे नांदेड विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ असल्याचे ते म्हणाले.

शनिवार,२२ जुलै २०१७

# परभणी Next

एकमत

# विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसीत करा : कुलगुरु डॉ. विद्यासागर

**परभणी : प्रतिनिधी**

अध्ययन आणि अध्यापन यात मोठे बदल होत असुन उच्च शिक्षणाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास अपेक्षीत आहे त्यासाठी स्वारातिम ने चॉईस बेसड क्रेडीट सिस्टीम प्राध्यापकांनी राबवावी असे आवाहन कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर यांनी केले.

स्वारातिमच्या वतीने शिवाजी महाविद्यालयात सीबीसीएस या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरु बोलत होते. या वेळी हेमंत जामकर हे अध्यक्षस्थानी होते. वामनराव जाधव, जोगेंद्रसिंह बिसेन, वसंत भोसले, केशव दुधाटे, प्राचार्य बाळासाहेब जाधव, रोहिदास नितोंडे आदी उपस्थित होते. या वेळी मार्गदर्शन करतांना डॉ. विद्यासागर पुढे म्हणाले उच्च शिक्षणामध्ये नवनवीन बाबी येत आहेत. त्यासाठी प्राध्यापकांनी आपल्या मधील विद्यार्थी जागृत करुन अध्ययन व अध्यापन करावे, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवुन कौशल्य निर्माण करावे. संपुर्ण देश कौशल्य विकासाकडे झेपावत असतांना विद्यापीठाने १०३ कोर्सेस तयार केले आहेत. यात प्राध्यापकांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. संयोजक डॉ. बाळासाहेब जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आभार प्रबंधक विजय मोरे यांनी केले. सुत्रसंचलन झिंगरे यांनी केले.

दि.२२ जुलै २०१७

गोदातीर समाचार

# चॉइस बेस्ड क्रेडीट सिस्टीम प्राध्यापकांनी राबवावी-डॉ.विद्यासागर

परभणी/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राध्यापकांनी चॉइस बेस्ड क्रेडीट सिस्टीमचा स्वीकार करुन ती व्यवस्थितरित्या राबवावी असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडीत विद्यासागर यांनी केले आहे.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे श्री शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी आयोजित 'सीबीसीएस' या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरु डॉ.विद्यासागर बोलत होते. श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर अध्यक्षस्थानी होते. डॉ.वामनराव जाधव, डॉ.जोगेंद्रसिंग बीसेन, डॉ.वसंत भोसले, केशव दुधाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.रोहिदास नितोंडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.विद्यासागर म्हणाले, उच्च शिक्षणामध्ये नवनवीन बाबी येत आहेत. अध्ययन आणि अध्यापनामध्ये मोठे बदल होत असून ते आपण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वीकारले पाहिजेत. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास अपेक्षीत आहे. त्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने चॉइस बेसड क्रेडीट सिस्टीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी प्राध्यापकांनी आपल्यामधील विद्यार्थी जागृत करुन अध्ययन अध्यापन करावे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवून कौशल्य निर्माण करावे.

विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकासासाठी प्रथम प्राध्यापकांमधील कौशल्य विकासाचा नियोजनबद्ध कार्यक्रम यशस्वीपणे राबविणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ भारतातील पहिले विद्यापीठ असल्याचा अभिमानाने उल्लेख करुन कुलगुरु डॉ.विद्यासागर म्हणाले, संपूर्ण देश कौशल्य विकासाकडे झेपावत असताना विद्यापीठाने १०३ कोर्सेस तयार केलेले आहेत. ते राबवून विद्यार्थ्यांना विविध नोकऱ्या, रोजगार उपलब्ध करवून द्यायच्या आहेत. शिक्षणाचा उपयोग विद्यार्थ्यांचे आयुष्य उभारणीसाठीच नव्हे तर विकासासाठी झाला पाहिजे. यामध्ये प्राध्यापकांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. यासाठी सर्वांना पुढे येण्याचे आवाहन कुलगुरु डॉ.विद्यासागर यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य व चर्चासत्राचे संयोजक डॉ.बाळासाहेब जाधव यांनी सर्वांचे स्वागत केले. अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे प्रमुख डॉ.रोहिदास नितोंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.रविशंकर झिंगरे यांनी सूत्रसंचलन तर प्रबंधक श्री विजय मोरे यांनी उपस्थितांचे आभारमानले. चर्चासत्रात परभणी, हिंगोली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक सहभागी झाले होते.

लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि.२२ जुलै २०१७ २

उत्तम बोरसुरीकर



**दीपप्रज्ज्वलन:** परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात कै. बापूसाहेब जामकर स्मृती व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्ज्वलन करताना आ.बच्चू कडू. समवेत हेमंतराव जामकर, ॲड.बाळासाहेब जामकर, प्राचार्य.डॉ.बी.यु. जाधव, प्राचार्य डॉ.वसंत भोसले.

# स्वामीनाथन आयोगाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करा

## जामकर स्मृती व्याख्यानमाला : बच्चू कडू यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** सध्या शेतकऱ्यांची होणारी आत्महत्या ही आत्महत्या नसून नियोजनबद्धरित्या वाटचालीतून सरकारकडून होणारी अप्रत्यक्षरीत्या हत्याच होय, असा आरोप करीत शेतकऱ्यांना अनेक वर्षांपासून न्याय मिळत नाही. प्रत्येकाने शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी स्वामीनाथन आयोगाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रहार शेतकरी संघटनेचे संस्थापक तथा आ.बच्चू कडू यांनी केले.

परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात कै. बापूसाहेब जामकर स्मृतीनिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमप्रसंगी 'शेतकऱ्यांची कर्जमाफी' या विषयावर ते बोलत होते.

यावेळी हेमंतराव जामकर, ॲड.बाळासाहेब जामकर, प्राचार्य डॉ.बी.यु. जाधव, प्राचार्य डॉ.वसंत भोसले, संग्राम जामकर आदींची उपस्थिती होती. यावेळी आ.कडू म्हणाले, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त भाव नसल्यानेच शेतकरी देशोधडीला लागला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी केल्याचे सांगितले जात आहे. मात्र ज्या निकषासह शासन निर्णय निघाले त्यानुसार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा घोळ अधिक आहे.

शासनाने कर्जमाफीची जाहिरात करण्यापेक्षा सकारात्मक भूमिकेतून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांना सावरण्याचा प्रयत्न करावा, असेही आ. बच्चू कडू म्हणाले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आसूड यात्रेचे आयोजन केले असून ही सामूहिक चळवळ बनावी, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

देशोन्नती

परभणी / शनिवार दि. २२ जुलै २०१७




**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयात स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजी चॉईस बेस्ड क्रिकेट सिस्टीम या विषयावरील एकदिवशीय चर्चा सत्राचे उद्घाटन करतांना कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर, हेमंत जामकर, अधिष्ठाता डॉ. वामनराव जाधव, डॉ. जोगेंद्रसिंग बीसेन, डॉ. वसंत भोसले, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. रोहिदास नितोंडे दिसत आहेत.

पुण्य नगरी ▮गुरुवार, २७ जुलै २०१७ ▮परभणी

# विद्यार्थ्यांनी नियोजनपूर्वक अभ्यास करावा-जाधव

परभणी - नीट आणि जेईई या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेत यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नियोजनपूर्वक अभ्यास करावा, असे आवाहन प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले आहे. श्री शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या अकरावी विज्ञान वर्गाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम झाला. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.जाधव बोलत होते. योग्य नियोजन, नियमित व सखोल अभ्यास, अमाप परिश्रम, प्रबळ महत्वकांक्षा, निष्ठा व श्रध्दा ठेवून काम केल्यास यश तुमच्याच हातात आहे, असे जाधव म्हणाले. उपप्राचार्य अप्पाराव डहाळे, पर्यवेक्षक बाबूराव आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डहाळे, आंधळे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा.संजय ढवळे यांनी केले तर आभार प्रा.नारायण कणसे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.एस.एन.मुंदे, प्रा.डी.व्ही.पाटील, प्रा.एस.एम.कुलकर्णी, प्रा.सी.जी.लाठकर, प्रा.ए.बी.शिंदे, प्रा.आर.डी.मस्के, प्रा.के.एस.कदम, प्रा.पी.एन.मोरे, प्रा.एस.आर.पखाले, प्रा.हाके, प्रा.कणसे, प्रा.जाधव, प्रा.चौधरी, प्रा.देशमुख, प्रा.अग्रवाल, प्रा.भोसले यांनी पुढाकार घेतला.

लोकमत औरंगाबाद, सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०१७

# राष्ट्रीय सेवा योजना भिंती नसणारी शाळा

## कार्यशाळा: शिंदे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** : राष्ट्रीय सेवा योजना ही समाज व चारित्र्य निर्मितीची शाळा आहे. त्यामुळे ही भिंत नसणारी शाळा आहे, असे प्रतिपादन प्रा.डॉ.भारत शिंदे यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.यु.बी. जाधव हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अप्पाराव डहाळे, प्रल्हाद भोपे, प्रा.वृषाली फुके, प्रा.विनोद शिंगणे, प्रा.राजेसाहेब रेंगे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ.यु.बी. जाधव म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य वळण लावण्याचे काम करते. या माध्यमातून समाजाला आवश्यक असणारा नागरिक घडविला जातो. माझ्या जडणघडणीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिकाच महत्त्वाची राहिलेली असल्याचे ते म्हणाले. प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी सूत्रसंचालन केले. शेख अहमद यांनी आभार मानले.

या कार्यशाळेला महाविद्यालयातील शिक्षक, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि.१३ ऑगस्ट २०१७ ४



**स्वच्छता...** श्री शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी परभणी शहरातील बसस्थानक परिसरात शनिवारी स्वच्छता अभियान राबविले. या प्रसंगीचे छायाचित्र.

रविवार, दि. १३ ऑगस्ट २०१७ देशोन्नती

# बसस्थानकात श्रमदानातुन स्वच्छता



शहर प्रतिनिधी / १२ ऑगस्ट

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयोच्या स्वयंसेवकांनी बसस्थानक परिसरात सकाळी ९ वाजता श्रमदानातुन स्वच्छता केली. या मोहिमेचे उद्घाटन आगार कर्मचाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी २०० स्वयंसेवकांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांस प्रा. प्रल्हाद भोपे, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. विनोद शिंगने, प्रा. वृशाली फुके, प्रा. कांगणे याचे मार्गदर्शन लाभले.

रविवार, 13 अगस्त 2017
लोकमत समाचार
epaper.lokmat.com/lokmatsamachar

# स्वच्छता जनजागृति



परभणी में शनिवार को अंतर्राष्ट्रीय युवा दिवस के मौके पर शिवाजी महाविद्यालय के विद्यार्थियों ने बस स्टैंड परिसर में साफ-सफाई की.

सकाळ
नांदेड, सोमवार
१४ ऑगस्ट २०२३
३
TODAY
परभणी




परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयातील रासोयोच्या स्वंयसेवकांनी बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहीम घेतली. उद्घाटनावेळी विद्यार्थ्यांसह एस.टी. महामंडळाचे कर्मचारी.

## 'रासेयो'च्या स्वंयसेवकांनी केले बसस्थानक स्वच्छ

परभणी, ता. १३ : येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी परभणी बसस्थानक परिसरात सकाळी नऊ वाजता श्रमदानातून स्वच्छता केली. या स्वच्छता मोहिमेचे उद्घाटन आगारातील कर्मचाऱ्यांच्या हस्ते झाले. श्री शिवाजी महाविद्यालय ते मुख्य बसस्थानकापर्यंत विद्यार्थ्यांनी स्वच्छतेबाबत घोषणा देत जनजागृती केली. या मोहिमेत २०० विद्यार्थांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रल्हाद भोपे, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. विनोद शिंगणे, प्रा. वृषाली फुके, प्रा. कांगणे यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक : १७ ऑगस्ट २०१७

झुंजार नेता

# युवक महोत्सव सल्लागार पदी डॉ.बोबडे

परभणी(प्रतिनिधी)दि.१६:- श्री शिवाजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.जयंत बोबडे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सव सल्लागार पदी निवड झाली आहे.

वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांच्या विकासासाठी विद्यापीठ दरवर्षी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव आयोजित करते. यामध्ये असंख्य कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. डॉ. बोबडे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागप्रमुखपदी अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने युवक महोत्सवात अनेक पारितोषिके पटकावली आहेत.

दि.१८ ऑगस्ट २०१७

गोदातीर समाचार

# राष्ट्रीय सेवा योजना ही बीन भिंतीची शाळा-प्रा.डॉ.भारत शिंदे

**परभणी/प्रतिनिधी**

व्यक्ती-व्यक्तीने समाज बनतो व समाज सामर्थ्यशाली बनवायचा असेल तर सामाजिक बांधिलकी व लोकशाही मूल्यांचा पुरस्कार व अंगीकार आवश्यक आहे. तेंव्हा देशातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना युनिट समर्थपणे करते. राष्ट्रीय सेवा योजना ही समाज व चारित्र्य निर्मितीची बिनभिंतीची शाळा आहे असे प्रतिपादन प्रा.डॉ.भारत शिंदे यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ.शिंदे बोलत होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.यु.जाधव होते. याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य आप्पाराव डहाळे, कार्यक्रमाधिकारी प्रल्हाद भोपे, प्रा.वृषाली फुके, प्रा.विनोद शिंगणे, प्रा.राजेसाहेब रेंगे आदी उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ.बी.यु.जाधव म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य वळण लावण्याचे कार्य करते. या माध्यमातून समाजाला आवश्यक असा नागरीक घडविला जातो. माझ्या जडणघडणीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची भुमिकाच महत्वपूर्ण राहिलेली आहे असे उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी केले तर आभार शेख अहमद याने केले. कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी
शुक्रवार, १८ ऑगस्ट २०१७

# डॉ.जयंत बोबडे विद्यापीठ युवक महोत्सव सल्लागार समितीवर

परभणी / प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.जयंत बोबडे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सव सल्लागारपदी निवड झाली आहे. डॉ. बोबडे यांच्या निवडीबद्दल स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर, प्रबंधक विजय मोरे, डॉ.रोहिदास नितोंडे, डॉ.रामानंद व्यवहारे आदींनी स्वागत केले.

देशोन्नती

नांदेड/शुक्रवार, दि. १८ ऑगस्ट २०१७

# डॉ. जयंत बोबडे युवक महोत्सव समितीवर



**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. जयंत बोबडे यांची स्वामी रामानंदतिर्थ मराठवाडा विद्यापीठ युवक महोत्सव समितीच्या सल्लागार पदी निवड करण्यात आली आहे. डॉ. बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने युवक महोत्सवात अनेक पारितोषिके मिळविली आहेत. त्यांच्या निवडीचे स्वागत स्थानिक नियामक मंडळ प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उप प्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, डॉ. रामानंद व्यवहारे, डॉ. रोहिदास नितोंडे आदींनी केले आहे.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि.१७ ऑगस्ट २०१७

# जयंत बोबडे यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा.जयंत बोबडे यांची स्वारातीमच्या युवक महोत्सव सल्लागार समितीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

२०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव आयोजित केला आहे. यासाठी कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर राव यांनी प्रा.जयंत बोबडे यांची युवक महोत्सव, सल्लागार समितीवर निवड केली आहे.

या निवडीबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सकाळ
नांदेड, मंगळवार
२२ ऑगस्ट २०१७
४

TODAY परभणी

# सल्लागारपदी प्रा.डॉ.जयंत बोबडे



जयंत बोबडे

परभणी, ता. २१ : श्री शिवाजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. जयंत बोबडे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सव सल्लागारपदी निवड झाली आहे.

डॉ. बोबडे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागप्रमुखपदी अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने युवक महोत्सवात अनेक पारितोषिके पटकाविली आहेत. डॉ. बोबडे यांच्या निवडीबद्दल स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी आदींनी स्वागत केले.

देशोन्नती

रविवार, दि. २० ऑगस्ट २०१७

# पर्यावरण विभागाकडुन शिवाजी महाविद्यालयाचा गौरव

**शहर प्रतिनिधी** / १९ ऑगस्ट

**परभणी** : येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील पर्यावरण विभागाअंतर्गत गेल्या दोन वर्षापासुन पर्यावरण पुरक उपक्रम राबविल्या जात आहेत. या कार्याची दखल घेऊन राज्याच्या पर्यावरण विभागाकडुन श्री शिवाजी महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला आहे.

महाविद्यालयातील पर्यावरण विभागा अंतर्गत विद्यार्थ्यांनी शहरातील वार्डातील पर्यावरण सद्यस्थितीचा जलद अवलोकन आढावा घेऊन समस्या व उपाय योजनांची माहिती राज्याच्या पर्यावरण विभागास दिली. या बरोबरच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे ग्रीन ऑडीटही केले. पाणी आणि शास्वत विकास ही संकल्पना घेऊन शहरात जनजागृती केली. रेन हार्वेस्टिंग याचे महत्व नागरीकांना पटवुन दिले. यासाठी प्रा. डॉ. बापुसाहेब भोसले, उपप्राचार्य डहाळे, पर्यवेक्षक आंधळे यांच्या कार्याची दखल घेऊन पर्यावरण विभागाने महाविद्यालयाचा गौरवपत्र देवुन सन्मान केला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव सोळंके, सतिश चव्हाण, हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर यांनी विद्यार्थी व प्रा. डॉ. बापुसाहेब भोसले यांचे अभिनंदन केले आहे.

लोकमत
परभणी Next
परभणी ▶ मंगळवार, २२ ऑगस्ट २०१७

## राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यशाळा

**परभणी :** परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा कार्यशाळेचे उद्घाटन प्रा. भारत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य बाळासाहेब जाधव हे होते. या वेळी व्यासपीठावर उपप्राचार्य आप्पाराव डहाळे, कार्यक्रम अधिकारी प्रल्हाद भोपे, प्रा. फुके, प्रा. विनोद शिंगणे, प्रा. रेंगे आदी उपस्थित होते या वेळी व्यक्तीने समाज बनतो समाज साम्यर्थशाली बनवायचा असले तर सामाजीक बांधीलकी व लोकशाही मुल्यांचा पुरस्कार करणे अंगीकार करणे आवश्यक आहे असे सांगत डॉ. भारत शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही समाज व चारित्र्य निमिर्तीची बिन भिंतीची शाळा असल्याचे सांगितले.

सकाळ
नांदेड, बुधवार
२३ ऑगस्ट २०१७
४



TODAY

# परभणी

## अवतीभवती

# शिवाजी महाविद्यालयात दहावी उत्तीर्ण, एटीकेटी विद्यार्थ्यांना संधी

परभणी, ता. २२ : दहावीतील उत्तीर्ण, अनुत्तीर्ण (एटीकेटी) विद्यार्थ्यांना येथील शिवाजी महाविद्यालयाने व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत फूड प्रॉडक्शन हा विषय मराठी माध्यमातून शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. शिवाजी महाविद्यालयात दहा अधिक दोन स्तरावरील हा अभ्यासक्रम असून तो पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षणाच्या संधींबरोबरच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी देखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. लेखी परीक्षा ८० गुणांची तर प्रात्यक्षिक परीक्षा १२० गुणांची असल्यामुळे उत्तीर्ण होण्यास देखील सहज सुलभ आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास बी.एससी. (फुडसायन्स), हॉस्पिटलीटी मॅनेजमेंट, हॉटेल मॅनेजमेंट, बी.ए., बी.कॉम, बी.सी.ए., बी.बी.ए. या पदवी अभ्यासक्रमाबरोबरच विविध व्यावसायिक प्रशिक्षण देखील घेता येते. त्यामुळे उत्पादन निरीक्षक, सहायक, गुण नियंत्रक, तांत्रिक सहायक, प्रयोगशाळा सहायक, विक्री प्रतिनिधी या नोकरीच्या व लघुउद्योगाच्या संधी उपलब्ध होतात. अधिक माहितीसाठी आर. बी. जवळेकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

दैनिक समर्थ दिलासा
बुधवार, दि.२३ ऑगस्ट २०१७ पान नं. ४

# अभ्यासात सातत्य ठेवल्यास स्पर्धा परिक्षेत यश:भुसारे

**परभणी, दि. २२ (प्रतिनिधी):** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी सुरूवातीपासुन प्रयत्न केल्यास त्यांना यशाला गवसणी घालता येईल, आपल्या अभ्यासात सातत्य ठेवल्यास स्पर्धा परिक्षेत निश्चित यश मिळते असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित स्पर्धा परिक्षेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव हे तर पोलिस निरिक्षक अनिल सनगले, उपप्राचार्य अप्पाराव डहाळे, पर्यवेक्षक बाबुराव आंधळे यांची उपस्थिती होती. पुढे ते म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्वतःची गुणवत्ता ओळखुन करिअर निवडावे आणि निवडलेल्या क्षेत्रात जीव ओतुन यशस्वी होण्यासाठी धडपड करावी असे ते म्हणाले. प्रास्ताविक आबासाहेब सावंत यांनी, सुत्रसंचलन प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी तर आभार बापुराव भोसले यांनी मानले.

सकाळ

नांदेड, बुधवार
३० ऑगस्ट २०१७

४

## मोडीलिपीचे प्रशिक्षण वर्ग

परभणी, ता. २९ : श्री शिवाजी महाविद्यालयात पुराभिलेख संचालनाच्या वतीने सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मोडिलिपीच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे. दहा ते बारा दिवस चालणाऱ्या हे प्रशिक्षण दुपारी तीन ते पाच वाजेदरम्यान होणार आहे. प्रशिक्षणाअंती १०० गुणांची परीक्षा घेतली जाणार असून ५० टक्के गुण घेणारा उमेदवार उत्तीर्ण होणार आहे. या प्रशिक्षणासाठी इच्छुकांनी नोंदणी करावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. प्रल्हाद भोपे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

नांदेड, शुक्रवार
१ सप्टेंबर २०१७

४

TODAY
परभणी

## शिवाजी महाविद्यालयात आज चर्चासत्र

परभणी, ता. ३१: नॅक मुल्यांकनावर सुधारीत आकृतीबंध या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन शुक्रवारी (ता.एक) येथील श्री शिवाजी महाविद्यालयात करण्यात आले आहे. तंत्रशिक्षण संचालक डॉ.धनराज माने यांच्याहस्ते सकाळी साडेदहा वाजता उद्घाटन होणार असून त्यात नॅकचे सल्लागार डॉ.गणेश हेगडे मार्गदर्शन करणार आहेत. स्थानीक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर अध्यक्षस्थानी असणार आहेत. नांदेड विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ.जी.एन शिंदे, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ.बी.एस जाधव यांचीही उपस्थिती राहणार असल्याची माहीती प्राचार्य डॉ. बी. यु. जाधव, डॉ .रोहिदास नितोंडे यांनी दिली.

# गोदातीर समाचार

दि.०४ सप्टेंबर २०१७

## महाविद्यालयांच्या गुणवत्ता वाढीसाठी नॅक मधील बदल महत्वाचे-डॉ.हेगडे



**परभणी/प्रतिनिधी**

महाविद्यालयांच्या गुणवत्ता वाढीसाठी नॅक आवश्यक असून त्यामध्ये करण्यात आलेले बदल महत्वाचे आहेत. ते सर्वांनी समजुन घ्यावेत, असे आवाहन नॅकचे उपसल्लागार डॉ.गणेश हेगडे यांनी केले आहे.

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'पुर्नरचित पुर्नमूल्यांकन पद्धती नॅक' विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ.हेगडे बोलत होते. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.गणेश शिंदे, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ. बी. एस. जाधव,श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, कार्यशाळेचे प्रमुख संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, आर.टी.देशमुख, डॉ. रोहिदास नितोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर मार्गदर्शन करतांना डॉ.हेगडे म्हणाले, युजीसी आणि देशातील सर्व राज्ये नॅकच्या मानांकनानुसार अनुदान देण्याचे धोरण स्विकारत आहेत. युजीसीची ही मुख्य भुमिका आहे. सर्व महाविद्यालयांना नॅक बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, विद्यार्थी विकास, शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढ करण्याच्या हेतूने नॅक मूल्यांकनात अनेक बदल केले आहेत. नॅकच्या पुर्नरचित अनेक मुद्याबद्दल डॉ.हेगडे यांनी सविस्तर माहिती दिली.यावेळी प्र.कुलगुरु डॉ.शिंदे यांचेही भाषण झाले. उच्च शिक्षणातील विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी नॅक ने पुर्नमूल्यांकन प्रक्रियेत केलेल्या सुधारणा महत्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. प्रारंभी कार्यशाळेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.रोहिदास नितोंडे यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेनिमित्त तयार करण्यात आलेल्या शोधनिबंधाच्या ई बुकचे सी.डी.स्वरुपात प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचलन प्रा.रविशंकर झिंगरे यांनी केले. कार्यशाळेत महाराष्ट्रासह इतर राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी डॉ.हेगडे यांच्याशी अनेक वेगवेगळ्या विषयावर चर्चा केली.

दि.२९ ऑगस्ट २०१७

# गोदातीर समाचार

## शिवाजी महाविद्यालयात मोडीलिपीचे प्रशिक्षण वर्ग

**परभणी**-श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये पुराभिलेख संचालनालयाच्यावतीने मोडीलिपीचे प्रशिक्षण वर्ग सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून घेण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी १० ते १२ दिवसाचा असेल.

हे प्रशिक्षण वर्ग दररोज दुपारी ३ते ५या वेळेत महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येतील. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थीला मराठी भाषा अवगत असणे जरुरी आहे. प्रशिक्षण वर्गासाठी नियमानुसार प्रवेश व शिक्षण शुल्क असे एकूण २५० आकारले जाईल. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यां उमेदवारांची १०० गुणांची परिक्षा प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी घेतली जाईल. ५० गुण मिळविणाऱ्या प्रशिक्षणार्थींना उत्तीर्ण घोषीत केले जाईल. प्रशिक्षण वर्गातील उपस्थिती ९० टक्के पेक्षा कमी असल्यास परिक्षेस बसू दिले जाणार नाही. या प्रशिक्षणास महाविद्यालयातील विद्यार्थी, शासकीय कर्मचारी प्रवेश घेवू शकतात.

शासकीय निमशासकीय कार्यालयात मोडी लिपींतील असंख्य कागदपत्रे आजही आहेत व या मोडीलिपी वाचकांची संख्या अल्प असल्याने त्यांचे वाचन होत नाही ही गरज लक्षात घेता या प्रशिक्षणाचे महत्व आहे. त्याच बरोबर एखादी लिपी आपणास अवगत असल्यास प्रत्येकाच्या विकासाचेच ठरेल. तेव्हा या प्रशिक्षणासाठी इच्छुकांनी नोंदणी करावी असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.यु.जाधव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा.प्रल्हाद भोपे मो.नं.९९२२७९४१६४ यांच्याशी संपर्क करावा.

लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि.२ सप्टेंबर २०१७ ४

# गुणवत्ता वाढीसाठी 'नॅक' मधील बदल महत्त्वाचे

## कार्यशाळा : गणेश हेगडे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** : महाविद्यालयांच्या गुणवत्ता वाढीसाठी नॅक आवश्यक आहे. त्यामध्ये करण्यात आलेले बदल महत्वाचे आहेत. ते सर्वांनी समजून घ्यावेत, असे आवाहन नॅकचे उपसल्लागार डॉ.गणेश हेगडे यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'पुनर्रचित पुर्नमूल्यांकन पद्धती- नॅक' या विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. हेगडे बोलत होते. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.गणेश शिंदे, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ.बी.एस. जाधव, हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, आर.टी. देशमुख, डॉ.रोहिदास नितोंडे यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत बोलताना डॉ. शिंदे म्हणाले, उच्च शिक्षणातील विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी नॅकने पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत केलेल्या सुधारणा महत्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. डॉ. रोहिदास नितोंडे यांनी प्रास्ताविक केले.

या कार्यशाळेत तयार करण्यात आलेल्या शोध निबंधाच्या ई-बुकचे सीडी स्वरुपात मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. प्रा. रविशंकर झिंगरे यांनी सूत्रसंचालन केले.

देशोन्नती शनिवार, दि . २ सप्टेंबर २०१७
परभणी

# गुणवत्ता वाढीसाठी नॅक मधील बदल महत्वाचे - डॉ. हेगडे

## राष्ट्रीय चर्चासत्र ■ शिवाजी महाविद्यालयात 'पुनर्रचित पुनर्मुल्यांकन पध्दती - नॅक' विषयावर मार्गदर्शन

*जिल्हा प्रतिनिधी* / १ सप्टेंबर

**परभणी** : विद्यापीठ अनुदान आयोग आणि देशातील सर्व राज्य नॅक च्या मानांकनानुसार अनुदान देण्याचे धोरण स्विकारत आहेत. युजीसीची हीच मुख्य भुमिका आहे. सर्व महाविद्यालयांना नॅक बंधनकारक करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठीच नॅक मधील बदल हे महत्वाचे असल्याचे प्रतिपादन नॅकचे उप सल्लागार डॉ. गणेश हेगडे यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयात शुक्रवार १ सप्टेंबर रोजी पुनर्रचित पुनर्मुल्याकन पध्दती - नॅक या विषयावरील राष्ट्रीय पातळीवर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना उप सल्लागार डॉ. हेगडे हे बोलत होते. यावेळी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ. बी.एस. जाधव, स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, संयोजक तथा प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव, आर.टी. देशमुख, आयक्युएसी समन्वयक डॉ. रोहिदास नितोंडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. हेगडे म्हणाले की, सर्व शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, विद्यार्थी विकास, शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढ करण्याच्या हेतूने नॅक मुल्यांकनात अनेक बदल करण्यात आले आहेत. ते बदल महाविद्यालयांनी स्विकारावेत, असे आवाहन केले. प्रभारी कुलगुरु डॉ. शिंदे यांनी मनोगतात उच्च शिक्षणातील विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी नॅकने पुनर्मुल्यांकन प्रक्रियेत केलेल्या सुधारणा महत्वपुर्ण असल्याचे सांगितले. प्रारंभी कार्यशाळेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ. जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेनिमित्त तयार करण्यात आलेल्या शोधनिबंधाच्या ई बुकचे सीडी स्वरुपात मान्यवरांच्याहस्ते यावेळी विमोचन करण्यात आले. सुत्रसंचालन प्रा. रविशंकर झिंगरे यांनी केले.

कार्यशाळेस महाराष्ट्रासह इतर राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परभणी TODAY सकाळ

शनिवार
२ सप्टेंबर २०१७

कमाल 31.9°/1



परभणी : शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. गणेश हेगडे, डॉ. गणेश शिंदे आदी.

# गुणवत्तावाढीसाठी नॅकमधील बदल महत्त्वाचे : डॉ. हेगडे

**परभणी, ता. १ (बातमीदार)** : 'नॅक'मध्ये करण्यात आलेले बदल महाविद्यालयांच्या गुणवत्तासाठी महत्त्वाचे आहेत. ते समजून घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन 'नॅक'चे उपसल्लागार डॉ. गणेश हेगडे यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी (ता. एक) पुनर्रचित पुनर्रमूल्यांकन पद्धती-नॅक या विषयावर राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. हेगडे बोलत होते. या वेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रभागी कुलगुरू डॉ. गणेश शिंदे, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ. बी. एस. जाधव, स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, आर. टी. देशमुख, आरक्युएसीचे समन्वयक डॉ. रोहिदास नितोंडे यांची उपस्थिती होती.

दैनिक समर्थ
दिलासा
शनिवार, दि. २ सप्टेंबर २०१७ वर्ष ३ रे अंक १५७ वा RNI-MAH

# गुणवत्ता वाढीसाठी नॅकमधील बदल महत्वाचे

## नॅकचे उपसल्लागार डॉ.गणेश हेगडेः शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा

परभणी, दि.०१ (प्रतिनिधी): महाविद्यालयांच्या गुणवत्ता वाढीसाठी नॅक आवश्यक असून त्यामध्ये करण्यात आलेले बदल महत्वाचे आहेत. ते सर्वांनी समजून घ्यावेत असे आवाहन नॅकचे उपसल्लागार डॉ.गणेश हेगडे यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पुर्नरचित पुर्नमुल्यांकन पद्धती-नॅक विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ.हेडगे बोलत होते. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.गणेश शिंदे, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ.बी.एस.जाधव, श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, कार्यशाळेचे प्रमुख संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे महाविद्यालय विकास अधिकारी आर.टी.देशमुख, आय.क्यू.ए. सी.चे समन्वयक डॉ.रोहिदास नितोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी पूढे बोलतांना डॉ. हेगडे म्हणाले, युजीसी आणि देशातील सर्व राज्ये नॅक च्या मानांकनानुसार अनुदान देण्याचे धोरण स्विकारत आहेत. युजीसीची हीच मुख्य भूमिका आहे. सर्व महाविद्यालयांना नॅक बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, विद्यार्थी विकास, शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढ करण्याच्या हेतूने नॅक मुल्यांकनात अनेक बदल केले आहेत. नॅकच्या पुर्नरचित अनेक मुद्याबद्दल डॉ.हेडगे यांनी माहिती दिली.

यावेळी प्र.कुलगुरु डॉ. शिंदे यांचेही भाषण झाले. उच्च शिक्षणातील विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी नॅकने पुर्नमुल्यांकन प्रक्रियेत केलेल्या सुधारण महत्वपूर्ण असल्याचे ते यावेळी म्हणाले. प्रारंभी कार्यशाळेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.

आय. क्यु. ए. सी. चे समन्वयक डॉ.रोहिदास नितोंडे यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेनिमीत्त तयार करण्यात आलेल्या शोधनिबंधाच्या ई-बुकचे सी.डी.स्वरुपात प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. सुत्रसंचलन प्रा.रविशंकर झिंगरे यांनी केले.

कार्यशाळेत महाराष्ट्रासह इतर राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक मोठ्यासंख्येने सहभागी झाले होते. त्यांनी डॉ.हेडगे यांच्याशी अनेक वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केली.


परभणी एकमत Next
परभणी ▶ रविवार, ३ सप्टेंबर २०१७

# गुणवत्ता वाढीसाठी नॅकमधील बदल महत्वाचे: डॉ. हेगडे

**परभणी : प्रतिनिधी**

महाविद्यालयांच्या गुणवत्ता वाढीसाठी नॅक आवश्यक असून त्यामध्ये करण्यात आलेले बदल महत्वाचे आहेत. ते सर्वांनी समजून घ्यावेत असे आवाहन नॅकचे उपसल्लागार डॉ.गणेश हेगडे यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या पुनर्रचित पुनर्मूल्यांकन पध्दती- नॅक विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ.हेगडे बोलत होते. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ




मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.गणेश शिंदे, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ.बी. एस.जाधव, स्थानिक संयोजन समितीचे हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, आर.टी. देशमुख, डॉ.रोहिदास नितोंडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ.हेगडे म्हणाले युजीसी आणि देशातील सर्व राज्ये नॅकच्या मानांकनानुसार अनुदान देण्याचे धोरण स्वीकारत आहेत. युजीसीची हीच मुख्य भूमिका आहे. सर्व महाविद्यालयांना नॅक बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, विद्यार्थी विकास, शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढ करण्याच्या हेतूने नॅक मूल्यांकनात अनेक बदल केले असल्याचे सांगून नॅकच पुनर्रचित अनेक मुद्दांबद्दल डॉ. हेगडे यांनी माहिती दिलीयावेळी कुलगुरू डॉ. शिदे यांचेही भाषण झाले. उच्च शिक्षणातील विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी नॅकचे पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत केलेल्या सुधारणा महत्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. प्रारंभी कार्यशाळेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रोहिदास नितोंडे यांनी केले. कार्यशाळेनिमित्त तयार करण्यात आलेल्या शोधनिबंधाच्या ईबुकचे सी.डी.स्वरूपात प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन रविशंकर झिगरे यांनी केले. कार्यशाळेत महाराष्ट्रासह अन्य राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक सहभागी झाले होते.

शनिवार, २ सप्टेंबर २०१७

पुण्य नगरी

# गुणवत्ता वाढीसाठी नॅकमधील बदल महत्वाचे - डॉ. गणेश हेगडे



परभणी / प्रतिनिधी

महाविद्यालयांच्या गुणवत्ता वाढीसाठी नॅक आवश्यक असून त्यामध्ये करण्यात आलेले बदल महत्वाचे आहेत. ते सर्वांनी समजून घ्यावेत, असे आवाहन नॅकचे उपसल्लागार डॉ.गणेश हेगडे यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पुनर्रचित पुनर्मूल्यांकन पध्दती- नॅक विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ.हेगडे बोलत होते. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.गणेश शिंदे, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ.बी.एस.जाधव, स्थानिक संयोजन समितीचे हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, आर.टी.देशमुख, डॉ.रोहिदास नितोंडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ.हेगडे म्हणाले युजीसी आणि देशातील सर्व राज्ये नॅकच्या मानांकनानुसार अनुदान देण्याचे धोरण स्वीकारत आहेत. युजीसीची हीच मुख्य भूमिका आहे. सर्व महाविद्यालयांना नॅक बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, विद्यार्थी विकास, शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढ करण्याच्या हेतूने नॅक मूल्यांकनात अनेक बदल केले असल्याचे सांगून नॅकच पुनर्रचित अनेक मुद्दांबद्दल डॉ. हेगडे यांनी माहिती दिली.

यावेळी कुलगुरू डॉ.शिंदे यांचेही भाषण झाले. उच्च शिक्षणातील विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी नॅकचे पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत केलेल्या सुधारणा महत्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. प्रारंभी कार्यशाळेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रोहिदास नितोंडे यांनी केले. कार्यशाळेनिमित्त तयार करण्यात आलेल्या शोधनिबंधांच्या ईबुकचे सी.डी.स्वरूपात प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन रविशंकर झिंगरे यांनी केले. कार्यशाळेत महाराष्ट्रासह अन्य राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक सहभागी झाले होते, त्यांनी डॉ.हेगडे यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा केली.

देशोन्नती शनिवार, दि. २ सप्टेंबर २०१७
परभणी

# गुणवत्ता वाढीसाठी नॅक मधील बदल महत्वाचे - डॉ. हेगडे

## राष्ट्रीय चर्चासत्र ■ शिवाजी महाविद्यालयात 'पुनर्रचित पुनर्मुल्यांकन पध्दती - नॅक' विषयावर मार्गदर्शन

*जिल्हा प्रतिनिधी* / १ सप्टेंबर

**परभणी :** विद्यापीठ अनुदान आयोग आणि देशातील सर्व राज्य नॅक च्या मानांकनानुसार अनुदान देण्याचे धोरण स्विकारत आहेत. युजीसीची हीच मुख्य भुमिका आहे. सर्व महाविद्यालयांना नॅक बंधनकारक करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठीच नॅक मधील बदल हे महत्वाचे असल्याचे प्रतिपादन नॅकचे उप सल्लागार डॉ. गणेश हेगडे यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयात शुक्रवार १ सप्टेंबर रोजी पुनर्रचित पुनर्मुल्याकन पध्दती - नॅक या विषयावरील राष्ट्रीय पातळीवर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना उप सल्लागार डॉ. हेगडे हे बोलत होते. यावेळी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे संचालक डॉ. बी.एस. जाधव, स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, संयोजक तथा प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव, आर.टी. देशमुख, आयक्युएसी समन्वयक डॉ. रोहिदास नितोंडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. हेगडे म्हणाले की, सर्व शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, विद्यार्थी विकास, शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढ करण्याच्या हेतूने नॅक मुल्यांकनात अनेक बदल करण्यात आले आहेत. ते बदल महाविद्यालयांनी स्विकारावेत, असे आवाहन केले. प्रभारी कुलगुरु डॉ. शिंदे यांनी मनोगतात उच्च शिक्षणातील विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी नॅकने पुनर्मुल्यांकन प्रक्रियेत केलेल्या सुधारणा महत्त्वपुर्ण असल्याचे सांगितले. प्रारंभी कार्यशाळेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ. जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेनिमित्त तयार करण्यात आलेल्या शोधनिबंधाच्या ई बुकचे सीडी स्वरुपात मान्यवरांच्याहस्ते यावेळी विमोचन करण्यात आले. सुत्रसंचालन प्रा. रविशंकर झिंगरे यांनी केले.

कार्यशाळेस महाराष्ट्रासह इतर राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक समर्थ दिलासा
शनिवार, दि. ९ सप्टेंबर २०१७ पान नं. ४

# शिवाजीत प्राध्यापकांसाठी उदबोधन शिबीर

परभणी,दि.८ (प्रतिनिधी): श्री शिवाजी महाविद्यालयात मराठवाडा शिक्षक प्रसारक मंडळातील प्राध्यापकांसाठी एक दिवशीय उदबोधन शिबीराचे आयोजन दि.१० सप्टेंबर रोजी करण्यात आले.

श्री शिवाजी महाविद्यालयात मनुष्यबळ संसाधन संपन्नता या विषयावर चर्चा होणार आहे. या कार्यक्रमास प्रा.डॉ. खान, प्राचार्य आर.टी. देशमुख, उपप्राचार्य डॉ. सुरेश पैठणकर, डॉ. बळीराम धापसे सहभागी होणार आ-हेत. वाणिज्य विषयक उदबोधन कार्यक्रमात डॉ.एम.एन. सोंडगे, डॉ.सी.के. हरनावळे, डॉ. प्रभाकर हरकळ उपस्थित राहणार आ-हेत. उदघत्तटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे राहणार आहेत. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंग्रजी विभागाच्या प्रमुख व उपप्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ. मदन परतुरकर आदी परिश्रम घेत आहेत.

शनिवार, दि.९ सप्टेंबर २०१७ ६
देशोन्नती

# श्री शिवाजी महाविद्यालयात उद्‌बोधन शिबीराचे आयोजन

**शहर प्रतिनिधी / ८ सप्टेबर**

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील इंग्रजी आणि विभागाच्या वतीने येत्या रविवारी मंडळातील प्राध्यापकांसाठी एक दिवशीय उद्‌बोधन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या उद्‌बोधन सत्रात इंग्रजी, हिंदी, मराठी व उर्दु तसेच वाणिज्य विषयावर चर्चा होणार आहे. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातील प्राध्यापकवर्गामध्ये अध्ययन- अध्यापन- संशोधन कौशल्य विकासीत व्हावे या साठी या सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मणूष्यबळ संसाधन संपन्नता या मुख्य विषयावर चर्चा होणार आहे. भाषा विषयासाठी आयोजीत उद्‌बोधन कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाचे माजी बी.सी.यु.डी. प्रा.डॉ.खान, प्राचार्य आर.टी.देशमुख, उप प्राचार्य डॉ.सुरेश पैठणकर, डॉ.बळीराज धापसे हे सभागी होणार आहेत. तर वाणिज्य विषयाच्या कार्यक्रमात विषय तज्ञ म्हणुन प्राध्यापक डॉ.एम.एन. सोंडगे,डॉ.सी.के.हरनावळे, डॉ.प्रभाकर हरकळ यांची उपस्थिती राहणार आहे. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव हे राहणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्या डॉ.विजया नांदापुरकर,प्रा.डॉ.मदन परतुरकर, प्रयत्नशिल आहेत.

पुण्य नगरी

शनिवार, ९ सप्टेंबर २०१७ । परभणी

## आनंद कांबळे यांची निवड

परभणी -श्री शिवाजी महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक आनंद कांबळे याची सोलापूर येथे होणाऱ्या विद्यापीठीय पूर्व प्रजासत्ताक संचलनासाठी निवड झाली आहे. तो स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहे. त्याच्या या यशाबद्दल स्थानिक संयोजन समितीचे हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, उपप्राचार्या डॉ.विजया नांदापूरकर, ए.एन.डहाळे, कार्यक्रमाधिकारी प्रल्हाद भोपे, डॉ.तुकाराम फिसफिसे, वृषाली फुके, विनोद शिंगणे, राजेसाहेब रेंगे आदींनी स्वागत केले आहे.

सकाळ

नांदेड, बुधवार १३ सप्टेंबर २०१७

४

TODAY परभणी

## संचलनासाठी आनंद कांबळे यांची निवड

परभणी, ता. १२ : श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वंयसेवक आनंद कांबळे यांची सोलापूर येथे होणाऱ्या विद्यापीठीय पूर्व प्रजासत्ताक संचलनासाठी निवड झालेली आहे. तो स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहे. त्याच्या यशाबद्दल स्थानिक संयोजन समिती प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी व उपप्राचार्य डॉ. विजया नांदापूरकर, प्रा. ए. एन. डहाळे, कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रल्हाद भोपे, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. वृषाली फुके, प्रा. विनोद शिंगणे, प्रा. राजेसाहेब रेंगे यांनी अभिनंदन केले.

परभणी / रविवार दि. १० सप्टेंबर २०१७ देशोन्नती

## थोडक्यात

# आज एक दिवशीय उदबोधन शिबीर

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागाच्या वतीने रविवार १० सप्टेंबर रोजी प्राध्यापकांसाठी एक दिवशीय उदबोधन शिबीर आयोजीत करण्यात आले आहे. या शिबीरात इंग्रजी, हिंदी, मराठी व उर्दु, वाणिज्य विषयावर चर्चा होणार आहे. प्राध्यापकांमध्ये अध्ययन, अध्यापन, संशोधन, कौशल्य विकसीत व्हावे यासाठी शिबीर घेतले जात आहे. शिबीरामध्ये डॉ. खान, प्राचार्य आर.टी. देशमुख, उपप्राचार्य डॉ. सुरेश पैठणकर, डॉ. बळीराम थापसे सहभागी होणार आहेत. विषय तज्ञ म्हणुन संशोधक डॉ. एम.एन. सोंडगे, डॉ. सी.के. हरनावळे, डॉ. प्रभाकर हरकळ यांची उपस्थिती राहणार आहे. शिबीरासाठी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. विजया नांदापुरकर, प्रा.डॉ. मदन परतुरकर पुढाकार घेत आहेत.

# गोदातीर समाचार

दि.०८ सप्टेंबर २०१७

## श्री शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी रविवारी उद्‌बोधन शिबीर

**परभणी/प्रतिनिधी .** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील इंग्रजी आणि विभागाच्यावतीने येत्या रविवारी (दि.१०) मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातील प्राध्यापकांसाठी एक दिवसीय उद्‌बोधन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या उद्‌बोधन सत्रात इंग्रजी, हिंदी, मराठीव उर्दू तसेच वाणिज्य विषयावर चर्चा होणार आहे.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातील प्राध्यापक वर्गामध्ये अध्ययन-अध्यापन-संशोधन कौशल्य विकसीत व्हावेत या भूमिकेतून उद्‌बोधन सत्राचे आयोजन केले जाते. या सत्रामध्ये 'मनुष्यबळ संसाधन संपन्नता' या मुख्य विषयावर चर्चा होणार आहे. भाषा विषयासाठी आयोजित उद्‌बोधन कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी बी.सी.यु.डी. प्रा.डॉ.खान, प्राचार्य आर.टी.देशमुख(गंगापूर), उपप्राचार्य डॉ.सुरेश पैठणकर, डॉ.बळीराम धापसे(वैजापूर) सहभागी होणार आहेत. वाणिज्य विषयक उद्‌बोधन कार्यक्रमात साधन व्यक्ती व विषयतज्ञ म्हणून प्रोफेसर तथा संशोधक डॉ.एम.एन.सोंडगे, डॉ.सी.के.हरनावळे, डॉ.प्रभाकर हरकळ आदी उपस्थित राहणार आहेत. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव उपस्थित राहणार आहेत. उद्‌बोधन कार्यक्रम यशस्वीतेसाठी इंग्रजी विभागप्रमुख व उपप्राचार्या डॉ.विजया नांदापुरकर, प्रा.डॉ.मदन परतूरकर प्रयत्नशील आहेत.

देशोन्नती ६
बुधवार, दि. १३ सप्टेंबर २०१७
epaper.-deshonnati.com

# आंतरविद्याशाखीय संशोधनाची आज गरज - डॉ. खान

**शहर प्रतिनिधी / १२ सप्टेंबर**

**परभणी :** भारतामध्ये भाषा, संस्कृती, धर्म आणि तत्वज्ञानातील मौलिक विचार लक्षात घेता आंतरविद्याशाखीय संशोधन समोर आले तर सर्व जगाला ते मार्गदर्शक ठरेल असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी संचालक प्रा.डॉ.ए.जी. खान यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील भाषा व वाणिज्य व्यवस्थापण शाखेच्या वतीने राज्यस्तरीय उद्बोधन शिबीराचे बिज भाषक म्हणून डॉ. खान बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधवा तर उद्घाटक म्हणून प्राचार्य आर.टी. देशमुख, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर, डॉ. मदन परतूरकर हे मंचावर उपस्थित होते. भाषा संशोधनातील नवपैलू या विषयावर बोलतांना डॉ. खान म्हणाले की, उच्च शिक्षणातील समान संधी ग्रामीण भागापर्यंत अजूनही पोहोचल्या नाहीत. जे शिक्षण पोहचले आहे त्यात गुणवत्ता नाही. कौशल्यपुर्ण शिक्षणाची आजच्या समाजाला खरी गरज आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आज उच्च शिक्षणात बदल होत आहेत. परंतू हे बदल अपुरे आहेत. संशोधन ही दिर्घ चालणारी प्रक्रिया आहे. यातून समाजमन रचनात्मक दृष्टीने बदलले पाहिजे हे संशोधकांनी समोर ठेवून अध्यायन - अध्यापन केले पाहिजे. प्राचार्य आर.टी.देशमुख यांनी उद्घाटकीय भाषणात प्राध्यापकांच्या प्रशिक्षणाचे महत्व प्रतिपादन करून बौध्दिक संपदा अधिकारी मिळविण्यासाठी संशोधकांनी प्रयत्न केले पाहिजेत. असे आवाहन केले. याप्रसंगी समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, समन्वयक उपप्राचार्य डॉ. नांदापुरकर, डॉ. परतूरकर यांनी मानवी संसाधन संपन्नतेचे अध्ययन- अध्यापनातील महत्व सांगितले. वाणिज्य व्यवस्थापण शाखेत नांदेड येथील डॉ. सी.के. हरणावळे, डॉ. प्रभाकर हारकळ, डॉ.एम.एन.सोंडगे तर भाषा विषयासाठी उपप्राचार्य डॉ. सुरेश पैठणकर, डॉ. बळीराम धापसे, डॉ. अजय देशमुख आदींनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचलन डॉ. एम.ए. शेख बागवान तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. सलीम मोहियोद्दिन यांनी केले. शिबीरास दोनशे प्राध्यापक उपस्थित होते.

दैनिक समर्थ दिलासा
शुक्रवार, दि. १५ सप्टेंबर २०१७ पान नं. ३

# तायक्कांदो स्पर्धेत शिवाजी महाविद्यालयाचे यश

सोनपेठ दि.१४(प्रतिनिधि): येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठाच्या ड झोन तायक्कांदो स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात परभणीतील शिवाजी महाविद्यालयाचे संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, तर प्रमुख पाहूणे म्हणुन संत जनाबाई महाविद्यालयाचे डॉ.चंद्रकांत सातपुते, नागनाथ महाविद्यालय औंढाचे डॉ.साहेबराव देवकते, तालुका क्रिडा संयोजक सुमित लांडे, प्रा.डॉ.बापूराव आंधळे हे उपस्थित होते.

या स्पर्धेत श्री. शिवाजी महाविद्यालय परभणीच्या संघाने विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून तायक्कांदो असोशिएशन परभणीचे ख्वाजा अन्सारी,हुसेन पठाण, अखिल चौधरी, विलास मस्के, अमन खान, प्रल्हाद राठोड व डॉ.गुरूदास लोकरे, डॉ.विनोद गणाचार्य,प्रा.पवन पाटील यांनी काम पाहिले. तर संघव्यवस्थापक म्हणून प्रा.संतोष कोकिळ, प्रा. नलगे जी.बी.,प्रा.अतिष खंदारे यांनी सहभाग नोंदवला. या एक दिवशीय ड झोन स्पर्धेत शिवाजी महाविद्यालय परभणी प्रथम, शिवाजी महाविद्यालय हिंगोली द्वितीय, शारदा महाविद्यालय परभणी संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रिडा संचालक गोविंद वाकणकर यांच्यासह क्रिडा समितीच्या सदस्यांनी सहकार्य केले. महालिंग मेहत्रे, प्रा.अंगद गायकवाड, प्रा.सुरेश मोरे, प्रा.जीवन भोसले यांच्यासह बाबुराव फड, संतुक कुलकर्णी, संतुक परळकर, चंदू पटके, भागवत हाके यांनी सहकार्य केले.

लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि.१५ सप्टेंबर २०१७ ४

राज्यस्तरीय उद्‌बोधन शिबीर: ए.जी. खान यांचे मत

# आंतरविद्याशाखीय संशोधनाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

यावेळी प्राचार्य आर.टी. देशमुख यांनीही मार्गदर्शन केले. ते म्हणाले, संशोधकांनी बौद्धिक संपदा अधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी मानवी संसाधन संपन्नतेचे अध्ययन, अध्यापनातील महत्त्व सांगितले. यावेळी राज्यातील २०० प्राध्यापकांची या कार्यक्रमास उपस्थिती होती.

परभणी : भाषा संस्कृती, धर्म आणि तत्वज्ञानातील मौलिक विचार लक्षात घेता आंतरविद्याशाखीय संशोधन समोर आले तर जगाला ते मार्गदर्शक ठरतील, असे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी संचालक तथा भाषा तज्ज्ञ प्रा.डॉ.ए.जी. खान यांनी व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात भाषा व वाणिज्य, व्यवस्थापन शाखेच्या वतीने ११ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय उद्‌बोधन शिबीर पार पडले. यावेळी भाषा संशोधनातील नव पैलू या विषयावर मार्गदर्शन करताना खान बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव तर उद्घाटक म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे महाविद्यालय विकास अधिकारी प्राचार्य आर.टी. देशमुख, उपप्राचार्य डॉ.विजया नांदापूरकर, डॉ.मदन परतूरकर आदींची उपस्थिती होती. खान म्हणाले, उच्च शिक्षणातील समान संधी ग्रामीण भागापर्यंत अजूनही पोहचली नाही. जे शिक्षण पोहचले त्यात गुणवत्ता नाही. त्यामुळे आजच्या समाजाला कौशल्यपूर्ण शिक्षणाची खरी गरज असल्याचे त्यांनी सांगितले. संशोधन ही दीर्घ चालणारी प्रक्रिया आहे. यातून रचनात्मक दृष्टीने समाजमन बदलले पाहिजे, हे संशोधकांनी समोर ठेवून अध्यापन, अध्ययन केले पाहिजे, असे ते म्हणाले. याप्रसंगी नांदेड येथील डॉ.सी.के. हरनावळे, डॉ.प्रभाकर हरकळ, डॉ.एम.एन. सोंडगे, उपप्राचार्य डॉ.सुरेश पैठणकर, डॉ.बळीराम धापसे, डॉ.अजय देशमुख यांनीही मार्गदर्शन केले.

देशोन्नती
रविवार, दि. १७ सप्टेंबर २०१७

# जिल्हास्तरीय भाषा विषयाच्या प्रशिक्षण शिबीरास प्रतिसाद

**शहर प्रतिनिधी** / १६ सप्टेंबर

**परभणी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार भाषा विषयाचे कृती पत्रीकाविषयी जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर येथील श्री शिवाजी महाविद्यालयात पार पडले.

शिबीराला उद्घाटक म्हणुन जि. प. परभणीचे शिक्षणाधिकारी बी. आर. कुंडगीर यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रमुख पाहुणे म्हणुन शिक्षण विस्तार अधिकारी निरपणे, उपप्राचार्य आप्पासाहेब डहाळे, पर्यवेक्षक बाबुराव आंधळे, केंद्र समन्वयक के. ए. गोरे, प्रा. व्हि. व्हि. शिंगणे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना शिक्षणाधिकारी कुंडगिर म्हणाले कि, कृतीपत्रीकाही विद्यार्थ्यांना कृतीशिल बनवुन विचार करण्यास प्रवृत्त करते. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केला. मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, उर्दु विषयाच्या तज्ञ प्राध्यापकांना दोन सत्रामध्ये प्रशिक्षण देण्यात आले. शिबीराचे संयोजक म्हणुन प्रा. किर्तीजय गोरे यांनी काम पाहिले. नितीन चौधरी सुत्रसंचालन, प्रा. विनोद शिंगणे यांनी आभार मानले.



**परभणी :** येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजीत भाषा विषयाच्या जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन दिप प्रज्वलन करुन शिक्षण अधिकारी बी. आर. कुंडगिर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, निरपणे, आप्पासाहेब डहाळे, बाबुराव आंधळे, के. ए. गोरे, प्रा. व्हि. व्हि. शिंगणे व इतर.

लोकमत

# परभणी

औरंगाबाद, रविवार, दि.१७ सप्टेंबर २०१७

## जयदीप भराडेची निवड

परभणी- महाराष्ट्र असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या खुल्या क्रिकेट स्पर्धेसाठी श्री शिवाजी महाविद्यालयाचा विद्यार्थी जयदीप भराडे याची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तो निंबाळकर करंडकासाठी महाराष्ट्राकडून खेळणार आहे. याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा.डॉ.बाळासाहेब जाधव, प्रा.डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर, प्रा.संतोष कोकीळ यांची उपस्थिती होती.

रविवार, १७ सप्टेंबर २०१७

पुण्य नगरी

# परभणीचा जयदीप भराडे महाराष्ट्र संघात

परभणी- महाराष्ट्र असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या खुल्या क्रिकेट स्पर्धेसाठी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या जयदीप भराडे या खेळाडूची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. तो निंबाळकर करंडकासाठी महाराष्ट्र संघातून खेळणार आहे. या स्पर्धेत तो चार कसोटी सामने खेळणार आहे.

जयदीप भराडे हा मागील चार वर्षांपासून १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघात खेळत होता. त्याच्या या कामगिरीवरच त्याची निवड निंबाळकर करंडकासाठी झाली. जयदीप भराडे हा श्री शिवाजी महाविद्यालयात बी. ए. प्रथम वर्षात शिकत आहे. जयदीपला प्रा. संतोष कोकीळ, सुनील चव्हाण, राजेसाहेब रेंगे, प्रवीण चालक आदींनी मार्गदर्शन केले. जयदीपच्या यशाबद्दल मंडळाचे प्रकाश सोळंके, आ. सतीश चव्हाण, हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डहाळे आदींनी स्वागत केले आहे.

परभणी Next लोकमत
परभणी ▶ सोमवार, १८ सप्टेंबर २०१७

## शिवाजी महाविद्यालय जिल्हास्तरीय कृतिपत्रिका प्रशिक्षण शिबिरास दाद

**परभणी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार इयत्ता ११ वी भाषा विषयाचे कृत्रिपत्रिका विषयी जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात नुकतेच पार पडले.या शिबिराचे उद्घाटन शिक्षणाधिकारी बी. आर. कुंडगीर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी निरपणे होते. यावेळी बी. आर. कुंडगीर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य अप्पाराव डहाळे, पर्यवेक्षक बाबूराव आंधळे यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता ११ वीच्या प्रश्नपत्रिकेत बदल करून मंडळाने कृतीपत्रिका तयार केली आहे. त्या संदर्भात मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, उर्दू विषयाच्या तज्ञ प्राध्यापकांनी सर्व विषय प्राध्यापकांना दोन सत्रामध्ये प्रशिक्षण दिले. शिबिर संयोजक म्हणून किर्तीजय गोरे यांनी काम पाहिले. प्रास्ताविक किर्तीजय गोरे यांनी केले. नितीन चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. विनोद शिंगणे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व भाषा विषयाच्या प्राध्यापकांनी पुढाकार घेतला..

## परभणीच्या जयदीप भराडे याची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**परभणी:** महाराष्ट्र असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या खुल्या क्रिकेट स्पर्धेसाठी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या जयदीप भराडे या खेळाडूची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. तो निंबाळकर करंडकासाठी महाराष्ट्र संघातून खेळणार आहे. या स्पर्धेत तो चार कसोटी सामने खेळणार आहे. जयदीप भराडे हा मागील चार वर्षापासून १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघात खेळत होता. त्याच्या या कामगिरीवरच त्याची निवड निंबाळकर करंडकासाठी झाली. जयदीप भराडे हा श्री शिवाजी महाविद्यालयात बी. ए. प्रथम वर्षात शिकत आहे. जयदीपला प्रा. संतोष कोकीळ, सुनील चव्हाण, राजेसाहेब रेंगे, प्रवीण चालक आदींनी मार्गदर्शन केले. जयदीपच्या यशाबद्दल मंडळाचे प्रकाश सोळंके, आ. सतीश चव्हाण, हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डहाळे आदींनी स्वागत केले आहे.

देशोन्नती

सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०१७
epaper.-deshonnati.com

थोडक्यात

# जयदिप भराडे महाराष्ट्राच्या संघात

**परभणी :** महाराष्ट्र असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या खुल्या क्रिकेट स्पर्धेसाठी श्री शिवाजी महाविद्यालयाच्या जयदिप भराडेची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तो निंबाळकर करंडकासाठी महाराष्ट्राकडुन खेळणार आहे. या स्पर्धेत जयदिप भराडे हा चार कसोटी सामने खेळणार आहे.

चार वर्षापासुन तो १९ वर्षाखालील महाराष्ट्राच्या संघात खेळत होता. जयदिप भराडे हा श्री शिवाजी महाविद्यालयात बीए प्रथम वर्षात शिकत आहे. जयदिपची महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. जयदिप भराडे यास क्रिडा विभाग प्रमुख प्रा. संतोष कोकीळ, प्रा. सुनिल चव्हाण, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रविण चालक यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या यशाबद्दल म.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष माजी आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतिश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर, डहाळे यांनी अभिनंदन केले आहे.



**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयाचा विद्यार्थी जयदिप भराडे याची निंबाळकर करंडक क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, प्रा. संतोष कोकीळ, प्रा. रोहिदास नितोंडे व इतर.

सकाळ

नांदेड, बुधवार
२० सप्टेंबर २०१७

३

# परभणी



परभणी : शिवाजी महाविद्यालयाच्या जयदीप भराडे याची राज्य क्रिकेट संघात निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी सत्कार केला. या वेळी प्रा. संतोष कोकीश, डॉ. श्रीनिवास केशेट्टी आदी.

हॅलो परभणी

लोकमत औरंगाबाद, बुधवार, दि. २० सप्टेंबर २०१९ २

# समाजशास्त्र हे मानवाला कृतीप्रवण दृष्टी देते

## अभ्यास मंडळाचे उद्घाटन : चव्हाण यांचे मत

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** :- माणूस घडविण्याचे काम शिक्षणातून होणे गरजेचे आहे. सर्वच ज्ञानशाखा मानव विकासासाठीच आहेत. समाजशास्त्र ही ज्ञानशाखा मानवाला संवेदनशील व कृतीप्रवण दृष्टी देते, असे प्रतिपादन प्रा.डॉ.डी.एस. चव्हाण यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागात अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी चव्हाण बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे होते. यावेळी उपप्राचार्या डॉ.विजया नांदापूरकर, प्रा.प्रल्हाद भोपे यांची उपस्थिती होती.

चव्हाण म्हणाले, समाजशास्त्र विभागात समृद्ध अशी मान्यवरांची परंपरा लाभली आहे. या विभागातील प्रा.उत्तम भोईटे यांनी आंतर राष्ट्रीयस्तरावर कार्य केले आहे. ही परंपरा समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी पुढे सुरु ठेवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव म्हणाले, समाजशास्त्र अभ्यासमंडळ हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. समाजापुढील समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी सतर्क असले पाहिजे. प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बी.ए. व एम.ए. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. दीपाली नरहिरे, सोनाली खरोडे यांनी सूत्रसंचालन केले. छत्रगुण ढवळे यांनी आभार मानले.

देशोन्नती

मंगळवार, दि. १९ सप्टेंबर २०१७ ६

# समाजशास्त्र माणसाला संवेदनशील दृष्टी देते - डॉ. चव्हाण

**कार्यालय प्रतिनिधी / १८ सप्टेंबर**

**परभणी :** समाजशास्त्र हे माणवाला संवेदनशील व कृतीप्रवण दृष्टी देते, असे प्रतिपादन प्रा.डॉ.डि.एस. चव्हाण यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. चव्हाण बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे होते. यावेळी बोलतांना डॉ. चव्हाण म्हणाले की, विज्ञानासाठी प्रयोगशाळा ही चार भिंतीची असु शकते, परंतू समाजशास्त्र विषयाची प्रयोगशाळा ही संबंध समाजच आहे. तेव्हा समाजशास्त्राची ज्ञानशाखा मानवाला संवेदनशील व कृतीप्रवन दृष्टी देते असेही ते म्हणाले. समाजशास्त्र विभागास समृध्द अशी मान्यवरांची परंपरा लाभली आहे. प्रा. उत्तम भोईटे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर काम केल्याचेही डॉ. चव्हाण म्हणाले. यावेळी प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर, प्रा. प्रल्हाद भोपे यांची उपस्थिती होती. या प्रसंगी बी.ए. प्रथम वर्ष, एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

सुत्रसंचालन दिपाली नरहिरे, सोनाली खरोडे तर आभार छत्रगुण ढवळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. विश्वनाथ सुर्यवंशी, प्रा. अर्चना बंग, प्रा. स्वाती देशमुख, प्रा. स्वप्ना चट्टे आदींनी परिश्रम घेतले.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि.२१ सप्टेंबर २०१७ ४

## क्रिकेट स्पर्धेत यश

परभणी- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन ड झोन क्रिकेट स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने जेतेपद पटकावले. या संघात जयदीप भराडे, अतिष खिल्लारे, प्रमोद ईक्कर, कुणाल ढगे, दत्ता धृतराज, अक्षय भांगे, शुभम खताळ, सचिन जोगदंड, सागर गायकवाड, समीर मस्के, ओंकार रेंगे, सौरभ जोगदंड, सुमेध जगतकर, शुभम घुगे, गजानन जाधव, विश्वजीत सूर्यतळ या खेळाडुंचा समावेश होता.

पुण्य नगरी
गुरुवार, २१ सप्टेंबर २०१७ | परभणी- हिंगोली

# आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत शिवाजी संघ विजयी



परभणी / प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन 'ड' झोन क्रिकेट स्पर्धेत येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने सतत चौथ्या वर्षी विजेतेपद प्राप्त केले.

या स्पर्धेत ११ संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत शिवाजीच्या संघाने २० षटकात २६० धावा काढण्याचा विक्रम केला आहे. याचबरोबर विविध संघावर एकतर्फी विजय प्राप्त करीत संघाने हे यश मिळविले आहे. या संघात जयदीप भराडे, अतिश खिल्लारे, प्रमोद ईक्कर, कुणाल ढगे, दत्ता धुतराज, अक्षय भांगे, शुभम खताळ, सचिन जोगदंड, सागर गायकवाड, समीर मस्के, ओंकार रेंगे, सौरभ जोगदंड, सुमेध जगतकर, शुभम घुगे, गजानन जाधव, विश्वजीत सूर्यतळ या खेळाडूंचा समावेश होता. संघास क्रीडा विभागाचे संतोष कोकीळ, सुनील चव्हाण, राजेसाहेब रेंगे, प्रवीण चाळक आदींनी मार्गदर्शन केले. संघाच्या या यशाबद्दल मंडळाचे प्रकाश सोळंके, सतीश चव्हाण, हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डहाळे आदींनी स्वागत केले आहे.

सकाळ
नांदेड, गुरुवार
२१ सप्टेंबर २०१७
४

# परभणी



**परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयात योग शिबिराचे उद्घाटन करताना प्रसंगी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. जयप्रकाश गायकवाड, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. अनिल बडगुजर आदी.**

## 'शिवाजी'त योग शिबिराचे उद्घाटन

परभणी, ता. २० : विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत स्वामी विवेकानंद अध्यासन केंद्रातर्फे श्री शिवाजी महाविद्यालयाच्यावतीने ता. १० ते ३० सप्टेंबरदरम्यान योग आणि प्राणायाम शिबिराचे आयोजन केले आहे. ता. दहा सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजता या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी स्वामी विवेकानंद अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. जयप्रकाश गायकवाड, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. के. एल. कदम, प्रा. अमृत पतंगे, डॉ. श्रीदेवी कडगे, ई. जी. देवकर, प्रा. अनिल बडगुजर, प्रा. व्ही. एम. सूर्यवंशी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ता. १३ ते १७ सप्टेंबर या काळात पतंजली योगपीठ हरिद्वार परभणी जिल्ह्याच्या प्रचारिका लक्ष्मी खरात व शिवाजी खरात यांनी योग व प्राणायामाचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणाचा लाभ प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांनी घेतला.

सकाळ
नांदेड, शुक्रवार
२२ सप्टेंबर २०१७
४
TODAY
परभणी




परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने मंगळवारी आयोजित 'हिंदी दिवस समारोह' प्रसंगी बोलताना अमितकुमार दीपक.

# हिंदी राष्ट्रीय एकता वृद्धिंगत करणारी भाषा

परभणी, ता. २१ : भारत हा बहुविध भाषा-प्रदेश देश असल्याने सामाजिक आणि सांस्कृतिक विविधता दिसून येते. या विविधतेला एकसूत्रात बांधण्याचे, महत कार्य करून देशाची राष्ट्रीय एकता वृद्धिंगत करण्याचे कार्य हिंदी भाषा करत आहे, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक अमितकुमार दीपक यांनी केले. श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित मंगळवारी (ता. १९) 'हिंदी दिवस समारोह' प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. एन. केशेट्टी होते. पुढे बोलताना ते म्हणाले, आज हिंदी व्यापाराची भाषा बनली आहे. देशातच नव्हे तर विदेशातील अनेक विद्यापिठात हिंदी अभ्यासली व शिकवली जाते. ऑक्सफोर्ड डिक्शनरीत दरवर्षी हिंदीचे अनेक शब्द जोडले जात आहेत हे या भाषेच्या विकासाचे लक्षण आहे. रत्नमाला गोरे व ज्ञानेश्वर पवार या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. एस. एल. राठोड यांनी प्रास्ताविक तर डॉ. जयंत बोबडे यांनी सूत्रसंचालन केले.

झुंजार नेता
■ दिनांक : २१ सप्टेंबर २०१७ ■ गुरुवार

# हिंदी राष्ट्रीय एकता वृध्दिंगत करणारी भाषा–अमितकुमार दीपक यांचे प्रतिपादन

परभणी- भारत हा बहुविध भाषा-प्रांत देश असल्याने सामाजिक आणि सांस्कृतिक विविधता दिसून येते. या विविधतेला एकसूत्रात बांधण्याचे महत्त्वाचे कार्य करून देशाची राष्ट्रीय एकता वृध्दिंगत करण्याचे कार्य हिंदी भाषा करत आहे, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापक अमितकुमार दीपक यांनी केले. ते श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित हिंदी दिवस समारोह प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी पुढे बोलताना ते म्हणाले की आज हिंदी व्यापाराची भाषा बनली आहे. देशातच नव्हे तर विदेशातील अनेक विद्यापीठात हिंदी अभ्यासली व शिकवली जाते. ऑक्सफोर्ड डिक्शनरीत दरवर्षी हिंदीचे अनेक शब्द जोडले जात आहेत हे या भाषेच्या विकासाचे लक्षण आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना उपप्राचार्य डॉ. एस. एन. केजोंगी म्हणाले की हिंदी देशातील बहुभाषिक नागरिकांना वैचारिक व भावनिक दृष्ट्या एकसूत्रात बांधण्याचे काम करत आहे. यावेळी हिंदी विभागाध्यक्ष डॉ एस.एन.राठोड व डॉ राजन जाधव यांनी मनोगते मांडली. [illegible] गीते व ज्ञानेश्वर



पवार या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे पाहुण्यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस.एन. राठोड, सूत्रसंचालन डॉ अनंत बोबडे तर आभार प्रा. राजेंद्र बायस यांनी केले. या प्रसंगी डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुधीर इंगळे, प्रा.प्रशांत सराफ, डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा. राजू बडूरे सहित विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशोन्नती २
शुक्रवार, दि. २२ सप्टेंबर २०१७
epaper.·deshonnati.com

# क्रिकेट स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाला विजेते पद

**शहर प्रतिनिधी / २१ सप्टेंबर**

**परभणी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन ड झोन क्रिकेट मुले स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने सतत चौथ्या वर्षी विजेते पद पटकाविले आहे.

या स्पर्धेत एकुण ११ संघांचा सहभाग होता. महाविद्यालयाच्या संघाने प्रतिस्पर्धी संघावर एकतर्फी मात करीत हा विजय संपादन केला. याच स्पर्धेत २० षटकात २६० धावा काढण्याचा विक्रम देखील या संघाने केला. महाविद्यालयाच्या संघात राष्ट्रीय खेळाडु जयदीप भराडे, अतिष खिल्लारे, प्रमोद इक्कर, कुनाल ढगे, दत्ता धुतराज, अक्षय भांगे, शुभम खताळ, सचिन जोगदंड, सागर गायकवाड, समीर मस्के, ओंकार रेंगे, सौरभ जोगदंड, जगतकर सुमेध, शुभम घुगे, गजानन जाधव, विश्वजीत सुर्यतळ या खेळाडुंचा समावेश होता. या खेळाडुंना क्रिडा विभागप्रमुख प्रा. संतोष कोकीळ, प्रा. सुनिल चव्हाण, प्रा. राजेसाहेब रेंगे व प्रविण चालक यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अध्यक्ष प्रकाश सोळंके, माजी आ. सतिश चव्हाण, हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर, डहाळे, महाविद्यालयाचे प्राध्यापक व कर्मचारी आदींनी संघाचे अभिनंदन केले आहे.

पुण्य नगरी
शुक्रवार, २२ सप्टेंबर २०१७ | परभणी- हिंगोली

# हिंदी राष्ट्रीय एकता वृध्दिंगत करणारी भाषा - अमितकुमार

परभणी - भारत हा बहुविध भाषा-प्रदेश देश असल्याने देशात सामाजिक आणि सांस्कृतिक विविधता दिसून येते. या विविधतेला एकसूत्रात बांधण्याचे कार्य करून देशाची राष्ट्रीय एकता वृध्दिंगत करण्याचे कार्य हिंदी भाषा करीत आहे, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक अमितकुमार दीपक यांनी केले.

शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'हिंदी दिवस समारोह' कार्यक्रमात त्यांनी मार्गदर्शन केले. पुढे बोलतांना ते म्हणाले की हिंदी व्यापाराची भाषा बनली आहे. देशातच नव्हे तर विदेशातील अनेक विद्यापिठात हिंदी अभ्यासली व शिकवली जाते. ऑक्सफोर्ड डिक्शनरीत दरवर्षी हिंदीचे अनेक शब्द जोडले जात आहेत. हे या भाषेच्या विकासाचे लक्षण आहे. कार्यक्रमाच्या अंध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. एन. केशेट्टी होते. यावेळी डॉ. एस. एन. केशेट्टी म्हणाले की हिंदी देशातील बहुभाषिक नागरिकांना वैचारिक व भावनिकदृष्ट्या एकसूत्रात बांधण्याचे काम करीत आहे. यावेळी हिंदी विभागाध्यक्ष डॉ.एस.एल. राठोड व डॉ.संजय जाधव यांनी मनोगत मांडले. रत्नमाला गोरे व ज्ञानेश्वर पवार या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एस.एल. राठोड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.जयंत बोबडे यांनी केले तर आभार राजेंद्र वायाळ यांनी मानले. यावेळी डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुधीर इंगळे, प्रशांत सराफ, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रल्हाद भोपे, राजू बडूरे, तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**देशोन्नती** परभणी - गुरुवार, दि २१ / सप्टेंबर २०१७

## शिवाजी महाविद्यालयात योग, प्राणायाम शिबीर

**परभणी :** स्वामी विवेकानंद अध्यासन केंद्र व विद्यापीठ अनुदान आयोगाच्यावतीने शिवाजी महाविद्यालयात १० ते ३० सप्टेंबर दरम्यान योग, प्राणायाम शिबीर घेण्यात येत आहे. या शिबीरास साधकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव यांच्याहस्ते शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी केंद्राचे समन्वयक डॉ. जयप्रकाश गायकवाड, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. के.एल. कदम, प्रा. अमृत पतंगे, डॉ. श्रीदेवी कडगे, ई.जी. देवकर, प्रा. अनिल बडगुजर, प्रा. व्ही.एम. सुर्यवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिबीरार्थींना योगशिक्षक शिवाजी खरात, लक्ष्मीबाई खरात हे मार्गदर्शन करत आहेत.

**देशोन्नती** गुरुवार, दि. २१ सप्टेंबर २०१७

## हिंदी राष्ट्रीय एकता वृध्दींगत करणारी भाषा - अमितकुमार दिपक

**कार्यालय प्रतिनिधी / २० सप्टेंबर**

**परभणी :** भारत हा बहुविध भाषा, प्रदेशांचा देश असल्याने सामाजिक आणि सांस्कृतिक विविधता दिसून येते. या विविधतेला एकसूत्रात बांधण्याचे, महत कार्य करून देशाची राष्ट्रीय एकता वृध्दिंगत करण्याचे कार्य हिंदी भाषा करत आहे. असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक अमितकुमार दीपक यांनी केले. ते श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'हिंदी दिवस समारोह' प्रसंगी बोलत होते.



**परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयात हिंदी दिवसा प्रसंगी मार्गदर्शन करतांना अमितकुमार दिपक व इतर मान्यवर.**

या प्रसंगी पुढे बोलताना ते म्हणाले की आज हिंदी व्यापाराची भाषा बनली आहे. देशातच नव्हे तर विदेशातील अनेक विद्यापिठात हिंदी अभ्यासली व शिकवली जाते. ऑक्सफोर्ड डिक्शनरीत दरवर्षी हिंदीचे अनेक शब्द जोडले जात आहेत हे या भाषेच्या विकासाचे लक्षण आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना उपप्राचार्य डॉ. एस.एन. केशेट्टी म्हणाले की हिंदी देशातील बहुभाषिक नागरिकांना वैचारिक व भावनिक दृष्ट्या एकसूत्रात बांधण्याचे काम करत आहे. यावेळी हिंदी विभागाध्यक्ष डॉ एस.एल.राठोड व डॉ संजय जाधव यानी मनोगते मांडली. रत्नमाला गोरे व ज्ञानेश्वर पवार या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भितिपत्रकाचे पाहुण्यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस.एल. राठोड, सूत्रसंचालन डॉ जयंत बोबडे तर आभार प्रा. राजेंद्र बायाळ यांनी मानले. या प्रसंगी डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुधीर इंगळे, प्रा.प्रशांत सराफ, डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा. राजू बडूरे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकमत
परभणी Next
परभणी ▶ शनिवार,२३ सप्टेंबर २०१७

# हिंदी दिवस समारोह उत्साहात

**परभणी : प्रतिनिधी**

भारत हा बहुविध भाषा-प्रदेश देश असल्याने देशात सामाजिक आणि सांस्कृतिक विविधता दिसून येते. या विविधतेला एकसूत्रात बांधण्याचे कार्य करून देशाची राष्ट्रीय एकता वृध्दिगत करण्याचे कार्य हिंदी भाषा करीत आहे, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक अमितकुमार दीपक यांनी केले.

शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'हिंदी दिवस समारोह' कार्यक्रमात त्यांनी मार्गदर्शन केले. पुढे बोलतांना ते म्हणाले की हिंदी व्यापाराची भाषा बनली आ-हे. देशातच नव्हे तर विदेशातील अनेक विद्यापिठात हिंदी अभ्यासली व शिकवली जाते. ऑक्सफोर्ड डिक्शनरीत दरवर्षी हिंदीचे अनेक शब्द जोडले जात आहेत. हे या भाषेच्या विकासाचे लक्षण आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. एन. केशेट्टी होते. यावेळी डॉ. एस. एन. केशेट्टी म्हणाले की हिंदी देशातील बहुभाषिक नागरिकांना वैचारिक व भावनिकदृष्ट्या एकसूत्रात बांधण्याचे काम करीत आहे. यावेळी हिंदी विभागाध्यक्ष डॉ.एस.एल.राठोड व डॉ.संजय जाधव यांनी मनोगत मांडले. रत्नमाला गोरे व ज्ञानेश्वर पवार या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एस.एल. राठोड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.जयंत बोबडे यांनी केले तर आभार राजेंद्र वायाळ यांनी मानले.

परभणी
आदर्श गांवकरी
४
शनिवार, दि. २३ सप्टेंबर २०१७

# हिंदी दिवस समारोह उत्साहात साजरा

**परभणी : प्रतिनिधी**

श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विभागातर्फे हिंदी दिवस कार्यकमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अमितकुमार म्हणाले की, भारत हा बहुविध भाषा-प्रदेश देश असल्याने देशात सामाजिक आणि सांस्कृतिक विविधता दिसून येते.

या विविधतेला एकसूत्रात बांधण्याचे कार्य करून देशाची राष्ट्रीय एकता वृध्दिंगत करण्याचे कार्य हिंदी भाषा करीत आहे, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक अमितकुमार दीपक यांनी केले.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, हिंदी व्यापाराची भाषा बनली आहे. देशातच नव्हे तर विदेशातील अनेक विद्यापिठात हिंदी अभ्यासली व शिकवली जाते. ऑक्सफोर्ड डिक्शनरीत दरवर्षी हिंदीचे अनेक शब्द जोडले जात आहेत. हे या भाषेच्या विकासाचे लक्षण आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. एन. केशेट्टी होते.

यावेळी डॉ. एस. एन. केशेट्टी म्हणाले की, हिंदी देशातील बहुभाषिक नागरिकांना वैचारिक व भावनिकदृष्ट्या एकसूत्रात बांधण्याचे काम करीत आहे. यावेळी हिंदी विभागाध्यक्ष डॉ.एस.एल.राठोड व डॉ.संजय जाधव यांनी मनोगत मांडले. रत्नमाला गोरे व ज्ञानेश्वर पवार या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एस.एल. राठोड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.जयंत बोबडे यांनी केले तर आभार राजेंद्र वायाळ यांनी मानले.

सकाळ
नांदेड, गुरुवार
२८ सप्टेंबर २०१७
३

TODAY
# परभणी

## अवतीभवती



**परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विजयी संघासोबत आमदार सतीश चव्हाण, हेमंतराव जामकर, सदस्य केशवअण्णा दुधाटे, डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. जयंत बोबडे, प्रा. डॉ. पी. बी. खरात, प्रा. सविता कोकाटे, प्रा. गणेश चालीन्दरवार आदी.**

## युवक महोत्सवात शिवाजी महाविद्यालयाला सहा पदके

परभणी, ता. २७ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व ग्रामीण कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नांदेड यांच्या वतीने आयोजित 'वसुंधरा-२०१७' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने यशाची परंपरा कायम राखत सहा पदके मिळविली. हा महोत्सव नांदेड येथे २२ ते २६ सप्टेंबरदरम्यान पार पडला.कोलाज, रांगोळी या कलाप्रकारात शिवाजी महाविद्यालयाच्या मीनल शेटेने सुवर्ण, कलात्मक जुळवणी या कलाप्रकारात मीनल शेटे, रमेश गायकवाड, संकेत गाडेकर आणि आकाश भुमरे यांनी सुवर्ण पदक, शास्त्रीय नृत्य व अभिनयात ऐश्वर्या डावरेने रजत तर शास्त्रीय सुरवाद्य या कलाप्रकारात कृष्णा शिनगारेने रजत पदक मिळविले. या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या २३ विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, समूह गायन, सुगम गायन, पोवाडा, मुकाभिनय, मूर्तीकला व एकांकिका आदी कला प्रकारात सहभाग घेतला होता. या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, सदस्य केशव दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस. एन. केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. जयंत बोबडे, संघव्यवस्थापक डॉ. पी. बी. खरात, संगीत विभागप्रमुख प्रा. एस. के. कोकाटे, प्रा. गणेश चालीन्दरवार आदींनी अभिनंदन केले.

पुण्य नगरी
। गुरुवार, २८ सप्टेंबर २०१७ । परभणी

# युवक महोत्सवात शिवाजी महाविद्यालयाला सहा पदके

## यशस्वी संघाचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार



परभणी / प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व ग्रामीण कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वसुंधरा-२०१७' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव नांदेड येथे २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान पार पडला. या युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने यशाची परंपरा कायम राखत सहा पदके पटकाविली.

कोलाज, रांगोळी या कलाप्रकारात मिनल शेटे हिने सुवर्ण, कलात्मक जुळवणी या कलाप्रकारात मिनल शेटे, रमेश गायकवाड, संकेत गाडेकर आणि आकाश भुमरे यांनी सुवर्णपदक, शास्त्रीय नृत्य व अभिनयात ऐश्वर्या डावरे हिने रजत तर शास्त्रीय सुरवाद्य या कलाप्रकारात कृष्णा शिनगारे याने रजतपदक मिळविले. या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या २३ विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, समूह गायन, सुगम गायन, पोवाडा, मुकाभिनय, मूर्तीकला व एकांकिका आदी कला प्रकारात सहभाग घेतला होता. या आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यातील एकूण ७३ संघांनी सहभाग घेतला होता. या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे हेमंत जामकर, सदस्य केशव दुधाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस.एन.केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. जयंत बोबडे, संघव्यवस्थापक डॉ.पी.बी.खरात, संगीत विभाग प्रमुख प्रा.एस.के.कोकाटे, प्रा. गणेश चालिंदरवार आदींनी स्वागत केले.

गुरुवार, २८ सप्टेंबर २०१७

# वसुंधरा युवक महोत्सवात शिवाजी महाविद्यालयाला सहा सुवर्ण पदक

*जिल्हा प्रतिनिधी / २७ सप्टेंबर*

**परभणी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व ग्रामीण कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वसुंधरा-२०१७' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात शिवाजी महाविद्यालयाने विविध कला प्रकारात सहा सुवर्ण पदके मिळविली आहेत.

नांदेड येथे २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान संपन्न झाला. या युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने यशाची परंपरा कायम राखत ६ पद्रके मिळविली. कोलाज, रांगोळी या कला प्रकारात मीनल शेटे हिने सुवर्ण, कलात्मक जुळवणी कला प्रकारात मीनल शेटे, रमेश गोयकवाड, संकेत गाडेकर आणि आकाश भुमरे यांनी सुवर्ण पदक, शास्त्रीय नृत्य व अभिनयात ऐश्वर्या डावरे हिने रजत तर शास्त्रीय सुर वाद्य या कलाप्रकारात कृष्णा शिनगारे याने रजत पदक मिळविले. या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या २३ विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, समूह गायन, सुगम गायन, पोवाडा, मुकाभिनय, मूर्तीकला व एकांकिका आदी कला प्रकारात सहभाग घेतला होता. या युवक महोत्सवात नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यातील एकूण ७३ संघांनी सहभाग घेतला होता. या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाशराव सोळंके, सरचिटणीस आ. सतीशराव चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, सदस्य केशवआण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस.एन. केशेट्टी, डॉ विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. जयंत बोबडे, संघव्यवस्थापक डॉ. पी.बी. खरात, संगीत विभाग प्रमुख प्रा. एस.के. कोकाटे आदींनी अभिनंदन केले.


देशोन्नती
चाहूल उद्याची
परभणी आवृत्ती




परभणी : शहरातील शिवाजी महाविद्यालयाने नांदेड येथील वसुंधरा-२०१७' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात ६ पदके मिळविली. विजयी विद्यार्थ्यांसोबत आ. सतीश चव्हाण, हेमंतराव जामकर, केशवआण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ बाळासाहेब जाधव, डॉ विजया नांदापूरकर, सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ जयंत बोबडे, प्रा डॉ पी बि खरात, प्रा सविता कोकाटे, प्रा. गणेश चालीन्दरवार व इतर.

दि.२९ सप्टेंबर २०१७

गोदातीर समाचार

# रविवारी चित्रपट रसास्वाद कार्यक्रमात 'उदाहरणार्थ नेमाडे' चित्रपट

**परभणी/प्रतिनिधी**

परभणी फिल्म क्लबच्या वतीने रविवारी (दि.०१ ऑक्टो.) चित्रपट रसास्वाद या कार्यक्रमांतर्गत परभणीत 'उदारहणार्थ नेमाडे' हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम कैझन पिक्चर्स परभणी, अरभाट फिल्मक्लब पुणे व श्री. शिवाजी महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने होत असून यावेळी आ.डॉ. राहुल पाटील, श्री. शिवाजी महाविद्यालय परभणीचे प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव आणि विश्वशांती ज्ञानपीठ परभणीचे संस्थापक अध्यक्ष यज्ञकुमार करेवार यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

चित्रपट रसास्वाद हा कार्यक्रम श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात सायंकाळी ६ बाजता होणार असून त्यावेळी 'उदाहरणार्थ नेमाडे' या चित्रपटाचे दिग्दर्शक अक्षय इंडीकर उपस्थित राहून प्रेक्षकांशी संवाद साधणार आहेत. हा ९० मिनिटाचा चित्रपट म्हणजे जेष्ठ साहित्यीक डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या समग्र व्यक्तीमत्वाचा वेध घेणारा मराठीतील पहिलाच डाक्युफिशन चित्रपट आहे. दिग्दर्शक इंडीकर या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांना सखोल माहिती देणार आहेत.

चित्रपटाकडे बघण्याचा कलात्मक दृष्टीकोन तयार व्हावा तसेच तरुणांनी योग्य मार्गदर्शन मिळावे आणि सिक प्रेक्षकांना आशयपूर्ण चित्रटांचा आस्वाद घेता यावा य उद्देशाने सुरु करण्यात आलेला परभणी फिल्म क्लबचा हा पाचव कार्यक्रम आहे. यापुर्वीही टेली फ़ल्म व मराठी चित्रपटांचा रसावाद त्या त्या चित्रपटाच्या दिग्दर्शकाच्या उपस्थितीत आवजीत करण्यात आला होता. ग कार्यक्रमास शहरातील सात्यीक, कवी, कलावंत यांची उस्थिती राहणार आहे. शहराती सर्व रसिक प्रेक्षकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून चित्रपटाचाआस्वाद घ्यावा असे आवांहन परणी फिल्मक्लबचे रवि रमेश पाठव यांच्या वतीने करण्यात आले ाहे.

देशोन्नती

बुधवार, दि .२७ सप्टेंबर २०१७

# लुबना फरहिन हमीदउल्ला खान यांना पीएचडी प्रदान



**परभणी :** येथील लुबना फरहिन हमीदउल्ला खान यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांनी उर्दु की खवातीन अफसाना निगारो पर मुखतलिफ अदबी तहेरिकात के असरात या विषयावर पिएचडीची पदवी प्रदान केली आहे. लुबाना फरहाण यांनी आपला शोध निबंध प्रा.डॉ. सलिम मोहियोद्दीन उर्दु विभाग प्रमुख श्री शिवाजी कॉलेज यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला होता. त्यांच्या कार्यासाठी प्राचार्य व्हि.बी. जाधव, डॉ. मुमताजजहाँ, प्राध्यापक वर्ग, शिक्षकवर्ग, शिवाजी कॉलेजचे बि.के. शिंदे, डॉ. हल्लाळे, डॉ. भगवान जाधव व मित्र आणि नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले.

## गोदातीर समाचार

दि.२९ सप्टेंबर २०१७

# 'वसुंधरा-२०१७' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयाला सहा पदकं

**परभणी**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व ग्रामीण कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वसुंधरा-२०१७' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव नांदेड येथे २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान संपन्न झाला.

या युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने यशाची परंपरा कायम राखत ६ पदकं मिळविली. कोलाज,रांगोळी या कलाप्रकारात मीनल शेटे हिने सुवर्ण, कलात्मक जुळवणी या कलाप्रकारात मीनल शेटे, रमेश गायकवाड, संकेत गाडेकर आणि आकाश भुमरे यांनी सुवर्ण पदक, शास्त्रीय नृत्य व अभिनयात ऐश्वर्या डावरे हिने रजत तर शास्त्रीय सुरवाद्य या कलाप्रकारात कृष्णा शिनगारे याने रजत पदक मिळविले. या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या २३ विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, समूह गायन, सुगम गायन, पोवाडा, मुकाभिनय, मूर्तीकला व एकांकिका आदी कला प्रकारात सहभाग घेतला होता. या आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यातील एकूण ७३ संघांनी सहभाग घेतला होता.

या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री प्रकाशराव सोळंके, सरचिटणीस आमदार श्री सतीशराव चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, सदस्य केशव आण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस.एन.केशेट्टी, डॉ विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. जयंत बोबडे, संघव्यवस्थापक डॉ. पी.बि. खरात, संगीत विभाग प्रमुख प्रा. एस.के. कोकाटे, प्रा. गणेश चालीन्दरवार आदींनी अभिनंदन केले

पुण्य नगरी
मंगळवार, ३ ऑक्टोबर २०१७ परभ

# 'उदाहरणार्थ नेमाडे' ला परभणीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



परभणी / प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त जेष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांच्या आयुष्याचा वेध घेणारा अक्षय इंडीकर दिग्दर्शीत मराठीतील पहिलाच डॉक्यू फिक्शन चित्रपट 'उदाहरणार्थ नेमाडे'ला परभणीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

येथील कैझन पिक्चर्स, आरभाट फिल्म क्लब पुणे व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या परभणी फिल्म क्लबच्या रसास्वाद कार्यक्रमात या चित्रपटाचे रविवार १ ऑक्टोबर रोजी सादरीकरण करण्यात आले. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक अक्षय इंडीकर, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.यू.जाधव, प्रायोजक यज्ञकुमार करेवार उपस्थित होते. कार्यक्रमात चित्रपटाच्या सादरीकरणानंतर अक्षय इंडीकर यांनी चित्रपटाची निर्मिती प्रक्रिया व अनुभव सांगितला. या चित्रपटातून भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्यातील व जीवनातील बारकावे टिपत साहित्य लेखानातील प्रेरणा अनोख्या पध्दतीने दाखविण्यात आली. अक्षय इंडीकर यांनी रसीकांच्या विविध प्रश्नांनाही उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवी पाठक यांनी केले. त्र्यंबक वडसकर यांनी सूत्रसंचालन तर ऋतुराज भोसले यांनी आभार मानले. यावेळी डॉ.आसाराम लोमटे, विठ्ठल भुसारे, नितीन लोहट, राजेंद्र गहाळ, भारत काळे, रेणू पाचपोर, बा.बा.कोटंबे, अरूण चव्हाळ, ॲड.रमेश शर्मा, केशव खटींग, अविनाश साळापुरीकर, प्रभाकर हरकळ, जयंत बोंबडे, डॉ.सचिन पाठक, माधवबुवा आजेगावकर आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दैनिक समर्थ
दिलासा
शनिवार, दि. ३० सप्टेंबर २०१७ पान नं. ४



तायक्वांदो स्पधेचे उदघाटन .. येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या क्रीडा संकुलात विभागीय तायक्वांदो स्पर्धेचे उदघाटन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व खेळाडू दिसत आहेत. (छाया: योगेश गौतम)

TUESDAY | 3 OCTOBER 2017
AURANGABAD p. 4
Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/

# Shivaji College bags six medals in 'Vasundhara-2017'



Legislator Satish Chavan, Hemant Jamkar, Keshavanna Dudhate, Principal Dr Balasaheb Jadhav, vice-principal Dr Vijay Nandapurkar, Dr Jayant Bobde, Dr PB Kharat, Prof Savita Kokate, Prof Ganesh Chalinderwar are seen with winning students.
—LT photo

LOKMAT NEWS NETWORK
PARBHANI, OCT 2

Shivaji college bagged six medals in 'Vasundhara-2017' Inter-college Youth Festival which was jointly organised by Swami Ramanand Teerth Marathwada University (SRTMU) and Rural College of Engineering, Nanded, between September 22 and 26.

In this Youth festival, 73 teams from Nanded, Hingoli, Parbhani and Latur districts had participated.

The students, Meenal Shete Ramesh Gaikwad, Sanket Gadekar and Akash Bhumare bagged the gold medals while Aishwarya Daware and Krishna Shingare bagged silver medals. Those who had participated in it had performed folk dance, group song, ballad, one-act plays, etc.

Marathwada Shikshan Prasarak Mandal president Prakashrao Solanke, secretary and Legislator Satish Chavan, Hemant Jamkar, Anna Dudhate, Principal Dr Balasaheb Jadhav, vice-principal Dr SNK Shetty, Dr Vijaya Nandapurkar, Dr Jayant Bobde, Kharat and others congratulated them.

पुण्य नगरी
बुधवार, ४ ऑक्टोबर २०१७ | परभणी

# शिस्त व संयमामुळे खेळाडूंच्या जीवनाला कलाटणी मिळते - डॉ. रेड्डी

परभणी / प्रतिनिधी

अथक परिश्रम केल्याशिवाय कोणत्याही क्षेत्रात यश मिळत नाही. क्रीडा क्षेत्रात खेळाडूंसाठी अनेक संधी उपलब्ध असून यश संपादनासाठी विद्यार्थ्यांनी झोकून देण्याची तयारी ठेवावी. शारीरिक संपन्नतेबरोबरच खेळाडूंच्या जीवनात शिस्त व संयम असल्यास त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळू शकते, असे प्रतिपादन स्वारातीम विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांनी व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित आंतर महाविद्यालयीन विभागीय तायक्वांदो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, प्रा.यू.डी. इंगळे, प्रा.बल्लाळ, प्रा.संतोष कोकीळ यांची उपस्थिती होती.

या स्पर्धेत चार विभागातील आठ संघांनी सहभाग नोंदविला. आंतर महाविद्यालयीन विभागीय तायक्वांदो स्पर्धेसाठी प्रल्हाद राठोड, श्रीमंत कळणे, हुसेन पठाण, खाजा कुरेशी यांनी पंच म्हणून काम पाहिले. रामप्रसाद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राजू रेंगे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी प्रा.अमोल गौतम, प्रा.संतोष कोकीळ, प्रा.संतोष सावंत यांनी पुढाकार घेतला.



पुण्य नगरी
शुक्रवार, ६ ऑक्टोबर २०१७ । परभणी

## स्काऊट गाईड कार्यशाळा उत्साहात

परभणी - शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात परभणी येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या भारत स्काऊट गाईड विभागांतर्गत रोव्हर- रेंजर युनीटची कार्यशाळा मंगळवार ३ ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडली. कार्यशाळेत रोव्हर व रेंजर युनीट मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव उपस्थित होते. यावेळी बी.व्ही.आंधळे, व्ही.आर.मोरे, प्रल्हाद भोपे, विनोद शिंगणे, विलास कुऱ्हाडकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद शिंगणे यांनी केले. आभार विलास कुऱ्हाडकर यांनी मानले.

दि. ९ ऑक्टोबर २०१७
गोदातीर समाचार

## स्काऊटच्या कार्यशाळेत मार्गदर्शन

**परभणी**-येथील श्री. शिवाजी महाविद्यालयात नव्याने सुरु करण्यात आलेल्या भारत स्काऊट गाईड विभागांतर्गत रोव्हर-रेंजर युनीटची कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारत स्काऊट गाईडचे जिल्हा संघटक आयुक्त के.एल. पवार उपस्थित होते.

कार्यशाळेत रोव्हर व रेंजर युनीटमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. पवार म्हणाले की,स्काऊट गाईड ही तरूणांना शिस्त लावणारी शाळा आहे. तरूणांमध्ये समाजसेवा, राष्ट्रभक्ती व शिस्त निर्माण करण्याचे महत्वपूर्ण काम स्काऊट गाईड करत असते. प्राचार्य डॉ. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वय वर्ष १७ ते २५ या वयोगटाच्या विद्यार्थ्यांसाठी रोव्हर व रेंजर या युनीटची नव्याने सुरुवात जिल्ह्यात करण्यात आली आहे. प्रा.बी.व्ही. आंधळे, प्रबंधक व्ही.आर.मोरे, प्रा. प्रल्हाद भोपे, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. विनोद शिंगणे, प्रा. विलास कुऱ्हाडकर उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा. विनोद शिंगणे यांनी केले तर आभार प्रा. विलास कुऱ्हाडकर यांनी मानले. यावेळी रोव्हर व रेंजर युनिटमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न घेतले.

दि. ५ ऑक्टोबर २०१८

गोदातीर समाचार

# 'उदाहरणार्थ नेमाडे' मधुन साहित्यासह व्यक्तिमत्वाचे अंतरंग उलगडण्याचा प्रयत्न

## दिग्दर्शक अक्षय इंडीकर यांनी परभणीत साधला संवाद

परभणी/प्रतिनिधी

ज्येष्ठ लेखक भालचंद्र नेमाडे यांच्या व्यक्तिमत्व आणि लेखन या दोन्हींचाही वेध घेण्याचा प्रयत्न 'उदाहरणार्थ नेमाडे' या चित्रपटातून करण्यात आला असून त्यांचे व्यक्तिमत्व समजून घेण्यासाठी हा प्रयत्न महत्वाचा ठरेल. वाङमयीन क्षेत्रात ज्यांना टाळताच येणार नाही असे लेखक म्हणून श्री.नेमाडे यांची ख्याती असून या कलाकृतीतून त्यांचे अंतरंग निश्चितपणे उमजेल असा विश्वास या चित्रपटाचे दिग्दर्शक अक्षय इंडीकर यांनी व्यक्त केला.

येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात 'उदाहरणार्थ नेमाडे' हा चित्रपट प्रदर्शीत करण्यात आला. कैझन पिक्चर्स परभणी, अरभाट फिल्म क्लब पुणे श्री शिवाजी महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट रसास्वाद कार्यक्रमाची आयोजन करण्यात आले होते. श्री.नेमाडे यांच्या जीवन आणि साहित्यावर आधारीत मराठीतील पहिलाच 'डाक्युफिक्शन' चित्रपट असून या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर श्री.इंडीकर यांनी उपस्थित दर्शकांशीही प्रश्नोतराच्या माध्यमातून संवाद साधला.

यावेळी श्री.इंडीकर यांनी नेमाडे यांचे साहित्य समजून घेतानाच त्यांच्या कविता, कादंबऱ्या यांचा आधार घेत ही निर्मिती केल्याचे सांगितले. नेमाडे यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू समजून घेण्याचा प्रयत्न आपण या निर्मितीच्या माध्यमातून केला. भालचंद्र नेमाडे यांची बहुचर्चित कादंबरी 'कोसला' ते 'हिंदू' पर्यंतचा त्यांचा लेखन प्रवास आणि त्यांच्या कविता या दोन्ही बाबी आपल्यादृष्टीने महत्वाच्या होत्या. त्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध तर आहेच हे समृद्ध व्यक्तिमत्व कलात्मकरित्या उलगडण्यासाठी त्यांच्या कवितांचाही उपयोग झाला असेही यावेळी श्री.इंडीकर यांनी सांगितले.



श्री.नेमाडे यांच्या सांगवी या गावी चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण झालेले आहे. प्रवासातही त्यांच्याशी गप्पा करतांना अनेक गोष्टी जाणुन घेता आल्या. विशेषतः या चित्रपटाला खान्देशातील 'वही' या लोककला प्रकारातले संगीत अधिक अर्थपूर्ण वाटल्याने ते देण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. आवाज आणि प्रकाश योजना नैसर्गिकच ठेवण्याचा प्रयत्न केलेला असून स्वतः श्री.नेमाडे यांनाच लेखकाची प्रतिमा गोंजारणे आवडत नाही. त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसाच हा चित्रपट करण्याचा प्रयत्न आपण केल्याचेही इंडीकर यांनी सांगितले. यावेळी श्री.रवि पाठक यांनी परभणीत लघुपट प्रदर्शन व दिग्दर्शकांच्या चर्चेच्या माध्यमातून शहरात चित्रपट साक्षरता घडविण्याचा प्रयत्न असून चित्रपट पाहण्याची दृष्टी यातून विकसीत व्हावी तसेच दिग्दर्शकांच्या गप्पांच्या माध्यमातून त्यांच्या कामाचे नेमके मर्म उमजावे हा उद्देश असल्याचे सांगितले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.बी.यु.जाधव, प्रा.यज्ञकुमार करेवार यांनीही आपली मते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन त्र्यंबक वडसकर यांनी केले. चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर श्री.इंडीकर यांनी उपस्थित श्रोत्यांशी संवाद साधला.

सकाळ
नांदेड, गुरुवार
५ ऑक्टोबर २०१७
४

TODAY परभणी

## अवतीभवती



**परभणी : शिवाजी महाविद्यालयाचा क्रिकेट संघ. समवेत प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रा. संतोष कोकीळ, प्रा. राजेंद्र रेंगे, प्रा. सुनील चव्हाण.**

# विभागीय क्रिकेट स्पर्धेत 'शिवाजी' चा संघ चमकणार

परभणी, ता. ४: शिवाजी महाविद्यालयाच्या १९ वर्षाआतील मुलांच्या क्रिकेट संघाची शालेय विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महापालिकेच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकाविले. या संघात अभिषेक चौधरी, तानाजी गायकवाड, ऋत्वीक जाधव, बादल कांबळे, बालाजी साळवे, आदित्य मानकरी, शुभम सोळंके, किरण जाधव, कृष्णा थोरवट, तुषार खंदारे, ओंकार जाधव, आशिष चिखलीकर, आयुष चिखलीकर, साई नरवाडे, पार्थ मुंदे यांचा समावेश होता. या संघाला क्रीडा विभागप्रमुख प्रा. संतोष कोकीळ, प्रा. सुनील चव्हाण, प्रा. राजेंद्र रेंगे, प्रवीण चाळक यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संघाचे संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, प्रा. अप्पासाहेब डहाळे, प्रा. व्ही. एन. आंधळे यांनी कौतुक केले.

MY परभणी-हिंगोली २ पुढारी | सोमवार, १३ नोव्हेंबर २०१७

संक्षिप्त



परभणी: सिनेट सदस्यांच्या सत्कारप्रसंगी आ. चव्हाण व इतर.

# सिनेट सदस्यांचा सत्कार

**परभणी : प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत पदवीधर व संस्थाचालक गटातून निवडून आलेल्या उमेदवारांचा सत्कार आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मंचावर आ.विक्रम काळे, हेमंतराव जामकर, सदस्य केशव अण्णा दुधाटे, साहेबराव कदम, रणजित काकडे, प्राचार्य डॉ बाळासाहेब जाधव, डॉ.अंबादास कदम, प्राचार्य डॉ. व्ही. एम. मोरे, प्राचार्य आनंद पाथरीकर, प्राचार्य शाहीद ठेकिया आदी उपस्थित होते.

आ. चव्हाण मार्गदर्शन करताना म्हणाले की, खा.अशोक चव्हाण, माजी आ.डी.पी.सावंत आणि आ. काळेयांच्यामार्गदर्शनाखालीराष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस यांनी संयुक्तरित्या तयार केलेल्या ज्ञानतीर्थ पॅनलला पदवीधर आणि संस्थाचालक गटात मिळालेले घवघवीत यश म्हणजे येणाऱ्या काळातील परिवर्तनाची नांदी आहे. याप्रसंगी डॉ.महेश मगर, इंजि. नारायण चौधरी, विक्रम पतंगे, परसराम कपाटे, डॉ.बालाजी विजापुरे, गजानन असोलेकर, अजय गायकवाड, मीनाक्षी खंदाडे, संस्थाचालक गटातून ब्रिजगोपाल तोष्णीवाल, गोविंदराव कदम, गोविंद घ्यार आणि चेवले यांचा सत्कार झाला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ जयंत बोबडे यांनी केले. यावेळी अनंतराव काळे, गोपाळ भुसारे, गुलाब कदम, वसंत देशमुख, मोतीराम शिंदे, धनंजय भागवत आदी उपस्थित होते.

परभणी / मंगळवार, दि. ३ ऑक्टोबर २०१७ देशोन्नती

# शिवाजी महाविद्यालयाच्या संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड

***कार्यालय प्रतिनिधी / २ ऑक्टोबर***

**परभणी :** जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालय व मनपा परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत आंतर शालेय सि.के. नायडु क्रिकेट स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाने प्रथम क्रमांक पटकाविल्यामुळे जालना येथे होणाऱ्या विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाविद्यालयाची संघाची निवड झाली आहे.

अंतिम सामन्यात झाकीर हुसेन कनिष्ठ महाविद्यालयाचा २० धावांनी पराभव करुन श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाने विजय संपादन केला. संघामध्ये अभिषेक चौधरी, तानाजी गायकवाड, ऋतीक जाधव, बादल कांबळे, बालाजी साळवे, आदित्य मानकरी, शुभम सोळंके, किरण जाधव, कृष्णा थोरवट, तुषार खंदारे, ओंकार जाधव, आशिष चिखलीकर, आयुष चिखलीकर, साई नरवाडे, पार्थ मुंडे यांचा समावेश होता. खेळाडूंना क्रिडा विभाग प्रमुख प्रा. संतोष कोकीळ, प्रा. सुनिल चव्हाण, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रविण चालक यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या यशाबद्दल म.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतिश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर, प्रा. आप्पासाहेब डहाळे, प्रा.व्ही.एन. आंधळे यांनी अभिनंदन केले आहे.



**परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयाच्या खेळाडूंची जालना येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. छायाचित्रात प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्यासह क्रिडा मार्गदर्शक व खेळाडू छायाचित्रात दिसत आहेत.**

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि.१४ नोव्हेंबर २०१७ ४

# विद्यापीठ निवडणुकीतील विजय परिवर्तनाची नांदी

## सत्कार कार्यक्रम: सतीश चव्हाण यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसने तयार केलेल्या ज्ञानतीर्थ पॅनलला पदवीधर व संचालक गटात मिळालेले यश हे परिवर्तनाची नांदी आहे, असे प्रतिपादन आ.सतीश चव्हाण यांनी केले.

येथील शिवाजी महाविद्यालयात विजयी उमेदवारांच्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आ.चव्हाण म्हणाले, सध्या लोकशाहीचे तीन-तेरा झाले आहेत. सर्वच क्षेत्रात विकास नावाचा शब्द गायब झाला असून यामुळे बुद्धीजीवी वर्गाने आमच्या पॅनलला निवडून देत परिवर्तनाचे संकेत दिले आहेत.

यावेळी आ.विक्रम काळे यांनीही मार्गदर्शन केले. पदवीधर गटातून निवडून आलेले डॉ.महेश मगर, नारायण चौधरी, विक्रम पतंगे, परसराम कपाटे, डॉ.बालाजी बिजापुरे, गजानन असोलेकर, अजय गायकवाड, मीनाक्षी खंदारे, संस्थाचालक गटातून विजयी झालेले ब्रिजगोपाल तोष्णीवाल, गोविंदराव कदम, गोविंद घ्यार आदींचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास शिवाजी महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, केशव दुधाटे, साहेबराव कदम, रणजीत काकडे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.अंबादास कदम, प्राचार्य डॉ.व्ही.एम. मोरे, प्राचार्य आनंद पाथरीकर, प्राचार्य शाहीद ठेकिया आदींची उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी प्रास्ताविक केले. तर प्रा.डॉ.जयंत बोबडे यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी अनंतराव काळे, गोपाळ भुसारे, गुलाब कदम, वसंत देशमुख, मोतीराम शिंदे, धनंजय भागवत आदींची उपस्थिती होती.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. १६ नोव्हेंबर २०१७ ४

# चांगल्या इंग्रजीसाठी उच्चारास महत्व

## परभणीत कार्यशाळा : रोहिदास नितोंडे यांचे मत

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : इंग्रजी भाषेचा जगभरात वापर होतो. परंतु, ही भाषा वापरत असताना प्रत्येक देशातील व्यक्ती स्वत:च्या भाषेप्रमाणे उच्चार करतात. त्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत, अशा काळात इंग्रजी स्वरांचे सारखेच उच्चार व्हावेत, यासाठी उच्चारशास्त्र हा महत्त्वाचा घटक असल्याचे मत प्रा. रोहिदास नितोंडे यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालयात १० व ११ नोव्हेंबर रोजी फोनेटिक्स (उच्चारशास्त्र) या विषयावर कार्यशाळा पार पडली. उद्घाटन प्रसंगी मुख्य मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. नितोंडे बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे संचालक आनंद पाथरीकर, प्रा. बी.बी. कदम, प्रा. टी.बी. ढवळे, प्रा. माधव चव्हाण, प्रा. वाय.बी. जोशी, प्रा. अमोल पतंगे, प्रा. सतीश पाईकराव, प्रा. महेश यंबल, प्रा. भास्कर दोहारे, संदीप चव्हाण, प्रा. जी.ए. कऱ्हाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. नितोंडे म्हणाले, फक्त व्याकरण चांगले असणे म्हणजे ती भाषा येते, असे होत नाही. तर त्या भाषेचे उच्चारही अचूक असावे लागतात.

इंग्रजी बोलताना मातृभाषेचा प्रभाव त्यावर होतो आणि संभाषणात अडथळे येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी फोनेटिक्सची परिपूर्ण माहिती घेऊन सराव करावा, असे आवाहन त्यांनी केले.

दुसऱ्या सत्रात प्रा. गिरीष कौसडीकर यांनी मार्गदर्शन केले. संचालक आनंद पाथरीकर यांनी प्रास्ताविक केले. नियती शाह, काजल जाधव यांनी सूत्रसंचालन केले. करण रेंगे यांनी आभार मानले.

लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि. १७ नोव्हेंबर २०१७ ४

# ज्ञानेश्वर गिरी यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी: येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ.ज्ञानेश्वर गिरी यांची महाराष्ट्र कबड्डी संघाच्या कुमार गट मुले प्रशिक्षकपदी निवड झाली आहे.

सांगली जिल्ह्यातील वाळवा येथे ४४ वी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा होत आहे. या स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याचा संघ निवडला जाणार आहे. हा संघ ओरिसा राज्यातील कटक येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहे. या महाराष्ट्र कबड्डी संघाचे प्रशिक्षक म्हणून गिरी यांची निवड झाली आहे.

पुण्य नगरी
शुक्रवार, १७ नोव्हेंबर २०१७ | परभणी

# खेळाडूंना संधी उपलब्ध करून देत घडविण्याचे काम-प्रा.डॉ.गिरी

परभणी / प्रतिनिधी

ग्रामीण आणि शहरी भागातील खेळाडूंना एकत्रित करून त्यांना खेळण्याची संधी उपलब्ध करून देत हजारो खेळाडू घडविण्यासाठी आणि त्यातून शासकीय नोकरीसाठी पात्र व्हावा यासाठी प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन श्री शिवाजी महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभागात कार्यरत असलेले आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू तथा प्रशिक्षक प्रा.डॉ.ज्ञानेश्वर गिरी यांनी केले.

ओरिसामधील कटक येथे होत असलेल्या राज्य अजिंक्यपद कुमार गट मुले कबड्डी प्रशिक्षकपदी प्रा.डॉ.ज्ञानेश्वर गिरी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार आ.डॉ.राहुल पाटील, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रकाशदादा सोळंके, आ.सतीश चव्हाण, हेमंत जामकर, प्राचार्य बाळासाहेब जाधव, प्रा.संतोष कोकीळ, प्रा.डॉ.अमोल गौतम, प्रा.सुनील चव्हाण, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रा.संतोष सावंत, प्रा.रणजीत जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी प्रा.गिरी बोलत होते. तसेच कबड्डी खेळासाठी डॉ.भीमराव निर्वळ, प्रा.सुरेश जाधव, प्रा.डॉ.यू. डी.इंगळे, मंगल पांडे, प्रा.डॉ.माधव शेजुळ, प्रा.नवनाथ भालेराव, प्रा.डॉ.चंद्रकांत सातपुते, प्रा.डॉ.गुरुदास लोकरे, शिवाजी वाघमारे, पी. आर.जाधव, रामेश्वर पूरी यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचे सांगितले. पुढे बोलताना प्रा. डॉ.गिरी म्हणाले की स्वतः कुस्ती खेळत असतानाही प्रा. डॉ.माधव शेजुळ यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डी खेळाकडे वळलो आणि प्रथमच राष्ट्रीय स्पर्धेत व त्यानंतर श्रीलंका येथे आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. आंतरविद्यापीठीय स्पर्धेत कर्णधारपद भूषविले. स्वतः खेळत असताना अनेक खेळाडू घडविले.

तसेच अनेक विद्यापीठ खेळाडू घडविले आहेत. यासाठी डॉ.माणिक राठोड, प्राचार्य प्रकाश हरगावकर, गोपाळराव मोरे, माधव शिंदे, प्रा.डॉ. उत्तम देवकते, गुलाब भिसे, नारायण भुतावळे, दत्ता भिसे, दिलीप निर्वळ, अय्यूब पठाण, खंडूजी औंढेकर, किशोर भोसले, भारत धनले, हरिषचंद्र खुपसे, गोविंद अवचार, रशीद शहा, सुरेश कदम, तुकाराम शेळके यांचे सहकार्य लाभले असल्याचे सत्कारप्रसंगी प्रा.डॉ.ज्ञानेश्वर गिरी यांनी सांगितले. त्यांची निवड झाल्याबद्दल क्रीडा मंडळ, क्रीडा संघटना, मित्रपरिवार आदींनी स्वागत केले.

पुरोगामी विचाराचे एकमत
नांदेड, शुक्रवार, १७ नोव्हेंबर २०१७

# महाराष्ट्राच्या कुमार कबड्डी संघाच्या प्रशिक्षकपदी ज्ञानेश्वर गिरी

**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालय परभणी येथे शारिरीक शिक्षण विभागात कार्यरत असणारे प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गिरी यांची महाराष्ट्राच्या कुमार गट मुले कबड्डी संघाच्या प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे.



२५ ते २८ नोव्हेंबर दरम्यान महाराष्ट्रात राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने ४४ वी कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा सांगली वाळवा येथे होत आहे. त्या स्पर्धेत महाराष्ट्राचा कबड्डी संघ निवडला जाणार आहे. तो संघ १२ ते १५ डिसेंबर २०१७ रोजी कटक (ओरीसा) येथे राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहे.

परभणी / शुक्रवार, दि. १७ नोव्हेंबर २०१७ देशोन्नती

# थोडक्यात

## प्रा. ज्ञानेश्वर गिरी कबड्डी प्रशिक्षकपदी

**परभणी :** श्री शिवाजी



महाविद्यालयातील शारिरीक शिक्षण विभागात कार्यरत असलेले प्रा.डॉ. ज्ञानेश्वर गिरी यांची महाराष्ट्र संघाच्या कुमार गट मुले प्रशिक्षकपदी निवड झाली आहे. २५ ते २८ नोव्हेंबर दरम्यान महाराष्ट्र रा ज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने ४४ वी कुमार - कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा वाळवा जि. सांगली येथे होत आहे. यात राज्याचा निवडलेला संघ १२ ते १५ डिसेंबर दरम्यान ओरिसा कटक येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदविणार आहेत. महाराष्ट्र संघात प्रशिक्षकपदी निवड झाल्याबद्दल प्रा.डॉ. ज्ञानेश्वर गिरी यांचे अभिनंदन होत आहे.

दैनिक समर्थ
दिलासा
बुधवार, दि.२२ नोव्हेंबर २०१७ पान नं.४

# प्राचार्य बाळासाहेब जाधव यांची विद्यापरिषदेवर नियुक्ती

**परभणी, दि.२१ (प्रतिनिधी):** स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर शिवाजी महाविद्याचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाविद्यालयातील शिक्षक, संशोधन, अध्यापन आणि मुल्यमापनाबद्दलचे नियमन करणारे विद्या परिषद हे महत्वाचे प्राधिकरण आहे. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार या प्राधिकरणावर तज्ञ प्राचार्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार कुलगुरू डॉ. पंडीत विद्यासागर यांना असुन त्यांनी जाधव यांची नियुक्ती केली आहे. या नियुक्तीबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतिश चव्हाण, सहचिटणीस अनिल नखाते, स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, सर्व प्राध्यापक, उपप्राचार्य यांनी अभिनंदन केले आहे.

दि. २३ नोव्हेंबर २०१७

गोदातीर समाचार

# श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव विद्या परिषदेवर

**परभणी/प्रतिनिधी**

श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर नियुक्ती झाली आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

सर्व महाविद्यालयातील शिक्षण, संशोधन, अध्यापन आणि मूल्यमापनाबद्दलचे नियमन करणारे विद्या परिषद हे महत्वाचे प्राधीकरण आहे. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार या प्राधीकरणावर तज्ज्ञ प्राचार्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या कुलगुरुंना आहे. कुलगुरु डॉ.पंडीत विद्यासागर यांनी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांची नियुक्ती केली आहे.

प्राचार्य डॉ.जाधव यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य पातळीवरील पुरस्कार, विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचा उत्कृष्ट प्रशासक आदी पुरस्कार मिळालेले आहेत. प्राचार्य डॉ.जाधव हे नॅक बेंगलोर पीअर टीमचे सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ.सतीश चव्हाण, सहचिटणीस अनिल नखाते, श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, सर्व सदस्य, उपप्राचार्य, प्राध्यापकांनी प्राचार्य डॉ.जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

पुण्य नगरी

बुधवार, २२ नोव्हेंबर २०१७ । परभणी

# विद्या परिषदेवर प्राचार्य जाधव यांची नियुक्ती

परभणी -येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी ही नियुक्ती केली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रकाश सोळंके, आ. सतीश चव्हाण, अनिल नखाते, स्थानिक संयोजन समितीचे हेमंत जामकर आदींसह महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी स्वागत केले आहे.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि.२३ नोव्हेंबर २०१७ ४

# बाळासाहेब जाधव यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क



परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर नुकतीच निवड करण्यात आली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे नॅक बेंगलोर पिअर टीमचे सदस्य आहेत. तसेच प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

परभणी-हिंगोली

पुढारी गुरुवार, २३ नोव्हेंबर २०१७

## स्वारातीमच्या विद्या परिषदेवर डॉ.जाधव

**परभणी : प्रतिनिधी**



श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर नियुक्ती झाली आहे.

विद्या परिषद हे शिक्षण संशोधन अध्यापन आणि मूल्यमापनाबदलचे नियमन करणारे महत्त्वाचे प्राधिकरण आहे. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार यावर तज्ञ प्राचार्यांच्या नियुक्तीचा अधिकार कुलगुरुंना आहे. कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर यांनी प्राचार्य जाधव यांची नियुक्ती केली. त्यांना शासनाचा राज्यपातळीवरील पुरस्कार, विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचा उत्कृष्ट प्रशासक आदी पुरस्कार मिळाले आहेत. ते नॅक बेंगलोर पीअर टीमचे सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण, अनिल नखाते, हेमंतराव जामकर आदींनी अभिनंदन केले.

परभणी

देशोन्नती गुरुवार, दि. २३ नोव्हेंबर २०१७

# प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची विद्या परिषदेवर नियुक्ती

**विशेष प्रतिनिधी / २२ नोव्हेंबर**

**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर कुलगुरु यांनी नियुक्ती केली आहे.



सर्व महाविद्यालयातील शिक्षण, संशोधन, अध्यापन आणि मुल्य मापनाबद्दलचे नियम करणारे विद्या परिषद हे महत्वाचे प्राधिकरण आहे. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार या प्राधिकरणावर तज्ञ प्राचार्याची नियुक्ती करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या कुलगुरुंना आहे. कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर यांनी या परिषदेवर प्राचार्य डॉ. जाधव यांची नियुक्ती केली आहे. प्राचार्य डॉ. जाधव यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार, विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचा उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार मिळालेले आहेत.

प्राचार्य डॉ. जाधव हे नॅक बेंगलोर पीआरटीएमचे सदस्य व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष म्हणुन कार्यरत आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतिश चव्हाण, सहचिटणीस अनिल नखाते, शिवाजी महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, सर्व सदस्य, उपप्राचार्य, प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.

सकाळ
नांदेड, शुक्रवार
२४ नोव्हेंबर २०१७
३
TODAY
परभणी

# कुस्तीपटू डॉ. ज्ञानेश्वर गिरी राज्य कबड्डी संघाचे प्रशिक्षक

**परभणी, ता. २३ (बातमीदार) :** बालवयात तालुक्यातील साबा येथील लालमातीच्या आखाड्यात कुस्तीचे धडे गिरवणाऱ्या व नंतर कबड्डी खेळाडू म्हणून नावलौकिकास आलेल्या प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गिरी यांची महाराष्ट्राच्या कुमार गट कबड्डी संघाच्या प्रशिक्षकपदी नुकतीच निवड झाली आहे.

महाराष्ट्रात राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने ४४ वी कुमार- कुमारी गट राज्यअजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा सांगली वाळवा येथे होत आहे. त्या स्पर्धेत महाराष्ट्राचा कबड्डी संघ निवडला जाणार आहे. तो संघ १२ ते १५ डिसेंबर २०१७ रोजी ओरिसा कटक येथे राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहे. महाराष्ट्र संघांचे प्रशिक्षक म्हणून शिवाजी महाविद्यालयाच्या क्रीडा विभागात कार्यरत व जिल्ह्याचे अष्टपैलू व आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू, उत्कृष्ट मार्गदर्शक, प्रशिक्षक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गीरी यांची निवड करण्यात आली आहे.

बालवयात कुस्तीचे धडे घेतलेले ज्ञानेश्वर गिरी शाळा-महाविद्यालयीन जीवनात मात्र कबड्डीकडे वळले. त्यांच्यातील चपळता, कौशल्यामुळे अल्पावधीतच त्यांनी कबड्डीतही नावलौकिक मिळविण्यास सुरवात केली.

१९९४ मध्ये त्यांची राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या किशोर संघात एक अष्टपैलू खेळाडू म्हणून वर्णी लागली. १९९६ ला कुमार गट अंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी श्रीलंका येथे निवड झाली. आंतरविद्यापीठीय कबड्डी स्पर्धेमध्ये सतत तीन वर्षे सहभाग नोंदवित. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कबड्डी संघाचे त्यांनी २००० मध्ये कर्णधार पदही भूषविले. खेळाडू म्हणून उत्कृष्ट कामगिरी केलेल्या डॉ. गिरी यांनी प्रशिक्षक म्हणूनही उल्लेखनीय



डॉ. ज्ञानेश्वर गिरी

कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शालेय, महाविद्यालयीन संघांनी अनेक स्पर्धा गाजवल्या, विजेतीपदे पटकाविली आहेत.

खेळाडू ते प्रशिक्षकांच्या कारकीर्दीत त्यांना ज्ञानेपासक महाविद्यालयाचे प्रा. डॉ. माधव शेजुळ यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले नव्हेत तर त्यांच्यातील कबड्डीपट्टू, प्रशिक्षक त्यांनीच हेरला. या प्रवासात त्यांना डॉ. भीमराव निर्वळ, प्रा. सुरेश जाधव, प्रा. यू. डी. इंगळे, मंगल पांडे, प्रा. नवनाथ भालेराव, प्रा. डॉ. चंद्रकांत सातपुते, प्रा. डॉ गुरुदास लोकरे, शिवाजी वाघमारे, रामेश्वर पुरी, पी. आर. जाधव यांचेही मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा गाजवल्या, पदके पटकाविली. अनेकांना शासकीय नोकऱ्यांचादेखील लाभ मिळाला आहे. त्यांनी सध्या आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली जाणता राजा क्रीडा मंडळाची स्थापना केली असून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना ते कबड्डीचे धडे देत आहेत.

या निवडीबद्दल त्यांचे जिल्हा कबड्डी संघटनेचे अध्यक्ष माजी मंत्री सुरेश वरपुडकर, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी मंत्री प्रकाशदादा सोळंके, मंडळाचे सचिव आमदार सतीश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे अध्यक्ष हेमंतराव जामकर, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब जाधव, क्रीडा विभागप्रमुख प्रा. संतोष कोकीळ, प्रा. डॉ. अमोल गौतम, प्रा. सुनील चव्हाण, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रा. संतोष सावंत, प्रा. रंजित जाधव यांनी अभिनंदन केले.

पुण्य नगरी ■ मंगळवार, ५ डिसेंबर २०१७ ■ परभणी

# शिवाजी महाविद्यालय राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम

परभणी / प्रतिनिधी

औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्यपातळीवरील विज्ञान प्रदर्शन नुकतेच संपन्न झाले. या प्रदर्शनात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने 'पर्यावरणपूरक फवारणी यंत्र' हा प्रकल्प सादर केला. या प्रकल्पास राज्य पातळीवरील प्रथम पारितोषिक मिळाले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या प्रकल्पाचे परिक्षकासह तज्ञ व मान्यवरांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही भेटी दिल्या. या संघामध्ये आशिष चिखलीकर, आयुश चिखलीकर, चेतन आडे, पृथ्वीराज चव्हाण, गार्गी नांदापूरकर, शितल पुंड, अनघा इंगळे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या संघाला प्रा.डॉ. बापूसाहेब भोसले, प्रा.आर.डी. मस्के यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी



सहकार्य केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अनिल नखाते, हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, नांदापूरकर, ए.एन.डहाळे, प्रा.बी.व्ही. आंधळे, विजय मोरे आदींची उपस्थिती होती.

मंगळवार, दि.५ डिसेंबर २०१७
epaper.-deshonnati.com
देशोन्नती
२

# विज्ञान प्रदर्शनात शिवाजी महाविद्यालयाला प्रथम पारितोषीक

**कार्यालय प्रतिनिधी / ४ डिसेंबर**

**परभणी :** औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयात पार पडलेल्या राज्य पातळीवरील विज्ञान प्रदर्शनात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या पर्यावरण पुरक फवारणी यंत्र या प्रकल्पाला प्रथम पारितोषीक प्राप्त झाले आहे. श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पाचे परिक्षकांसह तज्ञ मान्यवरांनी कौतूक केले. पर्यावरण पुरक फवारणी यंत्र सादर करणाऱ्या संघामध्ये आशिष, आयुष चिखलीकर, चेतन आढे, पृथ्वीराज चव्हाण, गार्गी नांदापुरकर, शितल पुंड, अनघा इंगळे, यांचा समावेश होता. संघाला प्रा. डॉ. बापुसाहेब भोसले, प्रा. आर. डी. मस्के यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी संघाचे म.शि. प्र.चे माजी आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतिश चव्हाण, सहचिटणीस अनिल नखाते, हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, श्रीमती नांदापुरकर, ए.एन. डहाळे, प्रा. बी.व्ही. आंधळे, विजय मोरे यांनी अभिनंदन केले आहे.



**परभणी :** राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाला प्रथम पारितोषीक प्राप्त झाले. विद्यार्थ्यांसोबत प्राचार्य बाळासाहेब जाधव, व इतर.

दि.०५ डिसेंबर २०१७

गोदातीर समाचार

# शिवाजी महाविद्यालयास राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे प्रथम पारितोषीक



परभणी/प्रतिनिधी

औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य पातळीवरील विज्ञान प्रदर्शन २०१७ नुकतेच संपन्न झाले. या प्रदर्शनात येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने पर्यावरणपुरक फवारणी यंत्र हा प्रकल्प सादर केला. या प्रकल्पास राज्य पातळीवरील प्रथम पारितोषीक मिळाले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थींनी सादर केलेल्या या प्रकल्पाचे परिक्षाकासह तज्ञ व मान्यवरांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही भेटी दिल्या. परिक्षकांनी या प्रकल्पास प्रथम पारितोषीक मिळाले. या संघामध्ये चिखलीकर आशिष, चिखलीकर आयुष, आडे चेतन, चव्हाण पृथ्वीराज, गार्गी मांडापूरकर, पुंड शितल, इंगळे अनघा यांचा समावेश होता.

या संघाला प्रा.डॉ.बापुसाहेब भोसले, प्रा.आर.डी.म्हस्के यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना सहकार्य केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ.सतीश चव्हाण, सहचिटणीस अनिल नखाते, हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, श्री.ए.एन.ढहाळे, प्रा.बी.व्ही.आंधळे, विजय मोरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दिनांक : ५ डिसेंबर २०१७

झुंजार नेता

# शिवाजी महाविद्यालयास राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे प्रथम पारितोषिक

परभणी(प्रतिनिधी)दि.०४:- औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्यपातळीवरील विज्ञान प्रदर्शन २०१७ नुकतेच संपन्न झाले. या प्रदर्शनात येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने 'पर्यावरणपूरक फवारणी यंत्र' हा प्रकल्प सादर केला. या प्रकल्पास राज्यपातळीवरील प्रथम पारितोषिक मिळाले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी सादर केलेल्या या प्रकल्पाचे परिक्षकासह तज्ञ व मान्यवरांनी कौतूक केले. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही भेटी दिल्या. परिक्षकांनी या प्रकल्पास प्रथम पारितोषिक मिळाले. या संघामध्ये चिखलीकर आशिष, चिखलीकर आयुष, आडे चेतन, चव्हाण पृथ्वीराज, गार्गी नांदापूरकर, पुंड शितल, इंगळे अनघा यांचा समावेश होता.

या संघाला प्रा.डॉ.बापुसाहेब भोसले, प्रा.आर.डी.म्हस्के यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना सहकार्य केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे मंडळाचे अध्यक्ष माजी आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस मा.आ.सतीश चव्हाण, सहचिटणीस अनिल नखाते, हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशट्टी, नांदापूरकर मॅडम, ए.एन.डहाळे, प्रा.बी.व्ही.आंधळे, विजय मोरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि[illegible] ४

# राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात शिवाजी महाविद्यालय प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम पारितोषिक पटकावले आहे.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघामध्ये अशिष चिखलीकर, आयुष चिखलीकर, चेतन आडे, पृथ्वीराज चव्हाण, गार्गी नांदापूरकर, शीतल पुंड, अनघा इंगळे यांचा समावेश होता. या संघाला प्रा. डॉ. बापूसाहेब भोसले, प्रा. आर. डी. मस्के यांचे मार्गदर्शन लाभले.

संघाच्या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, ए.एन. डहाळे, प्रा. बी.व्ही. आंधळे, विजय मोरे आदींची उपस्थिती होती.

देशोन्नती परभणी गुरुवार, दि. ७ डिसेंबर २०१७

# डॉ. आंबेडकरांचे कार्य क्रांतीकारी - डॉ. बोबडे




**शहर प्रतिनिधी / ६ डिसेंबर**

**परभणी :** सामान्य व्यक्तीला मत मांडण्याचा व लिहीण्याचा अधिकार देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरे क्रांतिकारक आहेत. भारतातील तळागाळातील व्यक्तींपासून महीलांच्या हक्कासाठी त्यांनी घटनेतून हक्क दिले. त्यात धर्म व जातीभेद केला नाही. सर्वांना समान संधी प्राप्त होतील याची काळजी घेतली.

बाबासाहेबांनी प्रचंड अभ्यास करून स्वतःच्या ज्ञानाचा समाजाला कसा फायदा होईल याचा प्रयत्न केला आणि यातुनंच राज्यघटनेची निर्मीती करून समता, स्वतंत्रता व बंधुता या त्रिसुत्रांचा पाया रचला. असे प्रतिपादन श्री शिवाजी महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. जयंत बोबडे यांनी केले. ते पाणी वीज बचत गट आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. प्रथम बाबासाहेबांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी जि. परिषद सदस्य श्रीनिवास जोगदंड, आबा कारेगांवकर, सरपंच रामकिशन दुधाटे, पत्रकार पंकज क्षिरसागर आदीची प्रमुख उपस्थिती होती.

संचलन व प्रास्ताविक गटाचे अध्यक्ष रणजित कारेगांवकर यांनी तर आभार विष्णू मेहेत्रे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सचिव बंडू मगर, उद्धव दुधाटे, दीपक लव्हारे, मुंजा घाटुळ, महेश देशमुख, दीपक आगलावे, नितीन जवंजाळ आदींची उपस्थिती होती.

परभणी एकमत Next

परभणी, शुक्रवार ८ डिसेंबर २०१७

# शिक्षणाने सामान्यांना न्याय देता येतो : प्रा. डॉ. जयंत बोबडे

परभणी : प्रतिनिधी.

सामान्य व्यक्तीला मत मांडण्याचा व लिहीण्याचा अधिकार देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरे क्रांतिकारक आहेत. भारतातील तळागाळातील व्यक्तींपासून महीलांच्या हक्कासाठी त्यांनी घटनेतून हक्क दिले. त्यात धर्म व जातीभेद केला नाही. सर्वांना समान संधी प्राप्त होतील याची काळजी घेतली.

बाबासाहेबांनी प्रचंड अभ्यास करून स्वतःच्या ज्ञानाचा समाजाला कसा फायदा होईल याचा प्रयत्न केला आणि यातुनच राज्यघटनेची निमीर्ती करून समता, स्वतंत्रता व बंधुता या त्रिसुत्राचा पाया रचला. असे प्रतिपादन श्री शिवाजी महाविद्यालयाचे सास्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. जयंत बोबडे यांनी केले. ते पाणी वीज बचत गट आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रम प्रसंगी वसमत रोडवरील कारेगांवकर कॉम्प्लेक्स मधील आबा ट्रेडर्स येथे बोलत होते. प्रथम बाबासाहेबांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जि.परिषद सदस्य श्रीनिवास जोगदंड, आबा कारेगांवकर, सरपंच रामकिशन दुधाटे, पत्रकार पंकज क्षिरसागर आदींची प्रमुख उपस्थिती होती. संचलन व प्रास्ताविक गटाचे अध्यक्ष रणजित कारेगांवकर यांनी तर आभार विष्णू मेहेत्रे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सचिव बंडू मगर, उद्धव दुधाटे, दीपक लव्हारे, मुंजा घाटुळ, महेश देशमुख, दीपक आगलावे, नितीन जवंजाळ आदींनी उपस्थिती होती.

दैनिक समर्थ दिलासा

शनिवार, दि. ९ डिसेंबर २०१७ पान नं. ४

# शिवाजी महाविद्यालयास राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक

**परभणी, दि.६ (प्रतिनिधी):** देवगिरी महाविद्यालय येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम पारितोषिक मिळविले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणपुरक फवारणी यंत्र हा प्रकल्प सादर केला.या प्रयोगास विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी भेटी दिल्या. परिक्षकांनी या प्रकल्पास प्रथम पारितोषिक घोषीत केले. या संघात आशिष चिखलीकर, आयुष चिखलीकर, चेतन आडे, पृथ्वीराज चव्हाण, गार्गी नांदापुरकर, शितल पुंड, अनघा इंगळे यांचा समावेश होता. या संघाला प्रा.डॉ.बापुसाहेब भोसले, प्रा.आर.डी. म्हस्के यांनी मार्गदर्शन केले. या संघटनास माजी आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ.सतिश चव्हाण, सहचिटणीस अनिलराव नखाते, हेमंतराव जामकर, प्राचार्य बाळासाहेब जाधव, श्रीनिवास केशेट्टी आदींनी अभिनंदन केले.

देशोन्नती गुरुवार, दि. १४ डिसेंबर २०१७

# प्रा.डॉ. नांदापुरकर यांना सिनेटवर पाठवा



**कार्यालय प्रतिनिधी** / १३ डिसेंबर

**परभणी** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत महिला प्रवर्गातुन प्रा.डॉ. विजया नांदापुरकर यांना प्राध्यापक गटातुन सिनेटवर मोठ्या मताधिक्याने पाठवावे असे आवाहन मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे केंद्रीय उपाध्यक्ष तथा स्थानिक नियामक मंडळाचे मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात म.शि.प्र. मंडळाअंतर्गत असलेल्या सर्व संकुलातील प्राध्यापकांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. या प्रसंगी हेमंतराव जामकर बोलत होते. जिल्ह्यातील शैक्षणीक समस्या सोडविण्यासाठी विद्यापीठामध्ये प्रतिनिधीत्व आवश्यक आहे. उपप्राचार्य डॉ. विजया नांदापुरकर, क्रिडा संचालक डॉ. धनंजय बल्लाळ या दोघांनाही सिनेटवर पाठविण्याचे आवाहन जामकर यांनी केले. प्रास्तावीक प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. मोरे, उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले.

पुण्य नगरी
गुरुवार, १४ डिसेंबर २०१७ | परभणी- हिंगोली

# जिल्ह्याचे प्रतिनिधी सिनेटमध्ये पाठवा-जामकर

परभणी / प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यातील शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी विद्यापीठात प्रतिनिधी आवश्यक आहे. त्याकरीता सिनेट हे महत्वाचे सभागृह आहे. आपल्या महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ.विजया नांदापूरकर व क्रीडा संचालक डॉ.धनंजय बल्लाळ या दोघांनाही सिनेटवर पाठवा, असे आवाहन मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे केंद्रीय उपाध्यक्ष तथा स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंत जामकर यांनी केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयात म.शि.प्र.मंडळाअंतर्गत असलेल्या सर्व संकुलातील प्राध्यापकांनी बैठक आयोजित केली होती. त्यावेळी जामकर बोलत होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत महिला प्रवर्गातून प्रा.डॉ.विजया नांदापूरकर यांना प्राध्यापक गटातून सिनेटवर पाठविण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ.मोरे, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी यांची समायोचित भाषणे झाली.

देशोन्नती

■ सोमवार, दि.२५ डिसेंबर २०१७ २

epaper.deshonnati.com



परभणी : शिवाजी विद्यालयाच्या मीनल शेटेचे राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी निवड झाल्या बद्दल अभिनंदन करतांना प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.जयंत बोबडे, प्रा.सविता कोकाटे

# श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मीनल शेटेची राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी निवड

**शहर प्रतिनिधी / २४ डिसेंबर**

**परभणी :** उदयपूर राजस्थान येथे १५ ते १९ डिसेंबर कालावधीत 'समवेत-२०१७' पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठीय युवक महोत्सव पार पडला. या युवक महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे नेतृत्व करत श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मीनल शेटे हिने कलात्मक जुळवणी या कलाप्रकारात सर्व तृतीय येण्याचा बहुमान मिळवला आहे.

या युवक महोत्सवात विद्यापीठाच्या संघाने अनेक कलाप्रकारात सादरीकरण केले. कलात्मक जुळवणी साठी 'माय ड्रीम' हा विषय देण्यात आला होता. टाकाऊ पासून सुंदर टिकाऊ कलाकृतीचे सादरीकरण करण्यात आले होते. या यशामुळे ती रांची येथे होणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी पात्र ठरली आहे.

तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.एस. एन. केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर, प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. जयंत बोबडे, प्रा.सविता कोकाटे, डॉ. पी.बी.खरात व प्रा.गणेश चालींदरवार यांनी अभिनंदन केले

देशोन्नती ४
रविवार, दि. २४ डिसेंबर २०१७
epaper.deshonnati.com

शिवाजी महाविद्यालयात होणार महोत्सव ; प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. नातू, कुलगुरु डॉ. पंडित, हेमंतराव जामकर राहणार उपस्थित

# अविष्कार महोत्सवात दिडशे संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण

विशेष प्रतिनिधी / २३ डिसेंबर

**परभणी :** येथील शिवाजी महाविद्यालयात २९ व ३० डिसेंबर रोजी अविष्कार २०१७ या स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठीय संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवात १५० संशोधन प्रकल्पावर चर्चा होणारअसून याचा शिक्षणक्षेत्रासह शाळा महाविद्यालयाने लाभ घ्यावा असे आवाहण संयोजक प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले आहे.

विद्यार्थ्यामध्ये संशोधन दृष्टी वाढवून संशोधनाचा समाजाला फायदा व्हावा यासाठी गेल्या दहावर्षा पासून नांदेडचे स्वरातीम मराठवाडा विद्यापीठ अविष्कार संशोधन महोत्सव आयोजीतकर्ते यावर्षी हा महोत्सव शिवाजी महाविद्यालयात होणार असून २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांच्या हस्ते या महोत्सवाचे उदघाटन होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर हे भुषवणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ. अविनाश येळीकर शिवाजी महाविद्यालयाचे प्रमुख हेमंतराव जामकर उपस्थित राहणार आहेत.

परभणी नांदेड, हिंगोली, लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयाचे संशोधन महोत्सव त्या त्या जिल्ह्यात झाले असून त्यात प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे संशोधन प्रकल्पा या महोत्सवात येणार आहेत. महोत्सवाचा समारोप समारंभ ३० डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकुलगुरु डॉ. जि.एन.शिंदे हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, उपकोच सचिव महेश त्रिभुवन उपस्थित राहणार आहेत.

या महोत्सवात प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या प्रकल्पाला पारितोषीक देवून गौरवण्यात येणार आहे. या महोत्सवाची जोरदार तयारी सुरु असून त्याचा जास्तीत जास्त फायदा विद्यालय महाविद्यालय व परभणीरांनी घ्यावा असे आवाहण प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. तुकाराम फिसफिसे, डॉ. नाना शितोळे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. के. डी बोगले, डॉ. ए. ए. मुळे यांनी केले आहे.

पुण्यनगरी ▮ सोमवार, २५ डिसेंबर २०१७ ▮ परभणी

# श्री शिवाजी महाविद्यालयात अविष्कार विद्यापीठीय संशोधन महोत्सव

परभणी / प्रतिनिधी

अविष्कार - २०१७ या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठीय संशोधन महोत्सवाचे आयोजन श्री शिवाजी महाविद्यालयात २९, ३० डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. १५० हून अधिक संशोधन प्रकल्प विद्यार्थी सादर करणार आहेत.

महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी (दि.२९) सकाळी ११ वाजता इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायंन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्चचे शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, डॉ.अविनाश येळीकर, हेमंत जामकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या जिल्हास्तरीय संशोधन महोत्सवात यश प्राप्त करणाऱ्या संशोधन प्रकल्पांचा समावेश या विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सवात राहणार आहे. यात मानव विद्याशास्त्र, भाषाशास्त्र, वाङ्मय, कला, शाखा, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, प्युअर सायन्सेस, कृषि आणि पशुवैद्यकीय, अभियांत्रिकी तंत्रज्ञान, औषधी आणि औषणनिर्माणशास्त्र आदी शाखांचे १५० हून अधिक संशोधन प्रकल्प राहणार आहेत. महोत्सवाचा समारोप शनिवारी (दि.३०) डॉ.जी.एन. शिंदे, डॉ. रमजान मुलाणी, महेश त्रिभुवन यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी यशस्वी प्रकल्पांना गौरविण्यात येणार आहे. श्री महाविद्यालयात संशोधन महोत्सवाची तयारी सुरू असून याकरीता विविध समित्या कार्यरत आहेत. या संशोधन महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. तुकाराम फिसफिसे, डॉ. नाना शितोळे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर, डॉ. के डी.बोगले, डॉ.ए.ए. मुळे यांनी केले.

दि. २४ डिसेंबर २०१७

गोदातीर समाचार

# श्री शिवाजी महाविद्यालयात आविष्कार विद्यापीठीय संशोधन महोत्सव

## १५० हून अधिक संशोधन प्रकल्पांचा सहभाग

**परभणी**-श्री शिवाजी महाविद्यालयात आविष्कार २०१७ या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठीय संशोधन महोत्सवाचे आयोजन २९, ३० डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. १५० हुन अधिक संशोधन प्रकल्प विद्यार्थी सादर करणार असून या प्रकल्पांना शाळा महाविद्यालयांनी भेटी द्याव्यात असे आवाहन संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील संशोधनात्मक दृष्टी वाढविण्यासाठी तसेच संशोधनाचा समाजाला फायदा मिळवून देण्यासाठी मागील दहा वर्षापासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे दरवर्षी 'अविष्कार' हा संशोधन महोत्सव आयोजित केला जात असतो. यावर्षीच्या आयोजनाचा बहुमान श्री शिवाजी महाविद्यालयाला मिळाला आहे. प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली समन्वयक, उपप्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी महोत्सवाच्या जय्यत तयारीला लागले आहेत.

महोत्सवाचे उद्घाटन २९ डिसेंबरला सकाळी ११ वाजता इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायंन्स एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ.अरविंद नातू यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर अध्यक्षस्थानी आहेत. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ.अविनाश येळीकर, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रमुख हेमंतराव जामकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयाचे संशोधन महोत्सव त्या त्या जिल्ह्यात स्वतंत्रपणे झाले असून तेथे प्रथम, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या प्रकल्पांचा समावेश या विद्यापीठीय संशोधन महोत्सवात राहणार आहे. त्यामध्ये मानवविद्याशास्त्र, भाषाशास्त्र व वाङ्मय, कला, शाखा, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, प्युअर सायन्सेस, कृषि आणि पशुवैद्यकीय, अभियांत्रीकी तंत्रज्ञान, औषधी आणि औषधनिर्माणशास्त्र इत्यादी शाखांचे १५०हून अधिक संशोधन प्रकल्प राहणार आहेत.

महोत्सवाचे समारोप ३० डिसेंबरला दुपारी ३.३० वाजता प्रकुलगुरु डॉ.जी.एन.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी कुलसचिव डॉ.रमजान मुलाणी, उपकुलसचिव महेश त्रिभुवन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रत्येक शाखेतून प्रथम, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या प्रकल्पांना पारितोषीक देवून गौरविण्यात येणार आहे.

श्री शिवाजी महाविद्यालयाने संशोधन महोत्सवाची जय्यत तयारी केली असून त्यासाठी विविध समित्या कार्यरत आहेत. सर्व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या संशोधन महोत्सवाला भेटी द्याव्यात असे आवाहन संयोजक प्राचार्य डॉ.जाधव, डॉ.[illegible] फिसफिसे, डॉ.नाना शितोळे, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर, डॉ.के.डी.बोगले, डॉ.ए.ए.मुळे यांनी केले आहे.

MY परभणी-हिंगोली २ पुढारी | मंगळवार, २६ डिसेंबर २०१७

संक्षिप्त



परभणी : मीनल शेटे हिचे अभिनंदन करताना श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव. समवेत डॉ.जयंत बोबडे, प्रा.सविता कोकाटे.

## मीनल शेटे हिची निवड

परभणी : राजस्थानमधील उदयपूर येथे १५ ते १९ डिसेंबर कालावधीत 'समवेत-२०१७' पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठीय युवक महोत्सव पार पडला. या युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मीनल शेटे हिने कलात्मक जुळवणी या कलाप्रकारात सर्व तृतीय येण्याचा बहुमान मिळवला आहे. कलात्मक जुळवणीसाठी 'माय ड्रीम' हा विषय देण्यात आला होता. टाकाऊ पासून सुंदर टिकाऊ कलाकृतीचे सादरीकरण करण्यात आले होते. या यशामुळे ती रांची येथे होणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी पात्र ठरली आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख श्री हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ एस एन केशेट्टी, डॉ विजया नांदापुरकर, प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ जयंत बोबडे, प्रा.सविता कोकाटे, डॉ . पी.बी.खरात व प्रा.गणेश चालींदरवार यांनी अभिनंदन केले.

सकाळ
नांदेड, बुधवार
२७ डिसेंबर २०१७
४
परभणी

# 'चौकट व दिसाड दिस' लघुपट सादरीकरणास प्रतिसाद



परभणी / प्रतिनिधी

येथील कैझन पिक्चर्स, आरभाट फिल्म क्लब पुणे व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या चित्रपट रसास्वाद कार्यक्रमात सोमवारी (दि.२५) सायंकाळी चौकट व दिसाड दिस या दोन लघुपटांच्या सादरीकरणास परभणीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

परभणी क्लबचा हा आठवा कार्यक्रम होता. यावेळी चौकट लघुपटाचे दिग्दर्शक उमेश बगाडे, दिसाड दिस लघुपटाचे दिग्दर्शक नागनाथ खरात यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हूणन प्राचार्या विशाला पटनम, प्राचार्य डॉ.बी.यू.जाधव, प्रायोजक सरस्वती सायन्स अकॅडमीचे दीपक पांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमा दरम्यान नागराज मंजुळे यांचा 'पिस्तुल्या' हा लघुपटसुध्दा दाखविण्यात आला. लघुपटाच्या सादरीकरणानंतर उमेश बगाडे व नागनाथ खरात यांनी लघुपटामागे कलात्मक दृष्टिकोन मनोगताद्वारे प्रेक्षकांसमोर मांडला. तरूणांना मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, स्वतःच्या जगण्यातील अनुभव तरूणांनी लघुपटाद्वारे मांडला पाहिजेत. या कार्यक्रमात प्रेक्षकांनी प्रश्न विचारून लघुपटाबद्दल माहिती घेतली. या दोन तरूण दिग्दर्शकांच्या कलाकृती पाहिल्याचा आनंद प्रेक्षकांना झाला. परभणीकरांनी दिलेल्या प्रतिसादाने दोन्ही दिग्दर्शक भारावून गेले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवी पाठक यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सिध्दार्थ मस्के यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नागेश कुलकर्णी, त्र्यंबक वडसकर, अतुल साळवे, गजानन नालटे, शुभम येडके, सौरभ कुरूंदकर, ईश्वर पाटोळे, सचिन टोमके, आदर्श कवळीकर, ऋतुराज भोसले आदींनी पुढाकार घेतला.

पुण्य नगरी
बुधवार, २७ डिसेंबर २०१७ । परभणी

# लघुपटांचा परभणीकरांनी घेतला आनंद

परभणी; ता. २६ (बातमीदार) : श्री शिवाजी महाविद्यालय व कैझन पिक्चर्स परभणी, अरभाट फिल्म क्लब पुणे यांच्या वतीने सोमवारी (ता. २५) आयोजित परभणी फिल्म क्लबमध्ये चौकट, दिसाड दिस, पिस्तुल्या अशा लघुपटांची मेजवानी परभणीकरांना मिळाली.



**परभणीः फिल्म क्लबमध्ये आयोजित चौकट, दिसाड दिस, पिस्तुल्या अशा लघुपट पाहण्यासाठी उपस्थित रसिक.**

परभणी फिल्म क्लबच्या आठव्या कार्यक्रमानिमित्त चौकट व दिसाड दिस यासह पिस्तुल्या हे पुरस्कार प्राप्त लघुपट दाखविण्यात आले. या वेळी चौकटचे दिग्दर्शक उमेश बगाडे, दिसाड दिसचे दिग्दर्शक नागनाथ खरात यांच्यासह प्राचार्या विशाला पटनम, प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव, सरस्वती सायन्स करिअर अॅकॅडमीचे संचालक प्रा. दीपक पांडे यांची उपस्थिती होती. लघुपटाच्या सादरीकरणानंतर श्री. बगाडे व श्री. खरात यांनी लघुपटामागे असलेला कलात्मक दृष्टिकोन मनोगताद्वारे मांडला. स्वतःच्या जगण्यातील अनुभव तरुणांनी लघुपटाद्वारे मांडले पाहिजेत, असे मतही त्यांनी व्यक्त केले. या वेळी परभणीकर रसिकांनी दोन्ही लघुपटास मोठा प्रतिसाद दिला. फिल्म क्लबचे रवी पाठक यांनी कार्यक्रमाचचे प्रास्ताविक केले. सिद्धार्थ मस्के यांनी सूत्रसंचालन करून आभार केले. कार्यक्रमासाठी नागेश कुलकर्णी, त्र्यंबक वडसकर, अतुल साळवे, गजानन नालटे, शुभम येडके, सौरभ कुरुंदकर, ईश्वर पाटोळे, सचिन टटोमके, आदर्श कवळीकर, ऋतुराज भोसले आदींनी पुढाकार घेतला.

# इंद्रायणी माळावर विद्यार्थ्यांनी राबविली स्वच्छता मोहिम

## शिवाजी कॉलेजच्या रासेयो, स्काऊट गाईडचा उपक्रम ■ ग्रामस्थांचाही मोहिमेत सहभाग

**जिल्हा प्रतिनिधी** / २८ डिसेंबर

**परभणी** : श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्काऊट गाईड व राष्ट्रीय सेवायोजनेच्या विद्यार्थ्यांचे तालुक्यातील इंद्रायणी देवी माळावर एक दिवशीय शिबीर घेण्यात आले. या शिबीरा दरम्यान विद्यार्थ्यांनी माळाचा संपूर्ण परिसर स्वच्छ करुन ग्रामस्थांचा स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करुन मोहिमेत सहभाग घेतला.

दरवर्षी नवरात्र महोत्सवात इंद्रायणी देवी माळावर मोठी यात्रा भरत असते. या काळात दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होते. शिवाय दररोजही भाविक दर्शनासाठी येतच असतात. त्यामुळे परिसरात नारळांची कसपटे, कागद, कचरा, प्लास्टीकं कॅरीबॅग आदींसह कचरा पसरला जातो. नंतर कुणीही स्वच्छता करण्यास पुढे येत नाही. परिणाम मंदिर व माळ परिसरास अस्वच्छता दिसून येते. मात्र शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी याठिकाणी एक दिवसाचे शिबीर घेऊन संपूर्ण माळ परिसर स्वच्छ केला. या शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी उप प्राचार्य प्रा. अप्पाराव डहाळे, प्रा.बी.व्ही. आंधळे, प्रा. सुनिल कुलकर्णी, प्रा.बळीराम चव्हाण, प्रा. रुपेश वाघमारे, प्रा. आर.एस. मुंढे, कार्यक्रमाधिकारी प्रा. विनोद शिंगणे, प्रा. विलास कुऱ्हाडकर आदी उपस्थित होते.

देशोन्नती शुक्रवार, दि. २९ डिसेंबर २०१७



**परभणी : तालुक्यातील इंद्रायणी देवीच्या माळावर शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो व स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिम राबविली. या मोहीमेत विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनीही सहभाग घेऊन संपूर्ण परिसर स्वच्छ केला. याप्रसंगी प्राध्यापक वृंद व ग्रामस्थ दिसत आहेत.**

लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि.२९ डिसेंबर २०१७ ४

### इंद्रायणी माळावर स्वच्छता

परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्काऊट गाईड व रासेयो विभागाच्या विद्यार्थ्यांनी तालुक्यातील इंद्रायणी माळावर जाऊन स्वच्छता अभियान राबविले. यावेळी उपप्राचार्य आप्पाराव डहाळे, पर्यवेक्षक बी.व्ही. आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंदिराचा संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला.

शुक्रवार, दि. २९ डिसेंबर २०१७ सामना

# परभणीच्या 'शिवाजी' महाविद्यालयात आज आविष्कार संशोधन महोत्सव

**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयात उद्या शुक्रवार, २९ डिसेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या 'आविष्कार' संशोधन महोत्सवाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता होणार आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, एज्युकेशन अँड रिसर्च पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू हे उद्घाटक आहेत. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर अध्यक्षस्थानी राहणार आहेत. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ. अविनाश येळीकर, श्री शिवाजी महाविद्यालयाला संयोजनाचा बहुमान मिळाला आहे. परभणी, नांदेड, लातूर, हिंगोली जिल्ह्यांतील महाविद्यालयाचे संशोधन विद्यापीठ संशोधन महोत्सवात राहणार आहे. मानव्यविद्याशास्त्र, भाषाशास्त्र आणि वाङ्मय, कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, कायदा, प्युअर सायन्सेस, कृषी, पशुवैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषध निर्माण शास्त्र आदी शाखांचे १०० हून अधिक संशोधन प्रकल्प या महोत्सवात राहणार आहेत. सर्व महाविद्यालयांचे, शाळांचे विद्यार्थी महोत्सवाला भेटी देणार आहेत. दोन दिवस चालणाऱ्या संशोधन महोत्सवाचा शनिवार, ३० डिसेंबरला दुपारी ३.३० वाजता समारोप होणार आहे. प्रा. कुलगुरू डॉ. जी.एस. शिंदे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. डॉ. रमजान मुलानी, उपकुलसचिव महेश त्रिभुवन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. महोत्सवातील उत्कृष्ट संशोधन प्रकल्पांना पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी संशोधन महोत्सवातील प्रकल्पांना भेटी देण्याचे आवाहन संयोजक प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, समन्वयक डॉ. तुकाराम फिसफिसे, डॉ. नाना शितोळे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर यांनी केले आहे.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि.३१ डिसेंबर २०१७ २

# 'अविष्कार'मधील संशोधने समाजाभिमुख



**प्रमाणपत्रांचे वितरण :** परभणी येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित अविष्कार संशोधन महोत्सवातील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांसह प्रभारी कुलगुरु डॉ. गणेश शिंदे, डॉ.रमजान मुलानी, महेश त्रिभूवन, डॉ.वामनराव जाधव, प्राचार्य बाळासाहेब जाधव, डॉ.ए.ए. मुळे, डॉ.के.डी. बोगले, डॉ. नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफिसे आदी.

## समारोप कार्यक्रम : प्रभारी कुलगुरु शिंदे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन संशोधन प्रकल्प तयार करावेत, असे आवाहन करीत अविष्कार संशोधन महोत्स्वाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधनांना समाजाभिमूख बनविण्याचे कार्य विद्यापीठ करीत आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ.गणेश शिंदे यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यलयात आयोजित अविष्कार संशोधन महोत्सवाच्या समारोपप्रसंगी डॉ.शिंदे बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ.रमजान मुलानी, उपकुलसचिव महेश त्रिभूवन, प्राचार्य डॉ.वामनराव जाधव यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, समन्वयक डॉ.ए.ए. मुळे, डॉ.के.डी. बोगले, डॉ.नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफिसे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

डॉ.शिंदे म्हणाले, संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून समाजाला दिशा दाखविण्याचे काम विद्यार्थी करु शकतात. समाजाला अधिकाधिक फायदा होईल, अशी संशोधने करावीत, असे सांगून अविष्कार संशोधन महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक बनण्याची मोठी संधी उपलब्ध करुन दिली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ.मुलानी यांचेही भाषण झाले. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी संशोधन महोत्सव आयोजनामागची भूमिका मांडून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या महोत्सवात १२० हून अधिक संशोधन प्रकल्पांचे परिक्षण करणाऱ्या परिक्षकांचा सत्कार करण्यात आला. डॉ.मुळे, डॉ.खैरनार, डॉ.रणखांब, शुभांगी पाटील, मनोज जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ.चिंदूरवार, प्राचार्य डॉ.सोनवणे, प्राचार्य डॉ.घुले यांची उपस्थिती होती. प्रा.रामप्रसाद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.डॉ.नाना शितोळे यांनी आभार मानले.

# धूतमल यांच्या संशोधनास प्रथम पारितोषिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येथे आयोजित अविष्कार संशोधन महोत्सवात वसमत येथील योगानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थिनी प्रज्ञा धूतमल यांच्या विज्ञान प्रवर्गातील पीएच.डी. संशोधनास प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

परभणी येथे २९ व ३० डिसेंबर असे दोन दिवस शिवाजी महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय अविष्कार २०१७ संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवांतर्गत सादर करण्यात आलेल्या संशोधनांना शनिवारी आयोजित कार्यक्रमात पारितोषिक वितरित करण्यात आले. यावेळी वसमत येथील योगानंद महाविद्यालयातील विद्यार्थिनी प्रज्ञा धूतमल यांनी प्रा.डॉ.वर्षा झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली 'हिरव्या पालेभाज्यांचा ॲनेमिया कमी करण्यासाठी उपयोग' या विषयावर शोधनिबंध सादर केला. या शोध निबंधास प्रथम पारितोषिक जाहीर करुन सुवर्णपदक व प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी प्र.कुलगुरु डॉ. जी.एन. शिंदे, कुलसचिव डॉ. मुलानी, डॉ. त्रिभूवन, डॉ. वामन जाधव, प्राचार्य बाळासाहेब जाधव आदींची उपस्थिती होती. प्रज्ञा धूतमल यांच्या संशोधनाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

रविवार, दि. ३१ डिसेंबर २०१७ ४
epaper.deshonnati.com

देशोन्नती

# निसर्गाच्या निरीक्षणातूनच संशोधनाची दृष्टी विकसीत होते - डॉ. अरविंद नातू

**शहर प्रतिनिधी / ३० डिसेंबर**

**परभणी :** जगामध्ये आजपर्यंत झालेले संशोधन हे निसर्गाच्या निरीक्षणातूनच पुढे आलेले असल्याने निसर्ग हा आमचा मुख्य मार्गदर्शक आहे. असे प्रतिपादन जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अरविंद नातू यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालय आणि स्वामी रामानंदतिर्थ मराठवाडा विद्यापिठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापिठ स्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी डॉ.नातू बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर प्रमुख पाहूणे म्हणुन डॉ.अविनाश येळीकर, हेमंतराव जामकर, केशवराव दुधाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.के.डी.भोगले, डॉ.ए.ए.मुळे, अविष्कारचे संयोजक डॉ.नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफीसे आदिंची उपस्थिती होती. डॉ.अरविंद नातु यांनी आपण निसर्गापासून काय शिकलो या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की,



परभणी : विद्यापिठीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे उदघाटन करतांना जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अरविंद नातू यांच्यासह प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, हेमंतराव जामकर, कुलगुरू डॉ.विद्यासागर पंडीत व इतर

अविष्कार संशोधन महोत्सवातून अनेक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती आणि दृष्टी विकसीत होत आहे. या बद्दल त्यांनी कुलगुरू यांचे अभिनंदन केले. आजची मुले कुठेही कमी नाहीत.

त्यांना संधी देवून त्यांच्यातील जिज्ञासू वृत्तीला जागे केले पाहिजे. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनामुळे औषधांच्या किंमती कमी होत आहेत. त्यामुळे संशोधनात्मक उपक्रमांना विद्यार्थी जीवनापासून गती दिली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर यांनी आविष्कार संशोधन महोत्सवाची संकल्पना विशद केली. या महोत्सवातून अनेक विद्यार्थी स्वतःचा उद्योग-व्यवसाय उभारून हजारो मानसांना रोजगार देत आहेत, ही आशादायक बाब या महोत्सवातून साकार होत आहे. शिवाजी महाविद्यालयाने उत्सफुर्तपणे या महोत्सवाचे आयोजन केल्याने प्राचार्य व व्यवस्थापक हे अभिनंदनास पात्र आहेत असेही ते म्हणाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.अविनाश येळीकर यांनी भाषणे झाली. डॉ.नाना शितोळे यांनी डॉ.नातू यांचा परिचय केला. सुत्रसंचालन प्रा.रविशंकर झिंगरे यांनी केले. डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी आभार मानले.

या वेळी मंडळाचे विकास अधिकारी प्राचार्य डॉ.आर.टी.देशमुख, प्राचार्य डॉ.वामनराव जाधव, प्राचार्य डॉ.वसंत भोसले, प्राचार्य डॉ.घुले आदि उपस्थित होते. या महोत्सवात परभणी, नांदेड, हिंगोली व लातूर जिल्ह्यातील १३२ संशोधक सहभागी झाले आहेत.

# अविष्कार महोत्सवात १३२ संशोधक सहभागी

**परभणी : प्रतिनिधी**

येथील श्री शिवाजी महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्घाटन पुणे येथील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स, एज्युकेशन अॅन्ड रिसर्चचे ज्येष्ठशास्त्रज्ञ डॉ.अरविंद नातू यांनी केले. महोत्सवात परभणी, नांदेड, हिंगोली व लातूर जिल्ह्यातील १३२ संशोधक सहभागी झाले.

अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडीत विद्यासागर होते. यावेळी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे केंद्रीय कोषाध्यक्ष डॉ.अविनाश येळीकर, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा स्थानिक नियामक मंडळ प्रमुख हेमंतराव जामकर, सदस्य केशवराव दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ.के.डी.भोगले, डॉ.ए.ए.मुळे, अविष्कारचे संयोजक डॉ.नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफिसे आदी मंचावर उपस्थित होते. डॉ. अरविंद नातू यांनी मार्गदर्शन केले. जगामध्ये आजपर्यंत झालेले संशोधन हे निसर्गाच्या निरीक्षणातूनच पुढे आलेले असल्याने निसर्ग हा आमचा मुख्य मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. मुलांच्या जिज्ञासूवृत्तीला जागे केले पाहिजे. संशोधनात्मक उपक्रमांना विद्यार्थी जीवनापासून गती दिली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप कुलगुरु डॉ.पंडीत यांनी अविष्कार संशोधन महोत्सवाचे संकल्पना विषद केली. डॉ.नाना शितोळे यांनी डॉ.नातू यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा.रविशंकर झिंगरे यांनी केले तर डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी आभार प्रदर्शन केले.



**परभणी :** विद्यापीठीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्घाटन करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अरविंद नातू. समवेत कुलगुरू डॉ.विद्यासागर पंडित, डॉ.अविनाश येळीकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव आदी.

सकाळ TODAY

रविवार, ३१ डिसेंबर २०१७

# विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने संशोधन करावे : डॉ. शिंदे

**परभणी, ता. ३० (बातमीदार)** : विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, कष्टाने पुढे येऊन संशोधन प्रकल्प तयार करावेत. या संशोधनाला समाजाभिमुख बनविण्याचे कार्य आविष्कार संशोधन महोत्सवातून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ करीत असल्याचे प्रतिपादन प्रभारी कुलगुरू डॉ. गणेश शिंदे यांनी केले.

परभणीतील श्री. शिवाजी महाविद्यालयात शनिवारी (ता. ३०) आविष्कार संशोधन महोत्सवाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. रमजान मुलानी यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी या महोत्सवाची भूमिका मांडली. समन्वयक डॉ. ए. ए. मुळे, डॉ. खैरनार, प्रा. रणखांब, शुभांगी पाटील, मनोज जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. उपकुलसचिव महेश त्रिभुवन, प्राचार्य डॉ. वामनराव जाधव, डॉ. के. डी. बोगले, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्राचार्य डॉ. चिंदुरवार, प्राचार्य डॉ. सोनवणे, प्रा. डॉ. घुले उपस्थित होते. या महोत्सवात १२० हून अधिक संशोधनाचे परीक्षण करणाऱ्या परीक्षक; तसेच पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नाना शितोळे यांनी आभार मानले. डॉ. शिंदे यांनी संशोधनातून तरुण विद्यार्थी समाजाला दिशा दाखविण्याचे काम करू शकतात. ज्यातून आधिकाधिक फायदा होईल. त्यामुळे या महोत्सवातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक बनण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन केले.

सकाळ
नांदेड, शुक्रवार
२९ डिसेंबर २०१७



परभणी : अविष्कार संशोधन महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी शुक्रवारी डॉ. अरविंद नातू यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. या वेळी कुलगुरू पंडित विद्यासागर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, हेमंतराव जामकर, डॉ. अविनाश येळीकर, केशवराव दुधाटे, डॉ. के. डी. भोसले, डॉ. ए. ए. मुळे, डॉ. नाना शितोळे, डॉ. तुकाराम फिसफिसे. (छायाचित्र : योगेश गौतम)

# संशोधनाबाबत निसर्ग हा मुख्य मार्गदर्शक

## डॉ. अरविंद नातू यांचे प्रतिपादन : अविष्कारचे उद्घाटन

**परभणी, ता. २९ (बातमीदार) :** जगामध्ये आजपर्यंत झालेले संशोधन हे निसर्गाच्या निरीक्षणातून पुढे आलेले असल्याने निसर्ग हा आमचा मुख्य मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन पुणे येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, एज्युकेशन अँड रिसर्चचे शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांनी शुक्रवारी (ता. २९) केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर हे तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे केंद्रीय कोषाध्यक्ष डॉ. अविनाश येळीकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य हेमंतराव जामकर, सदस्य केशवराव दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. के. डी. भोगले, डॉ. ए. ए. मुळे, अविष्कारचे संयोजक डॉ. नाना शितोळे, डॉ. तुकाराम फिसफिसे आदी मंचावर उपस्थित होते. डॉ. अरविंद नातून यांनी 'आपण निसर्गापासून काय शिकलो' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, अविष्कार संशोधन महोत्सवातून अनेक विद्यार्थांमध्ये संशोधनात्मक वृत्ती आणि दृष्टी विकसीत होत आहे. याबद्दल त्यांनी कुलगुरू डॉ. पंडित यांचे अभिनंदन केले. आजची मुले कुठेही कमी नाहीत, त्यांना संधी देऊन त्यांच्यातील जिज्ञासूवृत्तीला जाग केले पाहिजे. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनामुळे औषधांच्या किंमती स्वस्त होत आहेत. त्यामुळे संशोधनात्मक उपक्रमांना विद्यार्थी जीवनापासून गती दिली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ. पंडित यांनी आविष्कार संशोधन महोत्सवाची संकल्पना विषद केली. या महोत्सवातून अनेक विद्यार्थी स्वतःच्या उद्योग व्यवसाय उभारून हजारो माणसांना रोजगार देत आहेत. ही आशादायक बाब या महोत्सवातून साकार होत आहे. शिवाजी महाविद्यालयाने उत्स्फूर्तपणे या महोत्सवाचे आयोजन केल्याने प्राचार्य व व्यवस्थापक हे अभिनंदनास प्राप्त आहेत, अशा शब्दांत त्यांनी गौरव केला. या वेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. अविनाश येळीकर यांनी समायोजित भाषण केले. डॉ. नाना शितोळे यांनी डॉ. नातू यांचा परिचय करून दिला. प्रा. रविशंकर झिंगरे यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी आभार मानले. या वेळी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे विकास अधिकारी प्राचार्य डॉ. आर.टी. देशमुख, प्राचार्य डॉ. वामनराव जाधव, प्राचार्य डॉ. वसंत भोसले, प्राचार्य डॉ. घुले उपस्थित होते.

### १३२ संशोधक सहभागी

**संशोधन महोत्सवात परभणी, नांदेड, हिंगोली व लातूर जिल्ह्यातील १३२ संशोधक सहभागी झाले आहेत. शनिवारी (ता. ३०) या महोत्सवाचा समारोप होणार आहे.**

लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि.२९ डिसेंबर २०१७

# अविष्कार महोत्सवाचे आज उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन केले आहे. २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता महोत्सवाचे उद्घाटन होईल.

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स, एज्युकेशन अँड रिसर्च पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर हे तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ. अविनाश येळीकर, शिवाजी महाविद्यालयाचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची उपस्थिती राहणार आहे.

दि. ३० डिसेंबर २०१७
गोदातीर समाचार

# निसर्गाच्या निरिक्षणातूनचं संशोधनाची दृष्टी विकसीत होते-डॉ.अरविंद नातू

**परभणी/प्रतिनिधी**

जगामध्ये आजपर्यंत झालेले संशोधन हे निसर्गाच्या निरिक्षणातूनच पुढे आलेले असल्याने निसर्ग हा आमचा मुख्य मार्गदर्शक आहे असे प्रतिपादन पुणे येथील इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, एज्युकेशन अॅड रिसर्चचे शास्त्रज्ञ डॉ.अरविंद नातू यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ.नातू बोलत होते. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडीत विद्यासागर प्रमुख अतिथी मशिप्र मंडळाचे केंद्रीय कोषाध्यक्ष डॉ.अविनाश येळीकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य हेमंतराव जामकर, सदस्य केशवराव दुधाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.के.डी.भोगले, डॉ.ए.ए.मुहे, आविष्कारचे संयोजक डॉ.नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफिसे आदी मंचावर उपस्थित होते.

डॉ.नातू यांनी आपण निसर्गापासून काय शिकलो या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, आविष्कार संशोधन महोत्सवातून अनेक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती आणि दृष्टी विकसीत होत आहे. या बद्दल त्यांनी कुलगुरु डॉ.पंडीत यांचे अभिनंदन केले. आजची मुले कुठेही कमी नाहीत त्यांना संधी देवून त्यांच्यातील जिज्ञासूवृत्तीला जाग केले पाहिजे. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनामुळे औषधाच्या किंमती स्वस्त होत आहेत. त्यामुळे संशोधनात्मक उपक्रमांना विद्यार्थी जीवनापासून गती दिली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपात कुलगुरु डॉ. पंडीत यांनी आविष्कार संशोधन महोत्सवाची संकल्पना विषद केली. या महोत्सवातून अनेक विद्यार्थी स्वतःचा उद्योग-व्यवसाय उभारुन हजारो माणसांना रोजगार देत आहेत, ही आशादायक बाब या महोत्सवातून साकार होत आहे. शिवाजी महाविद्यालयाने उत्स्फुर्तपणे या महोत्सवाचे आयोजन केल्याने प्राचार्य व व्यवस्थापक हे अभिनंदनास प्राप्त आहेत अशा शब्दात त्यांनी गौरव केला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.जाधव, डॉ.अविनाश येळीकर यांनी समायोजित भाषण केले. डॉ.नाना शितोळे यांनी डॉ.नातू यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.रविशंकर झिंगरे यांनी केले तर डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी मशिप्र मंडळाचे विकास अधिकारी प्राचार्य डॉ.आर.टी.देशमुख, प्राचार्य डॉ.वामनराव जाधव, प्राचार्य डॉ.वसंत भोसले, प्राचार्य डॉ.घुले आदी उपस्थित होते. या संशोधन महोत्सवात परभणी, नांदेड, हिंगोली व लातूर जिल्ह्यातील १३२ संशोधक सहभागी झाले आहेत.

निवार, दि.३० डिसेंबर २०१७ पान नं.४
दैनिक समर्थ दिलासा

# निसर्गाच्या निरिक्षणातूनच संशोधनाची दृष्टी विकसीत होतेः शास्त्रज्ञ डॉ.नातू

## श्री शिवाजी महाविद्यालयात आविष्कार संशोधन महोत्सवाचे उदघाटनः चार जिल्ह्यातील १३२ संशोधक सहभागी

परभणी, दि.२९(प्रतिनिधी) जगामध्ये आजपर्यंत झालेले संशोधन हे निसर्गाच्या निरीक्षणातूनच पुढे आलेले असल्याने निसर्ग हा आमचा मुख्य मार्गदर्शक आहे असे प्रतिपादन पुणे येथील इंडियन इन्स्टिट्युट आफ सायन्स, एज्युकेशन अन्ड रिचर्सचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अरविंदू नातू यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ.नातू बोलत होते. उद्घाटन सभारंभाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे केंद्रीय कोषाध्यक्ष डॉ.अविनाश येळीकर, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा स्थानिक नियामक मंडख प्रमुख हेमंतराव जामकर, सदस्य केशवराज दुघाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.के.डी.भोगले, डॉ.ए.ए.मुळे, आविष्कारचे संयोजक डॉ.नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफिसे आदींची मंचावर उपस्थिती होती. डॉ.अरविंद नातू यांनी आपण निसर्गापासून काय शिकलो या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले कि, आविष्कार संशोधन महोत्सवातून अनेक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती आणि दृष्टी विकसी होत आहे. याबद्दल त्यांनी कुलगुरू डॉ.पंडीत यांचे अभिनंदन केले. आजची मुले कुठेही कमी नाहीत त्यांना संधी देऊन त्यांच्यातील जिज्ञासूवृत्तीला जागं केले पाहिजे. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनामुळे औषधाच्या किंमती स्वस्त होत आहेत. त्यामुळे संशोधनात्मक उपक्रमांना विद्यार्थी जीवनापासून गती दिली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्ष समारोपात कुलगुरू डॉ.पंडीत यांनी आविष्कार संशोधन महोत्सवाची संकल्पना विषद केली. या महोत्सवातून अनेक विद्यार्थी स्वतःचा उद्योग व्यवसाय उभारून हजारों माणसांना रोजगार देत आहेत. ही आशादायक बाब या महोत्सवातून साकार होत आहे. शिवाजी महाविद्यालयाने उत्स्फुर्तपणे या महोत्सवाचे आयोजन केल्याने प्राचार्य व व्यवस्थापक हे अभिनंदनास प्राप्त आहेत अशा शब्दात त्यांनी गौरव केला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.अविनाश येळीकर यांची भाषणे झाली. सुत्रसंचलन प्रा.रविशंकर झिंगरे तर डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी आभार मानले. यावेळी म.शि.प्र.मंडळाचे विकास अधिकारी प्राचार्य डॉ.आर.टी. देशमुख, प्राचार्य डॉ.वामनराव जाधव, प्राचार्य डॉ.वसंत भोसले, प्राचार्य डॉ.घुले आदीं उपस्थित होते. या संशोधन महोत्सवात परभणी, नांदेड, हिंगोली व लातूर जिल्ह्यातील १३२ संशोधक सहभागी झाले आहेत.



२ पुढारी | गुरुवार, २८ डिसेंबर २०१७

# परभणीत उद्या अविष्कार विद्यापीठीय संशोधन महोत्सव

**परभणी : प्रतिनिधी**

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठीय संशाधेन महोत्सवाचे उद्‌घाटन २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायंन्स एज्युकेशन अ‍ॅन्ड रिसर्च पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांच्या हस्ते होणार आहे.

अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर हे राहतील. यावेळी मंचावर मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ.अविनाश येळीकर, महाविद्यालय प्रमुख हेमंतराव जामकर यांची विशेष उपस्थिती राहील. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संशोधकतेला व कल्पकतेला उजाळा देणाऱ्या या महोत्सवाचे आयोजन विद्यापीठाकडून मागील दहा वर्षापासून करण्यात येते. यावर्षीच्या महोत्सवाचे संयोजकपद श्री शिवाजी महाविद्यालयास मिळाले आहे. या संशोधन महोत्सवात १५० पेक्षा जास्त संशोधक सहभागी होणार आहेत. विशेषतः मानवविज्ञानास्त्र, भाषाशास्त्र व वाडमय, कला, शाखा , वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, प्युअर सायन्सेस, कृषी आणि पशुवैद्यकीय, अभियांत्रीकी तंत्रज्ञान औषधी आणि औषध निर्माणशास्त्र या विषयातील संशोधन प्रकल्प सहभागी होती. या महोत्सवाचा समारोप ३० डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता होणार आहे. या कार्यक्रमाला प्रकुलगुरु डॉ.जी.एन. शिंदे हे अध्यक्ष तर प्रमुख पाहुणे म्हणुन कुलसचिव डॉ. रमजान मुलाणी, उपकुलसचिव महेश त्रिभुवन हे उपस्थित राहतील.या महोत्सवाला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भेटी द्याव्यात असे आवाहन प्राचार्य बाळासाहेब जाधव, समन्वयक डॉ. तुकाराम फिसफिसे, डॉ.नाना शितोळे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर, विद्यापीठ डॉ. के.डी. बोगले, डॉ.ए.ए.मुळे यांनी केले आहे.

दैनिक समर्थ
दिलासा
शुक्रवार, दि.२९ डिसेंबर २०१७ पान नं.४

# परभणीत अविष्कार संशोधन महोत्सवाचे आज उदघाटन

परभणी, दि.२८(प्रतिनिधी): स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्घाटन दि.२९ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता होणार आहे.

इंडियन इन्स्टीट्युट आफ सायन्स, एज्युकेशन अन्ड रिचर्स पुणे येथील येथील शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू हे उद्घाटक आहेत. कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर अध्यक्षस्थानी राहणार आहे. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ.अविनाश येळीकर, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक विकासासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ दरवर्षी अविष्कारचे आयोजन करते. यावर्षी श्री शिवाजी महाविद्यालयाला संयोजनाचा बहुमान मिळाला आहे. परभणी नांदेड, लातूर, हिंगोली जिल्ह्यातील महाविद्यालयांचे संशोधन महोत्सव त्या-त्या जिल्ह्यात स्वतंत्रपणे झालेले आहेत. येथे निवड झालेल्या प्रकल्पांच्या समावेश विद्यापीठ संशोधन महोत्सवात राहणार आहे. मानव्यविद्याशास्त्र, भाषाशास्त्र आणि वाङ्‌मय, कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन,कायदा, प्युअर सायनसेस, कृषी, पशुवैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषध निर्माण शास्त्र आदी शाखांचे शंभराहून अधिक संशोधन प्रकल्प या महोत्सवात राहणार आहेत. सर्व महाविद्यालये शाळांचे विद्यार्थी महोत्सवाला भेटी देणार आहेत. दोन दिवस चालणार्या संशोधन महोत्सवाचा समारोप दि.३० डिसेंबरला शनिवारी दुपारी साडेतीन वाजता होणार आहे. प्र.कुलगुरू डॉ. ज़ी.एस.शिंदे अध्यक्षस्थानी राहणार आहे. डॉ.रमजान मुलानी, उपकुलसचिव महेश त्रिभुवन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. महोत्सवातील उत्कृष्ट संशोधन प्रकल्पांना पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. श्री शिवाजी महाविद्यालयाने संशोधन महोत्सवाची जय्यत तयारी केली आहे. त्यासाठी विविध समित्या गठीत केल्या आहेत. परभणी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी संशोधन महोत्सवातील प्रकल्पांना भेटी देण्याचे आवाहन संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, समन्वयक डॉ.तुकाराम फिसफिसे, डॉ.नाना शितोळे, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर यांनी केले आहे.

% OFF
SPECIAL OFFERS
BEST DEALS!
ORDER ONLINE NOW
आपल्या शहरातील ऑफर्स
डिस्काऊंट, सेल, प्रदर्शने ई. ची
माहिती फ्रि मध्ये
मिळविण्यासाठी खालील
Whats app
नंबरवर Hi पाठवा
ही सेवा ८ जानेवारी २०१८ पासून सुरु होत आहे.
8237542120


# निसर्गाच्या निरीक्षणातूनच संशोधनाला नवे धुमारे

## आविष्कार संशोधन महोत्सव: नातू यांचे प्रतिपादन



परभणी शहरातील शिवाजी महाविद्यालयात आविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्घाटन करताना शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू, कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर आदी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** :जगामध्ये आजपर्यंत झालेले संशोधन हे निसर्गाच्या निरीक्षणातूनच पुढे आले असल्याने निसर्ग हा आमचा मुख्य मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, एज्युकेशन ॲण्ड रिसर्चचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अरविंद नातू यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ.नातू बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अविनाश येळीकर, हेमंतराव जामकर, केशवराव दुधाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ. के.डी. भोगले, डॉ.ए.ए.मुळे, आविष्कारचे संयोजक डॉ.नाना शितोळे, डॉ. तुकाराम फिसफिसे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.नातू यांनी 'आपण निसर्गापासून काय शिकलो?' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात बोलताना कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर यांनी अविष्कार संशोधन महोत्सवाची संकल्पना विषद केली. या महोत्सवातून अनेक विद्यार्थी स्वत:चा उद्योग, व्यवसाय उभारुन हजारो युवकांना रोजगार देत आहेत. ही आशादायक बाब या महोत्सवातून साकार होत आहे, असे ते म्हणाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. शितोळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.रविशंकर झिंगरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. फिसफिसे यांनी आभार मानले. यावेळी प्रा.डॉ.आर.टी.देशमुख, प्रा.डॉ. वामनराव जाधव, प्रा.डॉ. वसंत भोसले, प्रा.डॉ.विठ्ठल घुले यांची उपस्थिती होती. या संशोधन महोत्सवात परभणी, नांदेड, हिंगोली व लातूर जिल्ह्यांतील १३२ संशोधक सहभागी झाले आहेत.

2 पुण्य नगरी
रविवार, ३१ डिसेंबर २०१७ | परभणी- हिंगोली

# 'विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, कष्टाने संशोधन प्रकल्प तयार करावेत'

परभणी / प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, कष्टाने पुढे येवून संशोधन प्रकल्प तयार करावेत. अविष्कार संशोधन महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधनाला समाजभिमूख बनविण्याचे कार्य विद्यापीठ करीत असल्याचे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ.गणेश शिंदे यांनी केले.




येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, उपकुल सचिव महेश त्रिभुवन, प्राचार्य डॉ.वामन जाधव उपस्थित होते. प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, समन्वयक डॉ.ए.ए.मुळे, डॉ.के.डी. बोगले, डॉ.नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफिसे यांची उपस्थिती होती. डॉ. गणेश शिंदे म्हणाले, संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून समाजाला दिशा दाखविण्याचे काम तरूण विद्यार्थी करू शकतात म्हणून चांगले संशोधन प्रकल्प विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि कष्टाने तयार केले पाहिजेत. ज्यामधून समाजाला अधिकाधिक फायदा होवू शकेल. विद्यापीठाने अविष्कार संशोधन महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक बनण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. याचा फायदा घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी डॉ. रमजान मुलानी यांनीही मार्गदर्शन केले. या संशोधन महोत्सवात १२० हून अधिक संशोधन प्रकल्पांचे परिक्षण करणाऱ्या परिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.मुळे, डॉ.खैरनार, रणखांब, शुभांगी पाटील, मनोज जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. महोत्सवातील पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. चिंदुरवार, प्राचार्य डॉ.सोनवणे, प्राचार्य डॉ.घुले यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन रामप्रसाद देशमुख यांनी केले तर आभार डॉ.नाना शितोळे यांनी मानले.

# विशेष निवासी मार्गदर्शन शिबिर

परभणी -अस्मिता फाऊंडेशनच्या वतीने ६ ते १२ जानेवारी दरम्यान गोवोली येथे स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विशेष निवासी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरात जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची संधी मिळणार असून याकरीता सोमवार १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात शशीकांत बोरसे, रवींद्र अग्रवाल मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.रामानंद व्यवहारे, उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर उपस्थित राहणार आहेत. या कॅम्पमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना गोवोली येथे होणाऱ्या विशेष मार्गदर्शन शिबिरात सहभागी होता येणार आहे. शिबिरात सात दिवस निवास व भोजनाची व्यवस्था राहणार आहे. या सात दिवसांच्या कार्यकाळात विविध अधिकारी, तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. याकरीता श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित कॅम्पमध्ये सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.रामानंद व्यवहारे, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर यांनी केले आहे.

देशोन्नती परभणी - शुक्रवार, दि. २९ डिसेंबर २०१७

# स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी निवासी मार्गदर्शन शिबीर

**कार्यालय प्रतिनिधी / २८ डिसेंबर**

**परभणी :** एमपीएससी, युपीएससी स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या महाराष्ट्रातील होतकरु आणि गरीब विद्यार्थ्यासाठी ठाणे-मुंबई येथे विशेष निवासी मार्गदर्शन शिबीर होणार आहे. शिबीरात विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी १ जानेवारी रोजी श्री शिवाजी महाविद्यालयात कॅम्प होणार असुन यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अस्मीता फाउंडेशन मागील पाच वर्षापासुन स्पर्धा परिक्षा विशेष निवासी मार्गदर्शन शिबीर आयोजीत करत असते. या वर्षीचे शिबीर ६ ते १२ जानेवारी दरम्यान गोवोली (कल्याण - ठाणे) येथे होणार आहे. या शिबीरात सहभागी होण्यासाठी श्री शिवाजी महाविद्यालयात १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता कॅम्प आयोजीत करण्यात आला आहे. या वेळी शषीकांत बोरसे, रविंद्र अग्रवाल (मुंबई) हे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे राहणार आहेत. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. रामानंद व्यवहारे उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर यांची उपस्थिती राहणार आहे. कॅम्पमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची ६ ते १२ जानेवारी दरम्यानच्या शिबीरात मोफत निवास, भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. या शिवाय विविध अधिकारी, तज्ञांचे मार्गदर्शन ही लाभणार आहे. बीए, बीकॉम, बीएस्सीमध्ये शिक्षण घेणारे अथवा शिक्षण पुर्ण करणारे विद्यार्थी, एम.ए., एम. कॉम, एमएस्सी करीत असलेले किंवा पुर्ण झालेले विद्यार्थी यासह इतर शाखेचे विद्यार्थीही कॅम्पमध्ये सहभागी होवु शकतील.

विद्यार्थ्यांनी दोन फोटो, आधारकार्ड, रेशन कार्ड सोबत आणने बंधनकारक आहे. गरजु विद्यार्थ्यांनी निवड कॅम्पमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुण्य नगरी
शुक्रवार, २९ डिसेंबर २०१७ । परभणी

# रासेयो विद्यार्थ्यांनी इंद्रायणी माळावर केली स्वच्छता

परभणी / प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्काऊट गाईड व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी इंद्रायणी माळावर स्वच्छता मोहीम राबवून माळावर स्वच्छता केली. स्वच्छता मोहिमेच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या वतीने इंद्रायणी माळावर एक दिवसीय शिबिर आयोजित करून स्वच्छता केली.

या शिबिराचे उद्घाटन उपप्राचार्य आप्पाराव डहाळे, बी.व्ही. आंधळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी आंधळे यांनी विद्यार्थी जीवनात श्रमसंस्काराचे महत्व पटवून दिले. शिबिरात ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होते. या मोहिमेत माळावर झालेला कागदी, प्लास्टीक, कॅरिबॅग, नारळ यांचा कचरा एकत्रित करून त्याची विल्हेवाट लावली व देवीच्या मंदिराचा परिसर झाडून स्वच्छ केला. यावेळी सुनील कुलकर्णी, बळीराम चव्हाण, रूपेश वाघमारे, एस.आर. मुंढे उपस्थित होते. शिबिर यशस्वीतेसाठी विनोद शिंगणे, विलास कुऱ्हाडकर, एस.एन.पांडे, अच्युत तरफडे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद शिंगणे यांनी केले तर आभार विलास कुऱ्हाडकर यांनी मानले.

सकाळ

नांदेड, शुक्रवार, २२ डिसेंबर २०१७

५

# मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद

## पाहिजेत (विनाअनुदान - Non Grant)

**(मा.शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे पद भरती परवानगी आदेश क्र. कमवि-1/नाप्र/2016-17/6876/78, दि. 16.09.2017 जा.क्र. कमवि-1/2017-18/23616/18, दि. 30.11.2017)**

खालील तक्त्यातील विनाअनुदानित पदांकरिता प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवाराकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.
जाहिरात जा.क्र. म.शि.प्र.मं./2017-18/1879, दि. 19/12/2017

### विनाअनुदानित तत्वावरील शिक्षकांची रिक्त पदे भरावयाची आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पूर्णवेळ रिक्त पदे | अर्धवेळ रिक्त पदे |
|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण / उच्च माध्यमिक विद्यालय शिक्षक | 52 | 05 |

प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदभरतीबाबतचा संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता आरक्षण इत्यादी बाबतच्या संविस्तर तपशीलासाठी मंडळाच्या www.mspmandal.in व www.mspmandal.co.in या संकेतस्थळावरील Advertisement व Apply Online लिंकवर संविस्तर जाहिरात तथा Online अर्ज करण्याची सुविधा दि. 06/01/2018 रोजी 23.59 वाजेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.
टिप : जाहिरातीतील नमुद केलेली पदसंख्या व आरक्षण कमी अधिक होऊ शकते.

ठिकाण : औरंगाबाद
दिनांक : 19/12/2017

अध्यक्ष　　सरचिटणीस
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद

सकाळ

नांदेड, शुक्रवार
२९ डिसेंबर २०१७

४

## स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी शिबिर

परभणी, ता. २८ : एमपीएससी, यूपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या राज्यातील होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी ठाणे-मुंबई येथे विशेष निवासी मार्गदर्शन शिबिर होणार आहे. शिबिरासाठी सोमवारी (ता. एक जानेवारी) श्री शिवाजी महाविद्यालयात निवड चाचणी शिबिर आयोजित केले.

अस्मिता फाउंडेशनच्या वतीने मागील पाच वर्षांपासून स्पर्धा परीक्षा विशेष निवासी मार्गदर्शन शिबिर घेतले जाते. यावर्षीचे शिबिर ता. सहा ते १२ जानेवारीदरम्यान गोवेली (कल्याण-ठाणे-मुंबई) येथे होणार आहे. त्यासाठी श्री शिवाजी महाविद्यालयात निवड शिबिर आयोजित केले आहे. ता. एक जानेवारी रोजी निवड शिबिरास शशिकांत बोरसे, रवींद्र अग्रवाल (मुंबई) हे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव राहणार आहेत. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. रामानंद व्यवहारे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर यांची उपस्थिती राहणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विशेष शिबिरात सात दिवस राहण्याची, भोजनासहित मोफत सोय असणार आहे.

दि.३१ डिसेंबर २०१७
गोदातीर समाचार

# स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी सोमवारी विशेष निवासी मार्गदर्शन शिबीर

**परभणी/प्रतिनिधी**

एमपीएससी, युपीएससी स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या महाराष्ट्रातील होतकरु आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी ठाणे-मुंबई येथे विशेष निवासी मार्गदर्शन शिबीर होणार आहे. या शिबीरात विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी १ जानेवारी, सोमवारी श्री शिवाजी महाविद्यालयात कॅम्प होणार आहे. यामध्ये परभणी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अस्मिता फाऊंडेशनतर्फे मागील पाच वर्षापासून स्पर्धा परिक्षा विशेष निवासी मार्गदर्शन शिबीर घेतले जाते. यावर्षीचे शिबीर ६ ते १२ जानेवारीदरम्यान गोवोली येथे होणार आहे. या शिबीरात विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी श्री शिवाजी महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रातर्गत कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी सकाळी ११ वाजता शशीकांत बोरसे, रविंद्र अग्रवाल(मुंबई) हे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव हे राहणार आहेत. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ.रामानंद व्यवहारे, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कॅम्पमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ६ ते १२ जानेवारी दरम्यान होणाऱ्या गोवोली, कल्याण-ठाणे-मुंबईच्या विशेष मार्गदर्शन शिबीरात सहभागी होता येईल. या शिबीरात सात दिवस राहण्याची, जेवणाची संपूर्ण व्यवस्था मोफत आहे. सात दिवस विविध अधिकारी, तज्ञांचे मार्गदर्शन शिबीरात होणार आहे. ग्रंथालय संगणक, इंटरनेटची सोय राहणार आहे.

एमपीएससी, युपीएससी, एसएससी, रेल्वे बँक आदी विषयांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. स्व.अध्ययन, यशस्वी होण्यासाठी विविध कौशल्ये सांगितले जाणार आहेत शिबीरात विद्यार्थीनीसाठी वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. बी.ए., बी.कॉम, बी.एस्सीमध्ये शिक्षण घेणारे अथवा हे शिक्षण पूर्ण करणारे विद्यार्थी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी.करीत असलेले अथवा पूर्ण केलेले, इतर शाखेचे विद्यार्थी या कॅम्पमध्ये सहभागी होवू शकतील. दोन फोटो, आधारकार्ड, राशनकार्ड सोबत आणणे बंधनकारक आहे.

परभणी जिल्ह्यातील कोणत्याही महाविद्यालयातून शिक्षण घेत असलेले आजी-माजी विद्यार्थी, विद्यार्थीनी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील विद्यार्थी या कॅम्पमध्ये सहभागी होवू शकतील. परभणी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाच्या अधिकाधिक गरजू विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन आणि निवड कॅम्पमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ.रामानंद व्यवहारे, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर यांनी केले आहे.

दिनांक : १ जानेवारी २०१८

झुंजार नेता

# विद्यार्थ्यांनी कष्टाने संशोधन प्रकल्प तयार करावेत:डॉ.शिंदे




परभणी(प्रतिनिधी)दि.३१:- विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, कष्टाने पुढे येऊन संशोधन प्रकल्प तयार करावेत. अविष्कार संशोधन महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधनाला समाजाभिमुख बनविण्याचे कार्य विद्यापीठ करीत असल्याचे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ.गणेश शिंदे यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात 'अविष्कार' संशोधन महोत्सवाच्या समारोपप्रसंगी डॉ.शिंदे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कुलसचिव डॉ.रमजान मुलानी, उपकुलसचिव महेश त्रिभुवन, प्राचार्य डॉ.वामनराव जाधव यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, समन्वयक डॉ.ए.ए.मुळे, डॉ.के.डी. बोगले, डॉ.नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफिसे यांची उपस्थिती होती. संशोधन महोत्सवात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन डॉ.शिंदे म्हणाले की, संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून समाजाल दिशा दाखविण्याचे काम तरुण विद्यार्थी करू शकतात. म्हणून चांगले संशोधन प्रकल्प विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि कष्टाने तयार केले पाहिजेत. यावेळी कुलसचिव डॉ.रमजान मुलानी यांचेही भाषण झाले. संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी आपली अविष्कार संशोधन महोत्सवाच्या आयोजनाची भूमिका मांडून सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी डॉ.मुळे, डॉ.खैरनार, प्रा.रणखांब, शुभांगी पाटील, मनोज जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महोत्सवातील पारितोषीक विजेत्या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.चिंदुरवार, प्राचार्य डॉ.सोनवणे, प्राचार्य डॉ.घुले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.रामप्रसाद देशमुख यांनी केले तर आभार प्रा.डॉ.नाना शितोळे यांनी मानले.

दैनिक समर्थ दिलासा

सोमवार, दि. १ जानेवारी २०१८ पान नं. ३

# स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी आज मार्गदर्शन शिबीर

**परभणी, दि.३१ (प्रतिनिधी):** एमपीएससी, युपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करणार्या राज्यातील होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी ठाणे-मुंबई येथे विशेष निवासी मार्गदर्शन शिबिर होणार आहे. या शिबिरात विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी एक जानेवारी २०१८ रोजी शिवाजी महाविद्यालयात कम्प होणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अस्मिता फाऊंडेशनतर्फे मागील पाच वर्षापासुन स्पर्धा परीक्षा निवासी मार्गदर्शन शिबिर घेतले जाते. यावर्षीचे शिबिर सहा ते १२ जानेवारी दरम्यान गोवोली येथे होणार आहे. या शिबिरात विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी शिवाजी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातंर्गत कम्पचे आयोजन करण्यात आले आहेत. एक जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शशीकांत बोरसे, रविंद्र अग्रवार(मुंबई) हे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव आहेत. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ.रामानंद व्यवहारे, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कम्पमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सहा ते १२ जानेवारी दरम्यान होणार्या गोवोली, कल्याण-ठाणे-मुंबईच्या विशेष मार्गदर्शन शिबिरात सहभागी होता येईल. या शिबिरात सात दिवसाची राहण्याची, जेवणाची संपुर्ण व्यवस्था मोफत आहे. सात दिवस विविध अधिकारी, तज्ञांचे मार्गदर्शन शिबिरात होणार आहे. बी.ए., बी.काम, बी.एस्सी मध्ये शिक्षण घेणारे अथवा हे शिक्षणपुर्ण करणारे विद्यार्थी एम.ए., एम.काम, एम.एस्सी करीत असलेले अथवा पुर्ण केलेले इतर शाखेचे विद्यार्थी या कम्पमध्ये सहभागी होऊ शकतील. दोन फोटो, आधारकार्ड, राशनकार्ड सोबत आणणे बंधनकारक आहे.

सोमवार दि. १ जानेवारी २०१८ २
epaper.deshonnati.com
देशोन्नती

# विद्यार्थ्यांनो संशोधनाला समाजाभिमुख बनवा - डॉ. शिंदे

शहर प्रतिनिधी / ३१ डिसेंबर

**परभणी :** विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, कष्टाने पुढे येवून संशोधन प्रकल्प तयार करावेत. आविष्कार संशोधन महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधनाला समाजाभिमुख बनविण्याचे काम विद्यापिठ करीत असल्याचे प्रतिपादन स्वारातिम विद्यापिठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. गणेश शिंदे यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात आविष्कार संशोधन महोत्सवाच्या समारोप प्रसंगी डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, उपकुलसचिव महेश त्रिभुवन, प्राचार्य डॉ. वामनराव जाधव प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. ए. ए. मुळे, डॉ. के. डी. बोगले, डॉ. नाना शितोळे, डॉ. तुकाराम फिसफीसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना शिंदे म्हणाले की, संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून समाजाला दिशा दाखविण्याचे काम तरुण विद्यार्थी करु शकतात. म्हणून चांगले संशोधन प्रकल्प विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि कष्टाने तयार केले पाहिजेत. ज्यामधून समाजाला अधिकाधिक फायदा होवू शकेल.

प्राचार्य डॉ. जाधव यांनी आविष्कार संशोधन महोत्सवाच्या आयोजनाची भुमिका स्पष्ट केली. या प्रसंगी डॉ. मुळे, डॉ. खैरनार, प्रा. रणखांब, शुभांगी पाटील, मनोज जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. महोत्सवातील पारितोषीक विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. चिंदुरवार, प्राचार्य डॉ. सोनवणे, प्राचार्य डॉ. घुले यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. शितोळे यांनी मानले.

परभणी
६ | मंगळवार, दि. २ जानेवारी २०१८

# 'विद्यार्थ्यांनी कष्टाने संशोधन प्रकल्प तयार करावेत'

परभणी, दि. १ (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, कष्टाने पुढे येऊन संशोधन प्रकल्प तयार करावेत. आविष्कार संशोधन महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधनाला समाजाभिमुख बनविण्याचे कार्य विद्यापीठ करीत आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. गणेश शिंदे यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, उपकुल सचिव महेश त्रिभुवन, प्राचार्य डॉ. वामन जाधव उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, समन्वयक डॉ. ए.ए. मुळे, डॉ. के.डी. बोगले, डॉ. नाना शितोळे, डॉ.तुकाराम फिसफिसे यांची उपस्थिती होती. डॉ. गणेश शिंदे म्हणाले, संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून समाजाला दिशा दाखविण्याचे काम तरुण विद्यार्थी करू शकतात. म्हणून चांगले संशोधन प्रकल्प विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि कष्टाने तयार केले पाहिजेत ज्यामधून समाजाला अधिकाधिक फायदा होऊ शकेल. विद्यापीठाने आविष्कार संशोधन महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक बनण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. याचा फायदा घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

दैनिक समर्थ दिलासा
शनिवार, दि. ६ जानेवारी २०१८ पान नं. ४

# विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षांची तयारी करावी: जाधव

परभणी, दि.५(प्रतिनिधी): विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांची तयारी महाविद्यालयीन शिक्षणासोबतच करावी असे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित शिबिर निवड कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.जाधव बोलत होते. आस्मिता फाऊंडेशनचे शशीकांत बोरसे, डॉ. रामानंद व्यवहारे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.जाधव म्हणाले, महाराष्ट्रासह देशभरात तरूणांना दरवर्षी विविध नोकऱ्यांची संधी उपलब्ध असते. युपीएससी, एमपीएससी मार्फत जागा भरल्या जातात. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षांची तयारी केली पाहिजे. केवळ पदव्या मिळविण्यासाठी शिक्षण घेऊ नका. तर ध्येय समोर ठेवा. समस्यांना घाबरू नका. समस्या या यशाजवळ नेत असतात. तीन, चार वर्षे स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी घालवा.तुमचे आयुष्य बदलेल असे म्हणाले. यावेळी शशिकांत बोरसे म्हणाले, आस्मिता फाऊंडेशन दरवर्षी गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कॅम्प आयोजित करीत असते. यामध्ये सहभागी झालेले अनेक विद्यार्थी मोठमोठ्या पदांपर्यंत पोहोचले आहेत. गरजू, होतकरू आणि कष्टाळू विद्यार्थ्यांची निवड करून आम्ही त्यांना दिशा देण्याचे काम करतो. यामध्ये अनेक अधिकारी, प्राध्यापकांचा सिंहाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी समस्यांना घाबरू नये.करिअर घडवण्यासाठी संघर्ष करावा. त्यामधूनच आत्मविश्वास येतो आणि यश मिळते. युपीएसी, एमपीएससी मार्गदर्शन निवासी कॅम्पसाठी परभणी जिल्ह्यातील ४० विद्यार्थ्यांची या कार्यक्रमामध्ये निवड करण्यात आली. निवडलेल्या विद्यार्थ्यांना कल्याण ठाणे येथे सात दिवस मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षां मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ.रामानंद व्यवहारे यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचलन विजय बोराडे तर भरत लाड यांनी आभार मानले.

सकाळ
नांदेड, सोमवार
८ जानेवारी २०१८
४
परभणी



परभणीः श्री शिवाजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त व्याखान कार्यक्रमात जया जाधव यांनी मार्गदर्शन केले.

## 'शिवाजी'त सावित्रीबाईंना अभिवादन

परभणी, ता. ७ : श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त मुख्याध्यापिका जया जाधव यांचे व्याख्यान पार पडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून महापौर मीना वरपूडकर, दीपा जामकर, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर यांची उपस्थिती होती. डॉ. श्रीदेवी कडगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, तर प्रा. मंजिरी भाटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. वृषाली फुके यांनी आभार मानले. या वेळी प्रा. डॉ. एस. जी. पिलाई, डॉ. सय्यद सबिहा, प्रा. सविता कोकाटे, प्रा. माया रोडगे, प्रा. अंजली खेडेकर, प्रा. एस. एन. पांडे, अनिता रानडे, विशाखा पंचागे, सत्यशीला लिमकर, डॉ. जयंत बोबडे, प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. राऊत उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करावी : प्राचार्य जाधव

परभणी, ता. ७ (बातमीदार) : महाविद्यालयीन शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांची देखील तयारी करावी, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित शिबिर निवड कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन करताना डॉ. जाधव बोलत होते. अस्मिता फाउंडेशनचे शशिकांत बोरसे, केंद्राचे समन्वयक डॉ. रामानंद व्यवहारे यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. पुढे डॉ. जाधव म्हणाले, की यूपीएससी, एमपीएससीमार्फत जागा भरल्या जातात. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांनी या परीक्षांचीदेखील तयारी सुरू केली पाहिजे.

या वेळी श्री. बोरसे म्हणाले, की फाउंडेशन दरवर्षी गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कॅम्प आयोजित करते. यामध्ये सहभागी झालेले अनेक विद्यार्थी मोठ्या पदांवर पोचले आहेत. डॉ. व्यवहारे यांनी प्रास्ताविक केले. विजय बोराडे यांनी सूत्रसंचालन केले तर भरत लाड यांनी आभार मानले.

पुण्य नगरी
बुधवार, १० जानेवारी २०१८ । परभणी- हिंगोली


## चारूदत्त बेळे यांना पीएच.डी.



परभणी - श्री.शिवाजी महाविद्यालयातील गणित विषयाचे सहाय्यक प्राध्यापक चारूदत्त बेळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएच. डी. प्रदान केली आहे. चारूदत्त बेळे यांनी 'जनरलायझेशन ऑफ मॅपींग अॅन्ड फिक्स पॉईंटस थेरम्स इन मॅट्रीक स्पेसेस अॅन्ड डी मॅट्रीक स्पेसेस' या विषयावरील शोध प्रबंध विद्यापीठाकडे सादर केला होता. या संशोधनासाठी त्यांना ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर येथील डॉ. उत्तम डोल्हारे यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे स्वागत केले आहे.

सकाळ
नांदेड, बुधवार
१० जानेवारी २०१८
४
परभणी

## प्रा. चारूदत्ता बेळे यांना पीएच.डी.



प्रा. चारूदत्ता बेळे

परभणी, ता. ९ : शहरातील श्री. शिवाजी महाविद्यालयातील प्रा. चारूदत्ता बेळे यांना पीएच. डी. प्रदान करण्यात आली. प्रा. बेळे यांचा 'जनरलायझेशन ऑफ मॅपिंग अँड फिक्स पॉईंट्स थेरम्स इन मॅट्रिक स्पेसेस् अँड डी- मॅट्रिक स्पेसेस्' हा विषय आहे. त्यांनी डॉ. उत्तम डोल्हारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडला शोधप्रबंध सादर केला होता. या यशाबद्दल स्थानिक नियामक मंडळप्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस. एन. केशट्टी, डॉ. विजया नांदापूरकर यांनी सत्कार केला आहे.

बुधवार, दि. १० जानेवारी २०१८ पान नं.

दैनिक समर्थ **दिलासा**

## प्रा.चारूदत्त बेळे यांना पीएचडी प्रदान



परभणी, दि.९(प्रतिनिधी): शिवाजी महाविद्यालयातील गणित विषयाचे सहाय्यक प्रा.चारूदत्त बेळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएचडी प्रदान केली आहे. प्रा.बेळे यांनी जनरलायझेशन ऑफ मॅपींग अॅन्ड फिक्स पॉईन्टस् थेरम्स् इन मॅट्रीक स्पेसेस् अॅन्ड डी-मॅन्ट्रीक स्पेसेस् या विषयावरील शोध प्रबंध विद्यापीठाकडे सादर केला होता. या संशोधनासाठी त्यांना ज्ञानोपासक महाविद्यालय जिंतुरचे डॉ.उत्तम डोल्हारे यांनी मार्गदर्शन केले. गणित विषयामध्ये आणि विज्ञान तंत्रज्ञान विभागातील या संशोधन कार्याबद्दल प्रा.बेळे यांचे शिवाजी महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळ प्रमुख डॉ. हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस.एन.केशेट्टी, उपप्राचार्य डॉ.विजया नांदापूरकर व प्राध्यापकांनी अभिनंदन केले आहे.

**लोकमत** औरंगाबाद, बुधवार, दि. १० जानेवारी २०१८ **२**

## बेळे यांना पीएच. डी.



परभणी- येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील गणित विषयाचे प्रा. चारुदत्त बेळे यांनी सादर केलेल्या शोधप्रबंधास स्वारातीम विद्यापीठाने नुकतीच पीएच. डी. प्रदान केली आहे. प्रा. चारुदत्त बेळे यांनी 'जनरलायझेशन ऑफ मॅपिंग अँड फिक्स पॉईंट थेरम्स इन मॅट्रीक स्पेशेस अँड डी-मॅट्रीक स्पेशेस' या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ. उत्तम डोल्हारे यांचे मार्गदर्शन लाभले.

# गोदातीर

दि.१२ जानेवारी २०१८

## आज परभणीची स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धा

**परभणी-** जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागच्या वतीने परभणी तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेचे आयोजन आज शुक्रवारी (दि.१२) श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे करण्यात आले असून सदर स्पर्धेमध्ये तालुक्यातील जास्तीत जास्त युवकांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे ठीक ११ वाजता वक्तृत्व स्पर्धेला सुरुवात होणार असून सकाळी १०वाजल्यापासून इच्छुक स्पर्धकांची नावनोंदणी करण्यात येणार आहे. तालुकास्तरीय स्पर्धेचे कनिष्ट आणि वरिष्ठ गटासाठीचे प्रथम, द्वितीय,त्रितिय क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे रु.५०००, रु.३०००, रु.२००० असे असून विजंयी स्पर्धकांना पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

तालुकास्तरावरील विद्यार्थ्यांसाठी कनिष्ट गटाचे विषय आहेत.

गाव माझा मी गावाचा-विचार संपूर्ण स्वच्छतेचा, गाऊ स्वच्छतेचे गाणे-तुकडोजींचे हेच सांगणे, शुद्ध आणि शाश्वत जल-जाणेल आरोग्याचे मोल, बदलू मनामनाला-साद घालू महाराष्ट्राला, माझी ओळख उद्याची - स्वच्छ सुंदर महाराष्ट्राची

तालुकास्तरावरील विद्यार्थ्यांसाठी वरिष्ट गटाचे विषय आहेत.

शिकवण आम्हा संतांची-हि भूमी स्वच्छ करण्याची, स्वच्छतेचे गीत गाऊ या-ग्रामगीतेचे बोल बोलूया, घरा घरातून विचार येऊ दे-महाराष्ट्राला स्वच्छ होऊ दे, माझी स्वच्छता-माझे कर्तव्य, शुद्ध पाणी - आरोग्याची हमी,

तेव्हा अधिक माहितीसाठी परभणी पंचायत समिती मधील कक्ष प्रमुख श्रीनिवास देशमुख ९४०३३९८४२९ तसेच स्वच्छ भारत मिशन कार्यालयातील संगणक तज्ज्ञ श्री राजेंद्र कोचुरे ९४२०२८२३५८ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रहार ढोकणे,श्री एम व्ही करडखेलकर, श्री स्वप्नील पवार, श्री राठोड,यांनी केले आहे.

देशोन्नती शनिवार, दि. १३ जानेवारी २०१८

# कला शाखेतून घडतात भावी प्रशासकीय अधिकारी

## तहसिलदार कडवकर यांचे प्रतिपादन

**शहर प्रतिनिधी / १२ जानेवारी**

**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयात १२ वी कला शाखेच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजीत करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव हे होते. तर प्रमुख मार्गदर्शन म्हणून तहसिलदार विद्याचरण कडवकर हे होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना कडवकर म्हणाले की, कला शाखेतून भावी प्रशासकीय अधिकारी घडत असतात कला शाखेचा अभ्यासक्रम हा सर्वप्रकारच्या स्पर्धा परिक्षांसाठी उपयुक्त असतो.

प्रमुख उपस्थिती मध्ये उपविभागीय अधिकारी सुचिता शिंदे या होत्या त्यांनी स्पर्धा रिक्षेत मुलीं समोरील आव्हाने या विषयावर र्गदर्शन केले. स्पर्धा परिक्षेत मुलींना तयारी करतांना पालकांची साथ असने गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव हे होते तर मंचावर उपप्राचार्य प्रा.अप्पाराव डहाळे, पर्यवेक्षक बी.व्ही.अंधळे, प्रा.शिवाजीराव बाजड, प्रा.बळीराम चव्हाण, प्रा.किर्तीजय गोरे, प्रा.आर.टी.देशमुख अमृत पतंगे, प्रा.खिल्लारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्तावीक प्रा.अरूणकुमार लेमाडे यांनी केले. तर सुत्रसंचालन रामेश्वर वाघ व कोमल भाग्यवंत यांनी केले. आभार सारीका पांचाळ यांनी मानले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.विनोद शिंगणे, प्रा.विलास कुन्हाडकर, प्रा.नितीन चौधरी, प्रा.नारायण राऊत, प्रा.व्ही.आर.वायाळ, प्रा.ए.व्ही. उबाळे, प्रा.विनोद चव्हाण, प्रा.आर.के. देशमुख, प्रा.संदिप सोळंके, प्रा.अमोल



**परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयात १ २ वी कला शाखेतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उदघाटन प्रसंगी तहसिलदार कडवकर, प्राचार्य जाधव, उप प्राचार्य डहाळे, प्रा. बाजड व इतर**

भराड, प्रा.रोडगे, प्रा.पांडे, प्रा.सोळंके, प्रा.आर.डी.मस्के, प्रा.कनसे, प्रा.शि.जी. लाठकर, प्रा.ए.बी. शिंदे, प्रा.शैलेश पखाले, प्रा. हेमंत जाधव यांनी प्रयत्न केले.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि. १४ जानेवारी २०१८ ४



परभणी येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी दीपप्रज्ज्वलन करताना गटविकास अधिकारी एम.व्ही. करडखेलकर. समवेत शिवाजीराव बेले, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, कादरी, पं.स. सदस्य दगडोबा मोरे आदी.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि.१४ जानेवारी २०१८

## विद्यार्थ्यांना निरोप

परभणी-येथील शिवाजी महाविद्यालयातील बारावी कला शाखेच्या विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी सुचिता शिंदे, तहसीलदार विद्याचरण कडवकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, यांची प्रमुख उपस्थिती होती.

परभणी
सकाळ
नांदेड, सोमवार
१५ जानेवारी २०१८
३



परभणीः श्री शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना मान्यवर.

# आजच्या युवापिढीत सशक्त राष्ट्र उभारण्याची ताकत

## राजश्री पाटील यांचे प्रतिपादन : परभणीत व्याख्यान

**परभणी, ता. १४ (बातमीदार)**: आज देश एक संक्रमण अवस्थेतून जात असताना देशाची तरुणपिढी काही प्रमाणात भरकटल्यासारखी वाटत आहे. या तरुणाईला दिशा दाखविण्यासाठी प्रत्येक आईने जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा आणि शिक्षकांनी विवेकानंदाचा विज्ञानवादी दृष्टिकोन आजच्या तरुणांमध्ये रुजवावा तरच युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती बनेल. आजच्या युवापिढीत एक सशक्त राष्ट्र उभारण्याची ताकत असल्याचे प्रतिपादन राजश्री हेमंत पाटील यांनी केले.

येथील शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्या वतीने शनिवारी (ता. १३) आयोजित व्याख्यानमालेत पाटील बोलत होत्या. त्या म्हणाल्या, व्यसनाधिनतेच्या आणि अंधश्रद्धेच्या विळख्यात घुटमळणाऱ्या भारतीय समाजाला विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन असणाऱ्या युवा पिढीची अवश्यकता आहे. युवकांचा दृष्टिकोन सकारात्मक बनविण्यासाठी पालकांनीदेखील आपली भूमिका चोख बजावली पाहीजे. सौ. पाटली यांनी आपल्या व्याख्यानातून राजकारण, समाजकारण, शिक्षण, अर्थकारण आदी विषयांवर भाष्य करीत कधी श्रोत्यांना खळखळून हसवले तर कधी अंतर्मुख व्हायला भाग पाडले. या वेळी मंचावर हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, जिल्हा परिषद सदस्य अजय चौधरी, विठ्ठल भुसारे, डॉ. जयप्रकाश गायकवाड, रामप्रसाद देशमुख आदींची उपस्थिती होती. प्रा. सतीश मुंढे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अंजली खेडेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अरविंद सदर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पंडित निर्मळ यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी कल्याण देशमुख, लक्ष्मण गारकर, नारायण चौधरी, अजित मगर, संजय गजमल, सचिन देशमुख, डॉ. रोहिदास नितोंडे, रितेश जैन, नरहरी मुटकुळे आदींनी पुढाकार घेतला.

लोकमत औरंगाबाद, सोमवार, दि.१५ जानेवारी २०१८ ४

### व्याख्यान : राजश्री पाटील यांचे प्रतिपादन

# तर देशाची युवाशक्ती राष्ट्रशक्ती बनेल

लोकमत न्यूज नेटवर्क



व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी दीपप्रज्वलन करताना राजश्री हेमंत पाटील. समवेत प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, अजय चौधरी, विठ्ठल भुसारे, डॉ.जयप्रकाश गायकवाड, रामप्रसाद देशमुख.

**परभणी** : आज देश एका संक्रमण अवस्थेतून जात असताना देशाची तरुण पिढी काही प्रमाणात भरकटल्यासारखी वाटत आहे. या तरुणाईला दिशा दाखविण्यासाठी प्रत्येक मातेने राष्ट्रमाता जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा आणि शिक्षकांनी स्वामी विवेकानंदांचा विज्ञानवादी दृष्टीकोन युवकांमध्ये रुजवावा तरच युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती बनेल, असे प्रतिपादन राजश्री हेमंत पाटील यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. राजश्री पाटील म्हणाल्या, व्यसनाधिनतेच्या आणि अंधश्रद्धेच्या विळख्यात घुटमळणाऱ्या भारतीय समाजाला विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन असणाऱ्या युवापिढीची आवश्यकता आहे. युवकांचा दृष्टीकोन सकारात्मक बनविण्यासाठी पालकांनी चोख भूमिका बजावली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. पाटील यांनी आपल्या व्याख्यानातून राजकारण, समाजकारण, शिक्षण, अर्थकारण आदी विषयांवर भाष्य करीत कधी श्रोत्यांना खळखळून हसविले तर कधी अंतर्मुख व्हावयला भाग पाडले. यावेळी मंचावर हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, जि.प. गटनेते अजय चौधरी, विठ्ठल भुसारे, डॉ.जयप्रकाश गायकवाड, रामप्रसाद देशमुख आदींची उपस्थिती होती. प्रा.सतीश मुंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.अंजली खेडेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. अरविंद सदर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.पंडित निर्मळ यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे कल्याण देशमुख, लक्ष्मण गारकर, नारायण चौधरी, अजीत मगर, संजय गजमल, सचिन देशमुख, डॉ.रोहिदास नितोंडे, रितेश जैन, नरहरी मुटकुळे आदींनी प्रयत्न केले.

दि.१४ जानेवारी २०१८

गोदातीर

# कला शाखेतून घडतात भावी प्रशासकीय अधिकारी-कडवकर



**परभणी/प्रतिनिधी**

कला शाखेतून भावी प्रशासकीय अधिकारी घडत असतात. कला शाखेचा अभ्यासक्रम हा सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांसाठी परीपुर्ण व उपयुक्त असतो असे प्रतिपादन तहसिलदार विद्याचरण कडवकर यांनी केले.

या कार्यक्रमास परभणीच्या उपविभागीय अधिकारी सुचिता शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी स्पर्धा परीक्षेत मुलींसमोरील आव्हाने या विषयावर मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षेत मुलींना तयारी करताना पालकांची साथ असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव होते. त्यांनी बारावीच्या विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याकार्यक्रमावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अप्पाराव डहाळे, पर्यवेक्षक बी. व्ही.आंधळे, प्रा.शिवाजीराव बाजड, प्रा.बळीराम चव्हाण, प्रा. क्रितीजय गोरे,प्रा.आर. टी. देशमुख, एच. एस. सी. व्ही. सी. विभाग प्रमुख अमृत पतंगे, प्रा. खिल्लारे पी.वाय. मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अरूणकुमार लेमाडे यांनी केले. कार्यक्रमाला इयत्ता अकरावी व बारावी कला शाखेचे ६०० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामेश्वर वाघ व कोमल भाग्यवंत या विद्यार्थ्यांनी केले. आभार सारीका पांचाळ या विद्यार्थीनीने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.विनोद शिंगणे, प्रा.विलास कुऱ्हाडकर, प्रा.नितीन चौधरी, प्रा.नारायण राऊत, प्रा. व्ही. आर. वायाळ, प्रा. ए. व्ही. उबाळे, प्रा. विनोद चव्हाण, प्रा. आर. के. देशमुख, प्रा.संदिप सोळंके, प्रा. अमोल भराडे, प्रा. रोडगे, प्रा. पांडे, प्रा.सोळंके, प्रा. आर. डी. मस्के, प्रा.कणसे एन. यु.,प्रा.सी.जी.लाठकर, प्रा. ए. बी.शिंदे, प्रा. शैलेंद्र पखाले, प्रा. हेमंत जाधव तसचे अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

लोकपत्र



# भविष्याचा वेध घेणारे क्षेत्र युवकांनी निवडावे - राजश्री पाटील

**परभणी/प्रतिनिधी**

युवकांनी स्वतःच्या आयुष्यातील निर्णय स्वतः घेण्यासाठी विकसित व्हावे. त्याचबरोबर भविष्याचा वेध घेणारे क्षेत्र युवकांनी निवडावे.त्या क्षेत्रातील परमोच्च स्थानांवर जाण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे.असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या तथा गोदावरी अर्बनच्या अध्यक्ष राजश्रीताई पाटील यांनी केले.



राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान,परभणी आणि स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, शिवाजी महाविद्यालय,परभणीयांच्यासंयुक्तविद्यमाने आयोजित नवा साज नवा आवाजया कार्यक्रमात जागर युवाशक्तीचायाविषयावर युवकांशी सवांद साधतांना त्या बोलत होत्या. पुढे बोलताना राजश्री पाटील म्हणाल्या युवा शब्दाला उलट केल्यास वायू होतो.ज्याला आयुष्यात काही करायचे स्फुरण आहे तो युवक,जगण्याची कुठलही शास्वती नसतांना आशावाद मनी बाळगतो तो युवक आहे.आजच्या युवकांनी सामाजिक,राजकीय,शैक्षणिक, उदयोग या सर्वच क्षेत्रात पुढं यावे.स्वतःचा सर्वांगीण विकास कसा करता येईल त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत.युवकांनी नाशा जरूर करावी, पणं चागल्या विचारांची, पुस्तकांची, वाचनाची, आदर्श व्यक्तिमत्वाची नशा असली पाहिजे, असे देखिल राजश्री पाटील यांनी युवकांना सांगितले. युवकांना आर्थिक स्त्रोत निर्माण करता आली पाहिजे.चांगल्या काम करून सत्याच्या मार्गावर जाऊन आयुंष्यात पैसे मिळतात.ज्याच्याकडे ज्ञान आहे.त्याच्याकडे जग आदराने बघत असते.त्यासाठी ज्ञानी बनावं तुमच्या विचारांचा,कामाचा सुगधं समाजाला तुमच्या पर्यंत घेऊन येईल.देशासाठी,समाजासाठी सामाजिक बांधिलकीची कामात आग्रेसर होऊन कामे करणारा तो खरा युवक आहे. असेही यावेळी सांगितले. युवकांनी भाषेवर संस्कार करावेत. माझ्या संवादावर लोकांचे लक्ष खेचून घेता आले पाहिजे.विचार संपन्न युवक ही काळाची गरज आहे. आपल्यातील संवाद हरवत चालला आहे.आजची पिढी सोशल मीडियावर असते ते वाईट नाहीं पण त्यात काय घेतलं पाहिजे हे मात्र आपल्याला कळाल पाहिजे.यावर देखील राजश्री पाटील यांनी युवकांचे लक्ष वेधले. यावेळी हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, कल्याण देशमुख, डॉ.जयप्रकाश गायकवाड विजय तिडके, रामप्रसाद देशमुख, रोहिदास नितोंडे, विजयमोरे, डॉ.पंडितनिर्मळ, लक्ष्मण गारकर, नरहरी मुटकुळे, नितीन लोहाट, प्रा. विठ्ठलभुसारे, प्रा.एन.आर.देशमुख, नारायण चौधरी, सचिन देशमुख, त्र्यंबक वडसकर, अरविंद सगर, अजित मगर, अंजली मगरसतिश मुंदे, रितेश जैन, संजय गजमल यांच्यासह शहरातील युवक,युवती,महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पुढारी | सोमवार, १५ जानेवारी २०१८



**परभणी :** शिवाजी महाविद्यालयात आयोजित व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना राजश्री हेमंत पाटील. याप्रसंगी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, जि.प. गटनेते अजय चौधरी, डॉ. जयप्रकाश गायकवाड, प्रा. रामप्रसाद देशमुख.

# नागरिकांत राष्ट्रभक्तीबरोबर प्रखर मातृभक्ती हवी : राजश्री पाटील

**परभणी : प्रतिनिधी**

आज नागरिक बेफिकीर बनत चालले असून, राष्ट्रभक्तीबरोबरच त्यांच्यात प्रखर मातृभक्ती असायला हवी. तसेच तरुण पिढी ही थोडी भरकटल्यासारखी वाटते. त्यांना दिशा दाखविण्यासाठी प्रत्येक आईने जिजाऊंचा आदर्श समोर ठेवावा. शिक्षकांनी विवेकानंदाचा विज्ञानवादी दृष्टिकोन तरुणांमध्ये रुजवावा तरच युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती बनेल. त्यांच्यात एक सशक्त राष्ट्र उभारण्याची ताकद आहे, असे प्रतिपादन राजश्री पाटील यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठाण व स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. यावेळी मंचावर हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, जि.प.गटनेते अजय चौधरी, विठ्ठल भुसारे, डॉ. जयप्रकाश गायकवाड, रामप्रसाद देशमुख यांची उपस्थिती होती. व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना राजश्री पाटील यांनी राजकारण, समाजकारण, शिक्षण, अर्थकारण आदी विषयांवर श्रोत्यांना खळखळून हसविले. तर कधी अंर्तमुख व्हायला भाग पाडले. सूत्रसंचालन अरविंद सदर यांनी तर आभार डॉ. पंडित निर्मळ यांनी मानले. यशस्वीतेसाठी कल्याण देशमुख, लक्ष्मण गारकर, नारायण चौधरी, अजित मगर, संजय गजमल, सचिन देशमुख, डॉ. रविदास नितोंडे, रितेश जैन, नरहरी मुटकूळे, त्र्यंबक वडसकर यांनी परिश्रम घेतले.

रविवार, १४ जानेवारी २०१८ । परभणी- हिंगो

पुण्य नगरी

# कला शाखेतून घडतात भावी प्रशासकीय अधिकारी – कडवकर

परभणी / प्रतिनिधी

कला शाखेचा अभ्यासक्रम हा सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांसाठी परिपूर्ण व उपयुक्त असतो. त्यामुळे कला शाखेतून भावी प्रशासकीय अधिकारी घडतात, असे प्रतिपादन तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात बारावी कला शाखेच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी कडवकर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी सुचिता शिंदे यांची उपस्थिती होती. यावेळी उपप्राचार्य प्रा.आप्पाराव डहाळे, बी.व्ही.आंधळे, प्रा.शिवाजी बाजड, प्रा.बळीराम चव्हाण, प्रा.किर्तीजय गोरे, प्रा.आर.टी.देशमुख, अमृत पतंगे, प्रा.पी.वाय.खिल्लारे यांची उपस्थिती होती. सुचिता शिंदे म्हणाल्या, स्पर्धा परीक्षेत मुलींना तयारी करताना पालकांची साथ असणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अरुणकुमार लेमाडे यांनी केले.

सूत्रसंचालन रामेश्वर वाघ व कोमल भाग्यवंत यांनी केले. सारीका पांचाळ हिने आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.विनोद शिंगणे, प्रा. विलास कुऱ्हाडकर, प्रा.नितीन चौधरी, प्रा.नारायण राऊत, प्रा.व्ही.आर. वायाळ, प्रा.ए.व्ही.उबाळे, प्रा.विनोद चव्हाण, प्रा.आर.के देशमुख, प्रा.संदीप सोळंके, प्रा.अमोल भराड, प्रा.रोडगे, प्रा.पांडे, प्रा.सोळंके, प्रा.आर.डी. मस्के, प्रा.कणसे, प्रा.जी.जी.लाठकर, प्रा.ए.बी.शिंदे, प्रा.शैलेंद्र पखाले, प्रा.हेमंत जाधव यांनी पुढाकार घेतला.

पुण्य नगरी
सोमवार, १५ जानेवारी २०१८ | परभणी- हिंगोली

# युवापिढीत सशक्त राष्ट्र उभारण्याची ताकद – राजश्री पाटील

परभणी / प्रतिनिधी

आज देश एका संक्रमण अवस्थेतून जात असताना देशाची तरुण पिढी थोडीशी भरकटल्यासारखी वाटत आहे. या तरुणाईला दिशा दाखविण्यासाठी प्रत्येक आईने जिजाऊ यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा आणि शिक्षकांनी विवेकानंद यांचा विज्ञानवादी दृष्टीकोन आजच्या तरुणांमध्ये रुजविल्यास युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती बनेल. देशाला महासत्ता बनविण्याची धमक फक्त तरुणांमध्ये असून आजच्या युवापिढीत एक सशक्त राष्ट्र उभारण्याची ताकद आहे, असे प्रतिपादन राजश्री हेमंत पाटील यांनी व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात प्राचार्य शिवाजी भोसले प्रतिष्ठाण व स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. व्यासपीठावर हेमंत जामकर,



प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, जि.प.गटनेते अजय चौधरी, विठ्ठल भुसारे, डॉ.जयप्रकाश गायकवाड, रामप्रसाद देशमुख आदींची उपस्थिती होती.

राजश्री पाटील म्हणाल्या, व्यसनाधीनतेच्या आणि अंधश्रध्देच्या विळख्यात घुटमळणाऱ्या भारतीय समाजाला विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन असणाऱ्या युवापिढीची आवश्यकता आहे. युवकांचा दृष्टीकोन सकारात्मक बनविण्यासाठी पालकांनी देखील आपली भूमिका चोख बजावली पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले. प्रास्ताविक प्रा.सतीश मुंडे यांनी केले. प्रा.अंजली खेडेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अरविंद सदर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.पंडित निर्वळ यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कल्याण देशमुख, लक्ष्मण गारकर, नारायण चौधरी, अजित मगर, संजय गजमल, सचिन देशमुख, डॉ. रोहिदास नितोंडे, रितेश जैन, नरहरी मुटकुळे, त्र्यंबक वडसकर यांनी पुढाकार घेतला.

लोकमत समाचार
औरंगाबाद ● सोमवार 15 जनवरी 2018 10
परभणी-हिंगोली

# युवाओं में सशक्त राष्ट्र निर्माण करने की शक्ति : पाटील

## शिवाजी महाविद्यालय में व्याख्यानमाला का आयोजन

परभणी | 14 जनवरी | लोस सेवा

देश आज संक्रमण काल से गुजर रहा है. युवा पीढ़ी में कुछ भटकाव नजर आ रहा है. युवाओं को दिशा दिखाने के लिए राष्ट्रमाता जिजाऊ एवं स्वामी विवेकानंद का आदर्श सामने रखने की जरुरत है. यह बात राजश्री हेमंत पाटील ने कही.

स्थानीय शिवाजी महाविद्यालय के सभागृह में शनिवार को शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान एवं स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र की ओर से व्याख्यानमाला का आयोजन किया गया. व्याख्यानमाला में संबोधित करते हुए राजश्री पाटील ने कहा कि व्यसन व अंधश्रद्धा की चपेट में भारतीय समाज को विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण बनाने के लिए युवा पीढ़ी की जरुरत है. युवाओं का दृष्टिकोण सकारात्मक बनाने के लिए अभिभावकों को सही भूमिका निभानी होगी. युवाओं को बुराई के रास्ते पर जाने से रोकना होगा.



परभणी में शनिवार को शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान एवं स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र की ओर से आयोजित व्याख्यानमाला का उद्घाटन करती हुईं राजश्री हेमंत पाटील. साथ हैं प्राचार्य डॉ बालासाहब जाधव, अजय चौधरी व अन्य.

कार्यक्रम में हेमंत जामकर, प्राचार्य डॉ बालासाहब जाधव, जिला परिषद के गुट नेता अजय चौधरी, विठ्ठल भुसारे, डॉ जयप्रकाश गायकवाड़, रामप्रसाद देशमुख, सतीश मुंढे, प्रा अंजली खेडेकर, अरविंद सदर, डॉ पंडित निर्मल, कल्याण देशमुख, लक्ष्मण गारकर, नारायण चौधरी, अजीत मगर, संजय गजमल, सचिन देशमुख, डॉ रोहिदास नितोंडे, रीतेश जैन, नरहरी मुटकुले उपस्थित थे.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. १६ जानेवारी २०१८ ३

# 'शिक्षणासोबतच स्पर्धा परिक्षेची तयारी करावी'

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणासोबतच स्पर्धा परिक्षांची तयारी करावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले.

येथील शिवाजी महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. जाधव बोलत होते. यावेळी शशिकांत बोरसे, डॉ.रामानंद व्यवहारे यांची उपस्थिती होती. युपीएससी, एमपीएससी मार्गदर्शन निवासी कॅम्पससाठी परभणी जिल्ह्यातील ४० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवडलेल्या विद्यार्थ्यांना कल्याण येथे सात दिवस मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. केंद्राचे समन्वयक डॉ.रामानंद व्यवहारे यांनी प्रास्ताविक केले. विजय बोराडे यांनी सूत्रसंचालन केले. भरत लाड यांनी आभार मानले.

पुण्य नगरी
मंगळवार, १६ जानेवारी २०१८ । परभणी

# विशेष वार्षिक शिबिर गुरुवारी

परभणी- येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक हिवाळी शिबिर गुरुवारी (दि.१८) दुपारी ३ वाजता इठलापूर येथे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन जि.प.उपाध्यक्षा भावना नखाते यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जि.प.चे उपमुख्यकार्यकारी अधिकारी सी.एम. ढोकणे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, सतीश निरपणे, प्रताप देशमुख, केशवअण्णा दुधाटे, एस.बी. बगल, सरपंच नंदा पुंड, मुख्याध्यापक माधव सोनटक्के, ग्रामसेवक पी.पी. व्यवहारे यांची उपस्थिती राहणार आहे.

# सायबर गुन्हे जनजागृती अभियान कार्यक्रम

परभणी - ट्रान्सफॉर्मींग महाराष्ट्र प्रकल्पांतर्गत येथील जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने बुधवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सायबर गुन्हे विषयक जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून सुमित महाबळेश्वरकर, संदीप गादीया सहभागी होणार आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

दि.१८ जानेवारी २०१८

गोदातीर समाचार

# इठलापूर येथे 'रासेयो' शिबीराचे आज उद्घाटन

**परभणी/प्रतिनिधी**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबीर दि.१८ ते २४ जानेवारी दरम्यान मौजे इठलापूर(दे.) ता.जि.परभणी येथे संपन्न होणार आहे.

या शिबीराचे उद्घाटन आज गुरुवारी (दि.१८) दुपारी ३ वाजता जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा सौ.भावना नखाते याच्या हस्ते होणार आहे. यावेळी परभणी जिल्हा परिषदेचे पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सी.एम.ढोकणे यांच्यासह सहाय्यक उपनिरिक्षक सतीश निरपणे, माजी महापौर प्रताप देशमुख, निमंत्रीत सदस्य ॲड.स्वराजसिंह परिहार, केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य एस.बी.बागल, सरपंच सौ.नंदा पुंड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव भूषविणार आहे.

या शिबीरात सात दिवस हागणदारीमुक्त गाव, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मुलन, पर्यावरण संवर्धन महिला सबलीकरण, कॅशलेस विषयी जनजागृती, स्वच्छ भारत अभियान, जलसाक्षरता आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या शिबीराचा समारोप २४ जानेवारीला माजी मंत्री सुरेशराव वरपुडकर यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.वृषाली फुके, प्रा.विनोद शिंगणे, प्रा.विलास कुन्हाडकर तसेच इठलापूरचे ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत.

देशोन्नती गुरुवार, दि. १८ जानेवारी २०१८

# रासेयो शिबीराचे आयोजन

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षीक शिबीर मौ. इटलापूर येथे होणार आहे. शिबीराचे उद्घाटन गुरुवार १८ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता जि. प. उपाध्यक्षा भावनाताई नखाते यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास सी. एम. ढोकणे, सहाय्यक उपनिरिक्षक सतिश निरपने, माजी महापौर प्रताप देशमुख, ॲड. स्वराजसिंह परिहार, केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य एस. बी. बागल, सरपंच नंदा कुंड, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांची उपस्थिती राहणार आहे.

दैनिक समर्थ
दिलासा
गुरूवार,दि.१८ जानेवारी २०१८ पान नं.४

# रासेयोचे आज विशेष वार्षिक शिबीर

**परभणी, दि.१७(प्रतिनिधी):** येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर दि.१८ ते २४ जानेवारी दरम्यान मौजे इठलापूर येथे संपन्न होणार आहे. या शिबिराचे उद्घाटन दि.१८ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा सौ.भावनाताई नखाते यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी जि.प.पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सी.एम. ढोकणे, सहाय्यक उपनिरीक्षक सतिश निरपणे, माजी महापौर तथा शिवाजी महाविद्यालयाच्या स्था.नि.मंडळाचे सदस्य प्रताप देशमुख, निमंत्रीत सदस्य ॲड. स्वराजसिंह परिहार, केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य एस.बी.बागल, इठलापुरच्या सरपंच सौ.नंदा पुंड आदींची उपस्थिती राहणार आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव राहणार आहेत. शिबिराचा समारोप दि.२४ जानेवारी रोजी माजीमंत्री सुरेश वरपूडकर यांच्या हस्ते होणार आहे. यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.वृषाली फुके, प्रा.विनोद शिंगणे, प्रा.विलास कु-हाडकर आदींनी केले आहे.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. १८ जानेवारी २०१८ ४

## जिल्हा विशेष

# परभणी शहरात सायबर गुन्ह्यांविषयी कार्यशाळेस प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** : जिल्हा पोलीस दलाच्या वतीने १७ जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या सायबर गुन्ह्यांविषयीच्या जनजागृती कार्यशाळेस प्रतिसाद मिळाला. सुमारे २०० युवक -युवतींची यावेळी उपस्थिती होती.

शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. यावेळी आयसीआयसीआय बँकेचे विभागीय व्यवस्थापक सुमीत महाबळेश्वरकर आणि सायबर एक्सपर्ट संदीप गादिया यांनी विद्यार्थी व उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाबळेश्वरकर यांनी बँके संदर्भात होणारे गैरव्यवहार, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, ऑनलाईन ट्रान्झेक्शन यातून होणाऱ्या फसवणुकीची माहिती दिली. तर गादिया यांनी अकाऊंट हॅगिंक, हॅकिंक याबाबत माहिती देत फेसबुक, व्हॉटस्ॲप हाताळताना काय काळजी घ्यावी तसेच या माध्यमातून कोणते गुन्हे होऊ शकतात, याबाबत माहिती दिली. कार्यक्रमास अप्पर पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, प्राचार्य बाळासाहेब जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, अनिल घेरडीकर, पोनि. सोहन माचरे, दहशतवाद विरोधी पथकाचे पंडित रेजीतवाड, पोलीस उपनिरीक्षक विवेक सोनवणे, गोपीनवार, कापुरे, बहात्तरे, भुसारे आदींची उपस्थिती होती. पोलीस निरीक्षक संजय हिबारे यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. सायबर सेलच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजाता शानमे यांनी सूत्रसंचालन केले. सपोनि बी.पी. चोरमले यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बालाजी रेड्डी, गौस पठाण, संतोष व्यवहारे, वर्षा कोल्हेकर, रविकुमार भूमकर, राजेश आगाशे, राम घुले आदींनी प्रयत्न केले.

पुण्य नगरी
गुरुवार, १८ जानेवारी २०१८ । परभणी

# सोशल मिडियातील प्रलोभनातून होवू शकते फसवणूक

## सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती अभियानात मार्गदर्शन



परभणी / प्रतिनिधी

सोशल मिडियावरील भुलथापा, स्किम, प्रलोभने व अन्य आमिषे दाखवून आर्थिक फसवणूक केली जाते. अशा प्रभोलनांना बळी न पडता काहीही न करता कोट्यवधीची लॉटरी लागू शकते काय? असे प्रश्न विचारून आपली फसवणूक टाळण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन पुणे येथील सायबर तज्ञ संदीप गादीया यांनी केले.

ट्रॉन्सफॉर्मींग महाराष्ट्र प्रकल्पांतर्गत येथील पोलीस प्रशासनाच्या वतीने शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात बुधवारी (दि.१७) सायबर गुन्ह्याविषयी जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तज्ञ मार्गदर्शक म्हणून संदीप गादीया बोलत होते. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी अनिल आलुरकर, अप्पर पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, पोलीस निरीक्षक संजय हिबारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.पी.चोरमले, आयसीआयसीआय बँकेचे रिजनल मॅनेजर सुमित महाबळेश्वरकर, सायबर तज्ञ संदीप गादीया, प्राचार्य बाळासाहेब जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, अनील घेरडीकर, पोलीस निरीक्षक सोहन माच्छरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी संदीप गादीया यांनी सायबर हॅकींग, फिशींग, स्फुकींग, आयडेन्टी थेप, फेसबुक, व्हॉटसअॅप, टीवीटर, इंस्ट्राग्राम हाताळतांना कशा प्रकारचे गुन्हे घडतात व घडले आहेत, याची माहिती दिली. या गुन्ह्यांपासून कसे सजग राहावे चुकीच्या पध्दतीने सोशल मिडियाचा वापर केल्यास वापरकर्त्यांबरोबर कधीही सायबर क्राईम होवू शकते असे सांगून एखाद्याच्या परवानगीशिवाय त्याचे फेसबुक, व्हॉटसअॅप वापर करणे हा कायद्याने गुन्हा असल्याची माहिती त्यांनी दिली. कोणत्याही बाबतीत पासवर्ड वापरतांना तो कोणीही अंदाज करून मिळवू शकेल असे पासवर्ड न ठेवण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी सुमित महाबळेश्वरकर यांनी बँके संदर्भात होणार फ्रॉडची माहिती देत याबाबत डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, ऑनलाई ट्रान्सेक्शन, स्किमर डिव्हाइसेस याद्वारे होणारी फसवणूक, फसवणूक झालेली विविध प्रकरणे आदी संदर्भात माहिती दिली. या प्रकारातून कशाप्रकारे सावध राहावे, काय चुका होवू शकतात, आपण काय चुका करतो. आपले गोपनीय पासवर्ड कोणालाही सांगू नका ती शेअर करू नका किंवा जतन करून ठेवू नये. कोणतीही बँक फोन कयन ओटीपी व अन्य माहिती विचारत नसल्याबाबत त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहाय्यक पोलीस निरीक्षका सुजाता शानमे यांनी केले.आभार सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. पी. चोरमले यांनी मानले. यावेळी शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी, नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंडीत रेजीतवाड, पोलीस उपनिरीक्षक विवेक सोनवणे, एस. ए. गोपीनवार, पी. आर. कापुरे, बारहाते, भुसारे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बालाजी रेड्डी, गणेश कौटकर, गौस पठाण, संतोष व्यवहारे, वर्षा कोल्हेकर, रविकुमार भुमकर, राजेश आगाशे, राम घुले यांच्यासह स्थानिक गुन्हा शाखा व सायबर लॅबच्या कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

देशोन्नती
नांदेड/गुरुवार, दि. १८ जानेवारी २०१८

# खबरदारीने सायबर गुन्ह्यापासून वाचता येईल - संदीप गादीया

शहर प्रतिनिधी / १७ जानेवारी

**परभणी :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापर वाढला आहे. ऑनलाईन व्यवहार करण्याचे प्रमाण वाढल्याने फसवणुकीचा धोका वाढला आहे. खबरदारीने सायबर गुन्ह्यापासून वाचता येईल असे मार्गदर्शन सायबर एक्सपर्ट संदिप गादीया यांनी केले. ते जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आयोजीत मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होते.

ट्रान्सफॉर्मिंग महाराष्ट्र प्रकल्पातंर्गत बुधवार १७ जानेवारी रोजी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात सायबर क्राईम विषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात ले होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे णून प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रमुख वक्ते ून आयसीआयसीआय बँकेचे रिझनल मॅनेजर त महाबळेश्वरकर, सायबर एक्सपर्ट संदीप ीया, सपोनि पंडित रेजितवाड, यांची उपस्थिती होती, व्यासपीठावर अप्पर पोलीस अधिक्षक विश्व पानसरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, अनिल खेर्डीकर, पोनि संजय हिबारे, सोहन माच्छरे यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना ऑनलाईन बँकिंग, डेबीट कार्ड, एटीएम स्किमींग, मोबाईल बँकिंग, फिशींग द्वारे होणारा फ्रॉड, फोन कॉलवरील फ्रॉड, एटीएम मशिनद्वारे होणारे फ्रॉड, मोबाईल संदेश पाठवून होणारी फसवणुक, लॉटरी, जॉब फ्रॉड या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सोशल माध्यमांवर पसरविण्यात येणारे संदेश, त्याद्वारे होणारी गुन्हेगारी, सायबर मर्डर, खोटी प्रोफाईल तयार करणे, प्रोफाईल हॅक करणे, अक्षेपार्ह व्यक्तव्य पसरविणे, सोशल नेटवर्कींगवरील क्राईम या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अशा गुन्हेगारीपासून कसे वाचता येईल या विषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर प्रास्ताविक, सपोनि सुजाता शानमे सुत्रसंचलन तर सपोनि चोरमले यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी पोउपनि गोपिनवार, बालाजी रेड्डी, गौस पठाण, संतोष व्यवहार, वर्षा कोल्हेकर, रविकुमार भुमकर, राम घुले, पोउपनि.विवेक सोनवने, कापूरे, राजेश आगाशे आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

> **सायबर गुन्ह्यात साडेतीनशे टक्क्यांनी वाढ**
> मागील काही वर्षापासून सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. मागील तीन वर्षात संगणक, ईलेक्ट्रॉनिक माध्यम, इंटरनेटच्या माध्यमातून होणाऱ्या गुन्ह्यामध्ये साडेतिनशे टक्क्यांनी वाढ झाल्याचे सायबर एक्सपर्ट संदीप गादीया यांनी सांगितले.



परभणी : जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आयोजीत सायबर क्राईम विषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करतांना उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल खेर्डीकर, नारायण शिरगावकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, संदीप गादीया, सुमित महाबळेश्वरकर, पोनि सोहन माच्छरे, राजेश आगाशे व इतर. (छाया : शंकर झाटे)

पुढारी | शुक्रवार, १९ जानेवारी २०१८

# युवकांनो इंटरनेट वापर जरा जपून अन्यथा...

## ट्रान्सफॉर्मिंग महाराष्ट्र प्रकल्पांतर्गत सायबर क्राईम संदर्भात तज्ज्ञांकडून जाणीवजागृती

**परभणी : प्रतिनिधी**

आज इंटरनेटसारख्या विस्तीर्ण क्षेत्रात गुन्हेगारी घडवून आणणाऱ्यांची संख्या कमी नाही. यामुळे न चुकता झालेली चूकही सर्वसामान्यांसाठी मोठे संकट निर्माण करते. यातून स्वतःचा कसा बचाव करता येईल, यासाठी १७ जानेवारी रोजी श्री शिवाजी महाविद्यालयातील सभागृहात ट्रान्सफॉर्मिंग महाराष्ट्र प्रकल्पांतर्गत सायबर क्राईमसंदर्भात तज्ज्ञांकडून कृतीयुक्त जाणीव जागृती घडवून आणण्यात आली.

इंटरनेटचा वापर जरा जपून करणे प्रत्येकांसाठी आवश्यक आहे. सध्या गुन्हेगारी प्रवृत्तीने सर्वत्र थैमान घातले आहे. या गुन्हेगारीतील हिंसकप्रवृत्तीच्या लोकांनी समाज माध्यमांमध्ये घुसून प्रहार करणे सुरू केले आहे. पोलिस अधीक्षक दिलीप झळके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. पुणे येथील सायबर सेलचे संदीप गादिया, बँक क्षेत्रातील सायबर सेलचे सुमित महाबळेश्वरकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारी संदर्भात प्रात्यक्षिकांतून मार्गदर्शन केले. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय हिबारे, सहायक पोलिस निरीक्षक सुजाता शानमे, प्राचार्य बाळासाहेब जाधव, डीवायएसपी नारायण शिरगावकर, जिंतूरचे अनिल घेरडीकर, सोहन माच्छरे, दहशतवाद विरोधी पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक पंडित रेजितवाड, फौजदार विवेक सोनवणे, गोपीनवार, कापुरे, बहात्तरे, दामिनी पथकातील भुसारे उपस्थित होते. गादिया यांनी इंटरनेटद्वारे होत असलेल्या क्राईमची संकल्पना विद्यार्थ्यांना पटवून सांगितली. त्यांनी हॅकिंग, फिशिंग, स्मीसिंग, विशिंग, स्फुगिंग, कॉलिंग क्राईम, कॉल फोन हॅकींग, व्हाट्सअॅप हॅकींग, सायबर मर्डर, फेक प्रोफाईल, सेल्फी, स्कीमर्स संदर्भात मार्गदर्शन केले. व्हॉट्सअॅप, बँकिंग क्षेत्रातील गुन्हेगारी संदर्भात त्यांनी कार्ड स्कीमर्सची माहिती सांगितली.

सायबर गुन्ह्यांचे स्लाईड शोच्या माध्यमातून स्पष्टीकरणही दिले. आभार सहायक पोलिस निरीक्षक बी.पी.चोरमले यांनी मानले. बालाजी रेड्डी, गौस पठाण, संतोष व्यवहारे, वर्षा कोल्हेकर, रविकुमार भूमकर, राजेश आगाशे, सायबर सेलचे राम घुले यांनी परिश्रम घेतले.



**परभणी :** सायबर क्राईमविषयक कार्यक्रमात संदीप गादिया, दिलीप झळके, संजय हिबारे, सुजाता शानमे आदी.

### सायबर क्राईम होऊ शकतो

इंटरनेटचा वापर करताना दुसऱ्याच्या नंबरवरून तिसऱ्याला कॉल करणे, फिशिंग कॉलच्या माध्यमातून लोकांना लालूच दाखविणे, स्मीसिंगच्या माध्यमातुन लॉटरी, नायझेरीयन फ्रॉड घडवणे, विशिंगमधून नागरिकांना फसविणे, एस.एम.एसच्या माध्यमातून आकर्षित करणे, दुसऱ्यांचे प्रोफाईल चोरणे, डुप्लीकेट प्रोफाईल बनविणे, दुसऱ्यांचा फोन हॅक करणे, सोशल नेटवर्कवर चुकीच्या पोस्ट अपडेट, शेअर करणे व वाचणे अशा प्रकारचे सर्व कृत्य हे गुन्ह्यास पात्र राहतील.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. १८ जानेवारी २०१८ ३



**दीपप्रज्ज्वलन:** परभणी पोलीस दलाच्या वतीने सायबर गुन्ह्यांविषयी आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी दीपप्रज्ज्वलन करताना सायबर एक्सपर्ट संदीप गादिया. समवेत सुमीत महाबळेश्वरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, अनिल घेर्डीकर, पोलीस निरीक्षक संजय हिबारे, सोहन माछरे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, राजेश आगासे, बालाजी रेड्डी.

देशोन्नती

शुक्रवार, दि. १९ जानेवारी २०१८

# शिवाजी महाविद्यालयात युवा सप्ताहानिमित्त व्याख्यान

**परभणी** : विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत स्वामी विवेकानंद अध्यासन केंद्राच्यावतीने शिवाजी महाविद्यालयात युवा सप्ताह साजरा करण्यात आला. या युवा सप्ताहाच्या समारोप प्रसंगी प्रा.रामाप्रसाद देशमुख यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव हे होते. यावेळी प्रा. देशमुख यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक डॉ. जे.एम. गायकवाड यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. अनिल बडगुजर यांनी तर आभार प्रशांत कच्छवे यांनी मानले.

लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि.२० जानेवारी २०१८ २

# स्मार्टनेस पद्धतीने अभ्यास करता आला पाहिजे

## व्याख्यान : संतोष कार्ले यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** विद्यार्थ्यांनी आपली क्षमता ओळखून अभ्यासाचे क्षेत्र निवडावे. तसेच योग्य नियोजन केल्यास ध्येयापर्यंत पोहचता येते. यासाठी केवळ कठोर पद्धतीने अभ्यास करून चालणार नसून स्मार्टनेस पद्धतीने अभ्यास करता आला पाहिजे, तरच यशस्वी होता येते, असे प्रतिपादन करिअर मार्गदर्शक व्याख्याते संतोष कार्ले यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात १९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमात कार्ले बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ.बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य ए.एन. डहाळे, प्रा.एस.एम. कुलकर्णी, प्रा.डी.बी.पाटील, प्रा.पी.पी. शिंदे, प्रा.एस.एन. मुंडे, प्रा.प्रकाश शिंगे, प्रा.किनगे आदींची उपस्थिती होती. यावेळी कार्ले यांनी विज्ञान शाखेतील विविध अभ्यासक्रमाची माहिती दिली. कार्ले म्हणाले, केवळ वैद्यकीय व अभियांत्रिकी अशा दोनच शाखा करिअरसाठी नसून हजारो अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. आपल्याला अभ्यासक्रमाची माहिती नसल्याने या संधीपासून वंचित राहतो. दहावीनंतर जवळपास २००, बारावी कला शाखेमध्ये ८४, वाणिज्य १५०, पदवीमध्ये ३५०, एमबीबीएसमध्ये १०९, पदविकामध्ये ९७, पत्रकारितेत १८, फोटोग्राफीमध्ये १७, कायदा अभ्यासक्रमामध्ये ४३ प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. याशिवाय दहावी, बारावी पास, नापास विद्यार्थ्यांसाठीही आयटीआयमध्ये जवळपास ११२ अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन आपल्याला करिअर निवडता येते, असे त्यांनी सांगितले. या प्रसंगी जेईई, नीट परीक्षेसंदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

शिवाय देशभरातील विविध संस्था त्यामध्ये राबविले जाणारे अभ्यासक्रम, पात्रता व यासाठी लागणाऱ्या परीक्षा याची माहितीही त्यांनी सांगितली. प्राचार्य जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी बारावीतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील वर्षभरातील अनुभव सांगितले. प्रा. एस.एन. मुंडे यांनी प्रास्ताविक केले.

उत्तम बोरसुरीकर



परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी व्याख्याते संतोष कार्ले, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य ए.एन. डहाळे, प्रा. एस.एम. कुलकर्णी, प्रा. डी.बी. पाटील, प्रा. पी.पी. शिंदे, प्रा. एस.एन. मुंडे आदी.

देशोन्नती परभणी -रविवार, दि.२१ जानेवारी २०१८

## स्वच्छ भारत मिशनचा उपक्रम ; जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उदघाटन

# स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांचे योगदान महत्वाचे - सौ. उज्वला राठोड

**शहर प्रतिनिधी / २० जानेवारी**

**परभणी** : ग्रामीण भागामध्ये स्वच्छतेची चळवळ उभी करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. उज्ज्वला राठोड यांनी केले.

२० जानेवारी २०१८ रोजी परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात जिल्हा स्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ.उज्ज्वला राठोड, उपाध्यक्ष सौ.भावनाताई नखाते, अर्थ व बांधकाम सभापती अशोक काकडे, स्वच्छ भारत मिशन चे उप मुख्य कार्यकारी चंद्रहार ढोकणे, उप प्राचार्य केशेट्टी, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

सदर जिल्हास्तरीय स्पर्धेचे परीक्षण विधितज्ञ सौ.रेवती पिंपळगावकर, प्रा.अजय महाजन, प्रा.सौ.सीमा चौधरी करत आहेत. तालुकास्तरावर कनिष्ठ आणि वरिष्ठ गटामधून प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धकांना २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून परभणीचे पालकमंत्री ना.श्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र, आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी अर्थ व बांधकाम सभापती अशोक काकडे, उपाध्यक्ष सौ.भावना नखाते यांनी देखील उपस्थित महाविद्यालयीन युवक-युवती यांना समयोचित मार्गदर्शन केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनुष्यबळ विकास तज्ज्ञ अनिल मुले आणि तर प्रास्ताविक स्वच्छ भारत मिशन चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी तर आभार ज्ञानेश्वर गायकवाड यांनी मानले कार्यक्रमाच्या यशवीतेसाठी स्वच्छ भारत मिशन कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले




**परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उदघाटन जि.प.अध्यक्षा सौ.उज्वलाताई राठोड यांच्याहस्ते करण्यात आले. या प्रसंगी सौ.भावनाताई नखाते, अशोक काकडे, चंद्रहार ढोकणे, प्राचार्य केशेट्टी व इतर**

रविवार, दि. २१ जानेवारी २०१८ पा

समर्थ
दिलासा

# स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांचे योगदान महत्वाचे

## जि.प.अध्यक्षा सौ.उज्वला राठोडः जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उदघाटन

**परभणी, दि.२०(प्रतिनिधी):** ग्रामीण भागामध्ये स्वच्छतेची चळवळ उभी करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. उज्वला राठोड यांनी केले.

दि. २० जानेवारी २०१८ रोजी परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात जिल्हा स्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ.उज्वला राठोड, उपाध्यक्ष सौ.भावनाताई नखाते, अर्थ व बांधकाम सभापती अशोक काकडे, स्वच्छ भारत मिशनचे उप मुख्य कार्यकारी चंद्रहार



ढोकणे, उप प्राचार्य केशेट्टी, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.सदर जिल्हस्तरीय स्पर्धेचे परीक्षण विधितज्ज्ञ सौ.रेवती पिंपळगावकर, प्रा.अजय महाजन, प्रा.सौ.सीमा चौधरी करत आहेत. तालुकास्तरावर कनिष्ठ आणि वरिष्ठ गटामधून प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धकांना दि. २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून परभणीचे पालकमंत्री ना.श्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र, आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

यावेळी अर्थ व बांधकाम सभापती अशोक काकडे, उपाध्यक्ष सौ.भावना नखाते यांनी देखील उपस्थित महाविद्यालयीन युवक - युवती याना समयोचित मार्गदर्शन केले. ...... कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनुष्यबळ विकास तज्ज्ञ श्री अनिल मुले आणि तर प्रास्ताविक स्वच्छ भारत मिशन चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रहार ढोकणे यांनी तर आभार ज्ञानेश्र्वर गायकवाड यांनी मानले कार्यक्रमाच्या यश्र्वीतेसाठी स्वच्छ भारत मिशन कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

सकाळ
नांदेड, रविवार
२१ जानेवारी २०१८
३

गुरुवारी (ता. ११) नांदेड येथे मराठवाड्यातील खासदारांसोबत बैठक घेण्यात
र्री रेल्वेच्या विविध मागण्यांविषयी त्यांनी मराठवाड्यातील खासदारांसबोत चर्चा
आहे. हे काम डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण केले जाईल, असे आश्वासन श्री. यादव
ींद्र मुथा, उमाकांत जोशी, किरण चिद्रावार, गौतम नहाटा आदी उपस्थित होते.

# 'स्वच्छता चळवळ उभारण्यासाठी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे'

परभणी, ता. २० (बातमीदार) : ग्रामीण भागामध्ये स्वच्छतेची चळवळ उभी करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती उज्वला राठोड यांनी केले.

येथील शिवाजी महाविद्यालयात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उज्वला राठोड तर या वेळी उपाध्यक्ष भावना नखाते, अर्थ व बांधकाम सभापती अशोक काकडे, उपमुख्य कार्यकारी चंद्रहार ढोकणे, उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी आदींची उपस्थिती सदर जिल्हास्तरीय स्पर्धेचे परीक्षण विधितज्ज्ञ रेवती पिंपळगावकर, प्रा. अजय महाजन, प्रा. सीमा चौधरी करीत आहेत. तालुकास्तरावर कनिष्ठ आणि वरिष्ठ गटामधून प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धकांना २६ जानेवारी होणाऱ्या मुख्य प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र, आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. श्री. ढोकणे यांनी प्रास्ताविक केले. अनिल मुळे यांनी सूत्रसंचालन केले, तर ज्ञानेश्वर गायकवाड यांनी आभार मानले.



परभणी : स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उज्वला राठोड, भावना नखाते, अशोक काकडे, चंद्रहार ढोकणे आदींच्या उपस्थितीत झाले.

**हिवाळी शिबिराचे उद्घाटन**

इठलापूर (ता. परभणी) येथे शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक हिवाळी शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा श्रीमती भावना नखाते यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सी. एम. ढोकणे हे होते. या वेळी विमल नखाते, सतीश निरपणे, केशव दुधाटे, गणेश इमके, ज्ञानेश्वर गायकवाड, अभिजित कोरान्ने यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रल्हाद भोपे यांनी प्रास्ताविक केले, तर विनोद शिंगणे यांनी आभार मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक तसेच प्रा. विलास कुऱ्हाडकर, अच्युत तरफडे, दासू मस्के, प्रा. वृषाली फुके, प्रा. पांडे आदी पुढाकार घेत आहेत.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि. २१ जानेवारी २०१८ ४

# 'सार्वजनिक स्वच्छता प्रत्येकाची जबाबदारी'

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशात विविध उपक्रमानिशी सुरु झाले आहे. वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जि.प.च्या उपाध्यक्षा भावनाताई नखाते यांनी केले.

तालुक्यातील इठलापूर येथे शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी निवासी शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी नखाते बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी सी.एम.ढोकणे, सरपंच नंदाबाई पुंड, विमल नखाते, सतीश निरपणे, केशवअण्णा दुधाटे, गणेश इमके, ज्ञानेश्वर गायकवाड, अभिजीत कोरात्रे यांची उपस्थिती होती. रासेयोच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेबाबत प्रात्यक्षिके सादर केली. शिबिरात ११३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

प्रा.प्रल्हाद भोपे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी सूत्रसंचालन केले. विनोद शिंगणे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी प्रा.विलास कुऱ्हाडकर, अच्युत तरफडे, दासू मस्के, प्रा.वृषाली फुके, प्रा.पांडे यांनी प्रयत्न केले.

सकाळ
नांदेड, सोमवार
२२ जानेवारी २०१८
४



TODAY
# परभणी

## अवतीभवती



परभणी : शिवाजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी विचार मांडले.

## 'शिवाजी'त विवेकानंद जयंतीनिमित्त कार्यक्रम

परभणी, ता. २१ : स्वामी विवेकानंदांचे आयुष्य सर्वांसाठी प्रेरणास्रोत आहे. युवकांनी त्यांचा आदर्श घेऊन व स्वतःवर विश्वास ठेवून आयुष्याचे कल्याण करून घ्यावे, असे प्रतिपादन प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी केले. शिवाजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्या वतीने जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव होते. डॉ. जे. एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अनिल बडगुजर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रशांत कच्छवे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी सचिन लहिरे, ज्ञानदेव सूर्यवंशी, सतीन निसर्गन, बालाजी शिंदे, एकनाथ कदम, कुणाल लकळ आदींनी पुढाकार घेतला.

दि.२० जानेवारी २०१८

गोदातीर समाचार

# आज जिल्हास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धा

**परभणी-** तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांसाठी आज शनिवारी (दि.२०) सकाळी ११ वाजता श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागच्या वतीने जिल्हास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती स्वच्छ भारत मिशन चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रहार ढोकणे यांनी दिली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष सौ.उज्वला राठोड, उपाध्यक्ष सौ.भावनाताई नखाते, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रताप सवडे, समाज कल्याण सभापती सौ.उर्मिला बनसोडे, सभापती श्री अशोक काकडे, सभापती सौ.राधाबाई सूर्यवंशी, श्रीनिवास मुंढे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उप मुख्य कार्यकारी श्री चंद्रहार ढोकणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री एम व्ही करडखेलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत श्री विजय मुळीक आदींची उपस्थिती असणार आहे. सदर जिल्हास्तरीय स्पर्धेचे परीक्षण विधितज्ज्ञ सौ.रेवती पिंपळगावकर, प्रा.अजय महाजन करणार आहेत. तालुकास्तरावर कनिष्ठ आणि वरिष्ठ गटामधून प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धक सदर स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे सकाळी १० वाजता स्पर्धकांची नावनोंदणी करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये कनिष्ठ आणि वरिष्ठ गटासाठीचे प्रथम, द्वितीय,त्रितिय क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे रु.११०००, रु.७०००, रु.५००० असे असून विजयी स्पर्धकांना पारितोषिक, सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तेव्हा अधिक माहितीसाठी स्वच्छ भारत मिशन कार्यालयातील संवाद तज्ज्ञ श्री ज्ञानेश्वर गायकवाड, संगणक तज्ज्ञ श्री राजेंद्र कोचुरे ९४२०२८२३५८ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रहार ढोकणे, यांनी केले आहे.

शनिवार, दि. २० जानेवारी २०१८ पान नं. ३

समर्थ **दिलासा**

# जिल्हास्तरीय आज स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धा

**परभणी, दि.१९(प्रतिनिधी):** तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांसाठी दि.२० रोजी स. ११ वा. शिवाजी महाविद्यालय येथे जि. प.च्या स्वच्छ भारत मिशन विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

अध्यक्षस्थानी जि.प.अध्यक्ष सौ.उज्वला राठोड, उपाध्यक्ष सौ. भावनाताई नखाते, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रताप सवडे, सभापती सौ.उर्मिला बनसोडे, सभापती अशोक काकडे, सभापती सौ.राधाबाई सूर्यवंशी, सभापती श्रीनिवास मुंढे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उप मुख्य कार्यकारी चंद्रहार ढोकणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी एम.व्ही.करडखेलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विजय मुळीक आदींची उपस्थिती असणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेचे परीक्षण विधितज्ज्ञ सौ.रेवती पिंपळगावकर, प्रा.अजय महाजन करणार आहेत. तालुकास्तरावर कनिष्ठ आणि वरिष्ठ गटामधून प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धक सदर स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत.

दैनिक समर्थ
दिलासा
मंगळवार, दि. २३ जानेवारी २०१८ पान नं. ३

# स्वच्छता ही आग्रह न राहता सवय व्हावी

परभणी,दि.२२(प्रतिनिधी): स्वच्छ भारत अभियान संपुर्ण देशात विविध उपक्रमानिशी सुरू आहे. वैयक्तीक व सार्वजनिक स्वच्छता प्रत्येकाची जबाबदारी आहे. आज स्वच्छतेबाबतची सतर्कता वाढत आहे. स्वच्छता ही आग्रह न राहता सवय व्हावी असे प्रतिपादन जि. प.उपाध्यक्षा भावना नखाते यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या इटलापूर (दे)येथील वार्षिक हिवाळी निव-ासी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद पाणी स्वच्छता विभागाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी सी.एम.ढोकणे यांची उपस्थिती होती.यावेळी व्यासपीठावर सरपंच नंदा पुंड, विमल नखाते, शिक्षण सहायक निरीक्षक सतिश निरपणे, केशव अण्णा दुधाटे, गणेश इमके, संवादतज्ज्ञ ज्ञानेश्वर गायकवाड, अभिजित कोरान्ने यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना ढोकणे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेतील कार्य महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संधी असून या संधीचे सोने करावे. सोनटक्के यांनी शाळेच्या विकासासाठी केलेले कार्य सांगून राबवित असलेल्या उपक्रमांबाबत माहिती दिली. प्रास्ताविक प्रल्हाद भोपे यांनी केले. सुत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी तर आभार विनोद शिंगणे यांनी मानले. यशस्वीतेसाठी ग्रामस्थ, शिबिरार्थी, शिक्षक, प्रा.विलास कु-हाडकर, अच्युत तरफडे, दासू मस्के, प्रा.वृषाली फुके, प्रा.पांडे आदीं प्रयत्न करीत आहेत. या शिबिरात ११३ स्वयंसेवक कार्यरत आहेत.

मंगळवार, दि. २३ जानेवारी २०१८

समर्थ

**दिलासा**

# योग्य नियोजनानी ध्येय प्राप्ती: प्राचार्य जाधव

परभणी, दि.२२(प्रतिनिधी): विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम आणि मेहनत केली तर यशाची शिखरे गाठता येतील. आपल्या आयुष्यात वेळेचे योग्य नियोजन केले तर आपणास आपल्या ध्येय प्राप्ती पर्यंत पोहचता येते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले.



विज्ञान शाखेतील ११ वीच्या विद्यार्थ्यांकडून १२ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाचे आयोजन श्री शिवाजी महाविद्यालयात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपली क्षमता ओळखून अभ्यासाचे क्षेत्र निवडावे यासाठी केवळ कठोर पध्दतीने अभ्यास करून चालणार नसून स्मार्टफोन पध्दतीने अभ्यास करता आला पाहिजे तरच यशस्वी होता येते असे प्रतिपादन करिअर मार्गदर्शक प्रमुख पाहुणे संतोष कारले यांनी केले.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य ए.एन.डहाळे, प्रा.एस. एन.मुंदे, प्रा.डी.व्ही.पाटील, प्रा.एस.एम.कुलकर्णी, प्रा.पी. पी.किनगे यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

सुत्रसंचलन अनघा इंगळे, सपना चव्हाण, गार्गी नादापुरकर, कल्याणी कारले यांनी केले. प्रास्ताविक प्रा.एस.एन.मुंदे यांनी केले. आभार मोनिका चव्हाण हिने मानले. यशस्वीतेसाठी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

मंगळवार, दि. २३ जानेवारी २०१८
आदर्श गावकरी

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कविता सातपुते प्रथम, रोहित वेताळ द्वितीय

परभणी/प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात शनिवार दि. २० रोजी जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेत कनिष्ठ गटामधून कविता सातपुते तर वरीष्ठ गटामधून रोहित वेताळ यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तालुकास्तरावर कनिष्ठ आणि वरीष्ठ गटामधून प्रथम व व्दितीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धकांसाठी ही स्पर्धा झाली. या स्पर्धेतील विजेते आता राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये परभणी जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत.

जिल्हा स्तरावरील या वक्तृत्व स्पर्धेमध्ये कनिष्ट गटामध्ये प्रथम क्रमांक संताई महाविद्यालय परभणीची, कविता सातपुते, व्दितीय क्रमांक वरपुडकर महाविद्यालय, परभणीची रुपाली मोहिते, तर तृतीय क्रमांक यशवंत महाविद्यालय, सेलूची साखरे ऐश्वर्या, व के. के. एम महाविद्यालय, मानवतचा असमार दिगंबर दत्ता, यांनी मिळवला आहे.

वरिष्ठ गटामध्ये प्रथम क्रमांक वरपुडकर कृषी महाविद्यालय, परभणी येथील रोहित राजेंद्र वेताळ, व्दितीय क्रमांक श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी मनीषा शिवाजीराव गोरे, तर तृतीय क्रमांक नूतन महाविद्यालय, सेलूची राजश्री सतीशराव बोराडे, व राजीव गांधी महाविद्यालय सोनपेठ येथील प्रशांत सुधाकर शिंगाडे, यांनी पटकावला आहे.जिल्हा स्तरावरील कनिष्ठ आणि वरिष्ठ गटामधून प्रथम, व्दितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धकांना दि. २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी परभणीचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र, आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. सदर जिल्हास्तरीय स्पर्धेचे परीक्षण विधितज्ञ रेवती पिंपळगावकर, प्रा.अजय महाजन, व प्रा. सीमा चौधरी यांनी केले. या वक्तृत्व स्पर्धे मध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांचे जिल्हा परिषद अध्यक्षा उज्वला राठोड, उपाध्यक्षा भावना नखाते, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रताप सवडे, व स्वच्छ भारत मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी केले आहे.

देशोन्नती

बुधवार, दि. २४ जानेवारी २०१८


# ईठलापूरात विद्यार्थ्यांचे स्वच्छता अभियान

**परभणी** : तालुक्यातील ईठलापूर येथे शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता अभियान राबविले. या अभियानात प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. तुकाराम फिसफिसे, प्रा. विनोद शिंगणे यांनीही सहभाग घेतला. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे स्वागत करुन मोहिमेत सहभाग नोंदवला.

समर्थ दिलासा
बुधवार, दि. २४ जानेवारी २०१८

# राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सातपुते व वेताळ पात्र

## जिल्हास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धा: स्वच्छ भारत मिशनचा उपक्रम



परभणी, दि.२३(प्रतिनिधी): दि. २० जानेवारी २०१८ रोजी परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धे मध्ये कनिष्ठ गटामधून कविता सातपुते तर वरिष्ठ गटामधून रोहित वेताळ यांनी प्रथम क्रमांक पटकावला असून ते राज्यस्तरीय स्पर्धे मध्ये परभणी जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत.

तालुकास्तरावर कनिष्ठ आणि वरिष्ठ गटामधून प्रथम आणि व्दितीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धकांसाठी दि.२० जानेवारी २०१८ रोजी जिल्हा स्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.जिल्हा स्तरावर वक्तृत्व स्पर्धेमध्ये कनिष्ट गटामध्ये प्रथम क्रमांक संताई महाविद्यालय, परभणी येथील कु.कविता कुलभूषण सातपुते, व्दितीय क्रमांक कु. रुपाली अनिल मोहिते, वरपुडकर महाविद्यालय, परभणी तर तृतीय क्रमांक कु.साखरे ऐश्वर्या, यशवंत महाविद्यालय, सेलू, व असमार दिगंबर दत्ता, के.के.एम महाविद्यालय, मानवत यांनी मिळवला आहे.

वरिष्ठ गटामध्ये प्रथम क्रमांक वरपुडकर कृषी महाविद्यालय, परभणी येथील रोहित राजेंद्र वेताळ, व्दितीय क्रमांक कु. मनीषा शिवाजीराव गोरे, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी तर तृतीय क्रमांक कु.राजश्री सतीशराव बोराडे, नूतन महाविद्यालय, सेलू, व प्रशांत सुधाकर शिंगाडे, राजीव गांधी महाविद्यालय, सोनपेठ यांनी पटकावला आहे. जिल्हा स्तरावरील कनिष्ठ आणि वरिष्ठ गटामधून प्रथम,व्दितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त विजयी स्पर्धकांना दि. २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या शुभहस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र, आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. सदर जिल्हास्तरीय स्पर्धेचे परीक्षण विधितज्ज्ञ सौ. रेवती पिंपळगावकर, प्रा.अजय महाजन, प्रा.सौ.सीमा चौधरी यांनी केले.वक्तृत्व स्पर्धे मध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांचे अभिनंदन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ.उज्वला राठोड, उपाध्यक्षा सौ.भावना नखाते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रताप सवडे, स्वच्छ भारत मिशन चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रहार ढोकणे यांनी केले आहे.

देशोन्नती गुरुवार, दि.२५ जानेवारी २०१८

# भ्रष्टाचार मुक्तीसाठी कॅशलेश व्यवहार गरजेचा - प्रा.डॉ. भालेराव

## इठलापुर येथे शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो विभागाचे विशेष हिवाळी शिबीर

*शहर प्रतिनिधी/ २४ जानेवारी*

**परभणी** : भ्रष्टाचार मुक्तीसाठी कॅशलेश व्यवहार गरजेचा असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ. रमेश भालेराव यांनी केले. ते श्री शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने इटलापुर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षीक विशेष हिवाळी शिबीरात दुसऱ्या दिवसाच्या बौध्दीक सत्रात बोलत होते. पुढे

बोलतांना ते म्हणाले की, नोटाबंदी करून नविन नोटा चलनात टप्याटप्याने आणल्या गेल्या या मागे देशातील काळा पैसा बाहेर काढणे, नकली नोटाला पायबंद घालणे, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कॅशलेश व्यवहार ही प्रणाली रूजविणे, अर्थव्यवस्थेला विकासाकडे नेणे आदी बाबी करिता नोटा बंदीचा निर्णय पंतप्रधानांनी घेतला. भारतीय जनतेने नोटाबंदी अनुभवली. नोटा बंदी करून कॅशलेश व्यवहार याबाबत देशभरात मोठी जनजागृती माध्यम व बँकीग क्षेत्रातुन केल्या गेली. भ्रष्टाचार ही एक नविन समस्या देशातुन हद्द पार करणे भ्रष्टाचार मुक्त भारत घडविण्यासाठी कॅशलेश प्रणाली गरजेची आहे, असे मत प्रा.डॉ.रमेश भालेराव यांनी मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.एस.एल.राठोड हे होते. प्रा.कदम, प्रा.सुर्यवंशी यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात डॉ.राठोड म्हणाले की, रा.स.योतील विद्यार्थ्यांना हे शिबीर अनमोल संधी असते. व्यक्तीमत्व विकासाची घडण अशा शिबीरातून होत असते. स्वावलंबन व नेतृत्व गुणाचा विकास यासाठी हे शिबीर महत्वाचे भुमीका बजावतात. इठलापुरचे रूप पालटायला इठलापुर येथील लोकांमध्ये विधायक परिवर्तन आणण्यासाठी हे शिबीर महत्वपुर्ण ठरेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन स्वयंसेवक शेख समद यांने केले. पाहुण्याचा परिचय सुनिल हरकळ याने करुन दिला. आभार ओंकार मुरुंबेकर यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी जी.प.इठलापुर दे. शाळेचे शिक्षक, शिबीरार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. या शिबीरासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा.डॉ.टी.आर. फीसफीसे, प्रा. विनोद शिंगणे, प्रा. कुऱ्हाडकर स्वयंसेवक प्रतिनिधी ओंकार मुरूंबेकर, स्वयंसेवक रवि लाड, प्रशासकीय कर्मचारी दासू मस्के, अच्युत तरफडे आदींनी परिश्रम घेतले.

देशोन्नती २
गुरूवार, दि. २५ जानेवारी २०१८
epaper.deshonnati.com

# नेतृत्वा शिवाय विकास अशक्य - डॉ. राऊतराहे

**शहर प्रतिनिधी / २४ जानेवारी**

**परभणी :** गावाच्या विकासाला दिशा देण्यासाठी रासेयोची शिबीर आयोजीत केले जातात. शिबीरात विद्यार्थी बाहेरगावचे असतात त्यांच्या सोबत गावच्या तरूणांनी श्रमदान करावे. गावा विषयीची आस्था, अपुलकी गावातल्यांना जास्त असायला पाहिजे. गावातील नेतृत्वा शिवाय गावाचा विकास अशक्य असल्याचे प्रतिपादन डॉ.एम.एफ. राऊतराहे यांनी केले.

ते श्री शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने इठलापुर येथे आयोजीत करण्यात आलेल्या रासेयोच्या शिबीरात बोलत होते. मंचावर डॉ.पि.एस.लोखंडे, प्रा.उबाळे, प्रा.झुंजारे यांची उपस्थिती होती. या प्रसंगी प्रा.उबाळे म्हणाले की, अज्ञान, निरक्षरता, गरीबी, अस्वच्छता, अनारोग्य, अंधश्रध्दा, विकासाचे प्रश्न इत्यादी समस्या तशाच आहेत. या समस्या संपुष्ठात आणण्याची जाबाबदारी सरपंचांचीच नसुन नागरीकांची आहे. सुत्रसंचालन शेख समद यांनी तर आभार प्रदर्शन बोकारे यांनी केले.

सकाळ
नांदेड, रविवार
२८ जानेवारी २०१८
३
ODAY
परभणी

# शिवाजी महाविद्यालयाचे रासयो शिबिर

परभणी, ता. २७ : श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास इटलापूर (ता. परभणी) येथे सुरवात झाली. सोमवारी (ता. २२) आरोग्य शिबिर घेण्यात आले. डॉ. शेळके, डॉ. अरुण लांडे, शेख मन्वर यांनी सत्यसेवा साईसेवा समितिच्या वतीने ग्रामस्थांची तपासणी करून औषधोपार केले. तत्पूर्वी प्रा. डॉ. रमेश भालेराव यांनी भ्रष्ट्रचार मुक्त भारतासाठी कॅशलेस व्यवहार गरजेचा असल्याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. एस. एल. राठोड अध्यक्षस्थानी होते. प्रा. कदम, प्रा. सूर्यवंशी उपस्थित होते. स्वयसेवक शेख समद याने सूत्रसंचालन केले. सुनील हरकळ याने परिचय दिला. ओंकार मुरूंबेकर यांनी आभार मानले. अन्य सत्रात गावातील नेतृत्वाशिवाय ग्रामविकास अशक्य असल्याचे प्रतिपादन डॉ. एम. एफ. राऊतराहे यांनी केले. डॉ. पी. एस. लोखंडे, प्रा. अशोक उबाळे, प्रा. झुंजारे यांनी मार्गदर्शन केले. सोपान बोकारे याने आभार मानले.

देशोन्नती
■ सोमवार, दि. २९ जानेवारी २०१८ २
epaper.deshonnati.com

## इटलापुरात दंत तपासणी शिबीरास प्रतिसाद

परभणी : तालुक्यातील इटलापूर येथे श्री शिवाजी महाविद्यालयाचे रासेयोचे शिबीर सुरू असून या शिबीरास डॉ.सचिन घनसट यांच्या नेतृत्वाखाली मोफत दंत तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीरात ६० रूग्णांची तपासणी करण्यात आली. दातांविषयी काळजी व उपाय या बद्दल रूग्णांना मार्गदर्शन करण्यात आले. जि.प.च्या शाळेतील २५ विद्यार्थ्यांनी दंत तपासणी करून घेतली. शिबीरात डॉ.विक्रांत भोसकर, डॉ.मनिष राजपुत, डॉ.संकेत लोखंडे, डॉ.प्रसाद वाघमारे यांनी रूग्णांची तपासणी केली. प्रारंभी स्वामी रामानंद तिर्थ व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा.फिसफिसे, प्रा.शिंगणे, प्रा.कुऱ्हाडकर यांनी परिश्रम घेतले.

दि. २८ जानेवारी २०१८
गोदातीर समाचार

## विद्यार्थ्यांनी केली ग्रामस्वच्छता

परभणी - श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे आठवडी शिबीर इटलापूर (दे) येथे सुरू आहे. शिबराच्या तिसऱ्या दिवशीही स्वयंसेवकांनी गावातून स्वच्छतेच्या घोषणा देत गावातील नाल्या, रस्ते स्वच्छ केल्या. विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा वाढीस लागावी म्हणून सामुदायीक श्रमदानातून गावाच्या आजुबाजूला असणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावली. गावचे सरपंच नंदापुड अप्पाराव पुंड यांनी सहकार्य केले.

सकाळ

नांदेड, सोमवार
२९ जानेवारी २०१८

४

## 'शिवाजी'त मोडीलिपी प्रशिक्षण वर्ग सुरू

परभणी, ता. २८ : येथील शिवाजी महाविद्यालयात शनिवारपासून (ता. २७) ता. सहा फेब्रुवारीदरम्यान मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले असून इच्छुकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले आहे. मोडी वाचकांची संख्या अल्प असल्याने त्यांचे वाचन होत नाही, त्यांचे वाचन व्हावे म्हमून वाचक निर्माण करण्यासाठी या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे. दहा ते बारा दिवसीय प्रशिक्षण वर्ग दुपारी तीन ते पाच या वेळेत होईल. त्यासाठी शिक्षणाची अट नसून प्रवेश शुल्क २५ रुपये, शिक्षण शुल्क २२५ रुपये असे एकूण २५० रुपये आहे. प्रशिक्षणानंतर १०० गुणांची परीक्षा घेतली जाणार आहे. ५० टक्के गुण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीला उत्तीर्ण घोषित केल्या जाणार आहे, अधिक माहितीसाठी इच्छुकांनी प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. डॉ. परिमल सुतवणे, प्रा. संतोष भोपी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले आहे.

सामना

परभणी

६ | सोमवार, दि. २९ जानेवारी २०१८

## मोडी लिपी प्रशिक्षण

**परभणी** : पुराभिलेख संचालनालय, मुंबई महाराष्ट्र शासन व मराठी व इतिहास विभागाच्या वतीने शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात शनिवार, २७ जानेवारीपासून मोडी लिपी प्रशिक्षण वर्गास प्रारंभ झाला आहे. हे प्रशिक्षण वर्ग ६ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहेत. या प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रल्हाद भोपे, डॉ. परिमल सुतवणे, संतोष भोपी यांच्याशी संपर्क करावा.

सकाळ

नांदेड, सोमवार

२९ जानेवारी २०१८

३

परभणी

## प्रा. नारायण कणसे यांना पीएच. डी.



नारायण कणसे

परभणी, ता. २८ : येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. नारायण कणसे यांना औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी. प्रदान केली आहे. त्यांनी 'स्टडी ऑफ ऑईल डिग्रेडिंग मायक्रोऑरग्यानिझम्स अँड बायोरिमीडीएशन' यावर संशोधन करून शोध निबंध सादर केला होता. त्यांना पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील डॉ. ए. बी. आडे यांनी मार्गदर्शन केले.

पुण्य नगरी

सोमवार, २९ जानेवारी २०१८ परभणी- हिंगोली

## प्रा. नारायण कणसे यांना पीएच. डी.



परभणी - येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. नारायण कणसे यांना औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी.पदवी नुकताच प्रदान केली. त्यांनी डॉ.एम.बी.आडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्टडी ऑफ ऑईल डिग्रेडींग मायक्रोऑरग्यानिझम्स ॲण्ड बायोरिमिडीएशन' या विषयावर शोधप्रबंध विद्यापीठाकडे सादर केला होता. त्यास मान्यता देत पीएच.डी.पदवी प्रदान केली.

दि.२९ जानेवारी २०१८

गोदातीर समाचार

# शिवाजी महाविद्यालयात मंगळवारी रसायनशास्त्रे राष्ट्रीय चर्चासत्र

**परभणी/प्रतिनिधी**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने येत्या ३० जानेवारी रोजी मॉर्डन प्रोस्पेक्टीव्ह इन केमिकल सायन्स अॅड रिसर्च या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली अंतर्गत सीपीई उपक्रमाच्या सौजन्याने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा प्रमुख हेमंतराव जामकर उपस्थित राहणार आहेत. तर उद्घाटक म्हणून स्वारातीम विद्यापीठ परिक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ.रवि सरोदे उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठाचे प्रो.डी.अशोक यांचे बीजभाषण होणार आहे.

या चर्चासत्रामध्ये मुंबई विद्यापीठाचे प्रो.एम.एम.व्ही.रामण्णा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रो.कॅप्टन डॉ.सुरेश गायकवाड, स्वारातीम विद्यापीठाच्या प्रो.सौ.संगीत माकोणे, प्राचार्य डॉ.वामनराव जाधव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मराठवाड्यातील संशोधकांनी या चर्चासत्रात सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, चर्चासत्राचे समन्वयक तथा विभाग प्रमुख डॉ.सुभाष लोणकर यांनी केले आहे. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी प्रा.उत्तम टेकाळे, डॉ.सुरज आडे, प्रा.गंगाधर गुडलेवाड, डॉ.नानासाहेब शितोळे आदी प्रयत्नशील आहेत.

# परभणी

देशोन्नती

/रविवार, दि. २८ जानेवारी २०१८

## चाफा लघुपटाचे सादरीकरण

**परभणी :** परभणी फिल्म क्लबमध्ये रविवार २८ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता मानसी देवधर दिग्दर्शीत चाफा या लघुपटाचे सादरीकरण शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे. कैझन पिक्चर्स परभणी, अर्भाट फिल्म क्लब पूणे व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी फिल्म क्लबच्या चित्रपट रसास्वाद कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महापौर सौ. मिनाताई वरपुडकर, प्राचार्य डॉ. बि. यु. जाधव यांची उपस्थिती राणार आहे. या लघुपटाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन रवि पाठक यांनी केले आहे.

लोकमत औरंगाबाद, सोमवार, दि. २९ जानेवारी २०१८ ४

## विद्यार्थ्यास सायकल भेट

परभणी- स्वच्छता भारत मिशनच्या वतीने घेण्यात आलेल्या स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत शिवाजी महाविद्यालयाच्या कैलास बादाड याने प्रथम क्रमांक पटकाविला. याबद्दल प्राध्यापकांच्या वतीने बादाड यास सायकल भेट म्हणून देण्यात आली. यावेळी उपप्राचार्य अप्पासाहेब डहाळे, पर्यवेक्षक बी.व्ही. आंधळे आदींची उपस्थिती होती.



परभणी येथील शिवाजी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी कैलास बादाड यास सायकल भेट देण्यात आली. याप्रसंगी उपप्राचार्य अप्पासाहेब डहाळे, बी.व्ही. आंधळे, प्रा.नारायण राऊत आदी.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. ३० जानेवारी २०१८

## आज राष्ट्रीय चर्चासत्र

परभणी- येथील शिवाजी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने ३० जानेवारी रोजी मॉर्डन प्रोस्पेक्टीव्ह इन केमिकल सायन्स अँण्ड रिसर्च या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीयस्तरावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राचा लाभ घेण्याचे आवाहन प्रा.डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.सुभाष लोणकर यांनी केले आहे.

सामना

परभणी

६ | मंगळवार, दि. ३० जानेवारी २०१८

महत्त्वाचे

## परभणी फिल्म क्लबमध्ये दरवळला चाफ्याचा सुगंध

***परभणी :*** कैझन पिक्चर्स, परभणी, आरभाट फिल्म क्लब, पुणे व श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या परभणी फिल्म क्लबचे ९ वे पुष्प रविवार, २८ ज़ानेवारी रोजी शिवाजी महाविद्यालय सभागृहात पार पडले. त्यानिमित्ताने 'चाफा' लघुपटाच्या दिग्दर्शिका मानसी देवघर उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव व महापौर मीनाताई वरपुडकर उपस्थित होत्या. प्रास्ताविक परभणी फिल्म क्लबचे रवी रमेश पाठक यांने केले, सूत्रसंचालन वर्षा जोशी व आभार त्र्यंबक वडसकर यांनी मानले. यशस्वितेसाठी परभणी फिल्म क्लबचे अतुल साळवे, ऋतुराज भोसले, आदर्श कवळीकर, सचिन टोमके, गजानन नालटे, ईश्वर पाटोळे, शुभम एडके, सौरभ कुरुंदकर, सोहम खिल्लारे आदींनी प्रयत्न केले.

देशोन्नती
मंगळवार, दि. ३० जानेवारी २०१८
epaper.-deshonnati.com

## कापसे यांना पीएचडी प्रदान



परभणी : येथील म.शि.प्र. मंडळाच्या श्री शिवाजी महाविद्यालयातयातील वनस्पती शास्त्र विभागातील प्रा. नारायण कापसे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद पीएचडीचे संशोधन स्टडी ऑफ ऑईल डिग्रेडींग मायक्रोआरोग्यनिझमस् अॅन्ड बायोरीमिडीएशन या विषयात डॉ.ए.बी. बडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या या यशाबद्दल हेमंतराव जामकर, बाळासाहेब जाधव, श्रीनिवास केशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

सामना
मंगळवार, दि. ३० जानेवारी २०१८

## प्रा. कणसे यांना पीएच.डी.



परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. नारायण कणसे यांना संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी नुकतीच प्रदान केली. त्यांनी डॉ. एम. बी. आडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्टडी ऑफ ऑईल डिग्रेडिंग मायक्रोऑरग्यानिझम्स अॅण्ड बायोरिमिडीएशन' या विषयावर शोधप्रबंध विद्यापीठाकडे सादर केला होता.

**देशोन्नती** मंगळवार, दि. ३० जानेवारी २०१८

# आज शिवाजी महाविद्यालयात चर्चासत्र

**शहर प्रतिनिधी / २९ जानेवारी**

**परभणी** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने मॉर्डन प्रोस्पेक्टीव इन केमिकल सायन्स ॲण्ड रिसर्च या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राचे आयोजन आज मंगळवार ३० जानेवारी रोजी करण्यात आले आहे.

याचर्चासत्रात हेमंतराव जाम[illegible] उपस्थित राहणार असून उदघाटन डॉ.रवि सरोदे यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रा.डी.अशोक यांचे बिजभाषण होणार आहे. चर्चासत्रात प्रा.एम.एम.व्ही.रामण्णा, डॉ. सुरेश गायकवाड, प्रा.सौ. संगीत माकोने, प्रा.डॉ.जाधव आदि उपस्थित राहणार असून चर्चासत्रात सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य बाळासाहेब जाधव, डॉ.लोणकर आदिंनी केले आहे.

दैनिक समर्थ दिलासा
मंगळवार, दि. ३० जानेवारी २०१८

# चांगले चित्रपट तयार करण्यासाठी वाचन गरजेचे

## दिग्दर्शिका मानसी देवघर: कैझन पिक्चर्स व आरभाट फिल्म क्लबच्या परभणी फिल्म क्लबचे ९ वे पुष्प

परभणी, दि.२९(प्रतिनिधी): चांगले चित्रपट तयार करण्यासाठी वाचन करणे व आजुबाजुला घडणाऱ्या गोष्टींचे अवलोकन करणे खुप गरजेचे आहे असे प्रतिपादन चाफा लघुपटाच्या दिग्दर्शीका मानसी देवघर यांनी केले.

कैझन पिक्चर्स परभणी, आरभाट फिल्म क्लब पुणे व श्री शिवाजी महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या परभणी फिल्म क्लबचे ९ वे पुष्प रविवार दि.२८ जानेवारी रोजी शिवाजी महाविद्यालय सभागृहात संपन्न झाले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. प्रमुख पाहुणे महापौर सौ. मिनाताई वरपुडकर, प्राचार्य डॉ.बी.यु.जाधव उपस्थित होते. लघुपटाच्या सादरीकरणानंतर मानसी देवघर ने लघुपटातील कलात्मक बाबी मनोगताद्वारे व्यक्त केल्या. आपले विचार प्रकट करताना त्या म्हणाल्या, कलेमध्ये स्त्री पुरूष हा भेद नसतो त्यामुळेच महिला दिग्दर्शिका होण्यापेक्षा फक्त दिग्दर्शक होणे जास्त आवडेल. चाफा लघुपटास अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळाले आहेत.त्याचबरोबर भारतात व प्रदेशातील अनेक चित्रपट



महोत्सवात या लघुपटाची दखल घेण्यात आली आहे असे सांगितले. रसीक प्रेक्षकांनी चाफा लघुपटास भरभरून दाद दिली. संवादाशिवाय फक्त चित्रभाषेच्या साहयाने एक चांगला लघुपट करता येवु शकतो याचा अनुभव रसिक प्रेक्षकांना चाफा बघुन मिळाला. दिग्दर्शक मानसी देवधर यांच्या मनोगतानंतर प्रेक्षकांनी प्रश्न विचारून शंकाचे निरसण केले व लघुपटाबददल अधिक माहिती जाणून घेतली. त्या कार्यक्रमास महिला प्रेक्षक वर्गाचा उर्स्फुत सहभाग होता. प्रास्ताविक परभणी फिल्म क्लबचे रवि रमेश पाठक यांने केले. सुत्रसंचालन वर्षा जोशी व आभार त्र्यंबक वडसकर यांनी मानले. यशस्वी होण्यासाठी परभणी फिल्म क्लबचे अतुल साळवे, ऋतुराज भोसले, आदर्श कवळीकर, सचिन टोमके, गजानन नालटे, ईश्वर पाटोळे, शुभम ऐडके, सौरभ कुरूंदकर, सोहम खिल्लारे आदींनी पुढाकार घेतला.

दैनिक समर्थ
दिलासा
मंगळवार, दि. ३० जानेवारी २०१८

# गुणवंत विद्यार्थ्याचा सायकल भेट देवून गौरव

परभणी, दि.२९(प्रतिनिधी): स्वच्छता भारत मिशन जि.प.यांच्या वतीने घेण्यात आलेल्या स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक तालुकास्तरीय स्पर्धेत कनिष्ठ गटातून शिवाजी महाविद्यालयातील कैलास बादाड याने प्रथम क्रमांक मिळविला. अत्यंत हलाकीच्या परिस्थितीत आपले शिक्षण पुर्ण करणा-या या विद्यार्थ्यास सायकल भेट देण्यात आली.

कैलास बादाड याला प्रा.नारायण राऊत यांनी मार्गदर्शन केले. अत्यंत हलाकीच्या परिस्थितीत आपले शिक्षण पुर्ण करणा-या या विद्यार्थ्यास मदत व्हावी म्हणून कला शाखेच्या प्राध्यापकांनी उपप्राचार्य, आप्पासाहेब डहाळे पर्यवेक्षक बी.व्ही.आंधळे यांच्या उपस्थितीत १२ वी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांच्या निरोप सभारंभ कार्यक्रमात सायकल भेट देवून त्याचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्याच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ.सतिश चव्हाण, महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्राचार्य डॉ.एस.एन.केशेट्टी, उपप्राचार्य डॉ.विजया नांदापुरकर व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

बुधवार, दि. ३१ जानेवारी २०१८

दिलासा

# शिवाजी महाविद्यालयात मोडीलिपीचे प्रशिक्षण वर्ग

परभणी, दि.३०(प्रतिनिधी): पुराभिलेख संचालनालय, मुंबई महाराष्ट्र शासन व मराठी इतिहास विभागाच्या वतीने मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाचे दि.२७ ते सहा फेब्रुवारी दरम्यान शिवाजी महाविद्यालयात आयोजन करण्यात आले आहे. शेवटच्या दिवशी त्यासंदर्भात परीक्षा घेतली जाईल. उत्तीर्ण प्रशिक्षणार्थीस प्रमाणपत्र दिले जाईल. इच्छुक विद्यार्थी, कर्मचा-यांनी संपर्क साधण्याचे आवाहन प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा.डॉ.परिमल सुतवणे, प्रा.संतोष भोपी यांनी केले आहे.

पुण्य नगरी
बुधवार, ३१ जानेवारी २०१८ । परभणी

# रसायनशास्त्रात समाजोपयोगी संशोधनाची आवश्यकता - डॉ.अशोक

परभणी / प्रतिनिधी

रसायनशास्त्रामध्ये समाजासाठी उपयुक्त मोठ्या संशोधनाची आवश्यकता असून त्यासाठी संशोधकांनी पुढे यावे, असे आवाहन उस्मानिया विद्यापीठातील डॉ.डी.अशोक यांनी केले.

शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत डॉ.डी.अशोक मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हेमंत जामकर होते. उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे डॉ.रवी सरोदे यांची उपस्थिती होती. यावेळी केशव दुधाटे, डॉ.वामन जाधव, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.रोहिदास नितोंडे, डॉ.सुभाष लोणकर यांची उपस्थिती होती.

विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे आयोजित मॉडर्न परस्पेक्टीव्हज इन केमीकल सायन्स रिसर्च या विषयावर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. समाजामध्ये सर्वसामान्य माणसांची मोठी संख्या आहे. त्यांच्या जीवनात उपयुक्त असणाऱ्या छोट्या आणि मोठ्या गोष्टीमध्ये संशोधन झाले पाहिजे. दैनंदिन जीवनात रसायनशास्त्र मोलाचे असून संशोधनामुळे जीवन, समाज, राष्ट्र प्रबळ बनू शकते. आज देशभरात विविध जीवनाश्यक तसेच अन्य वस्तूंच्या भेसळीची, पर्यावरण प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. ती वेळीच सोडविण्यासाठी रसायनशास्त्रात संशोधन झाले पाहिजे, असे विचार डी.अशोक यांनी मांडले.

रसायनशास्त्राचा संबंध हा जीवन जगण्याशीच नव्हे तर संपूर्ण विश्वाशी येतो. मोठ्या प्रमाणावर संशोधन झाल्यास शाश्वत विकासासह सर्व विश्वाला, माणसांना जगणे आनंददायी होवू शकेल, असे विचार डॉ.रवी सरोदे यांनी व्यक्त केले. रसायनशास्त्र अवघड आहे म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करू नका ते अत्यंत सोपे आहे. त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्या. त्यामुळे तेल, पेट्रोलियम, उद्योग आदी क्षेत्रात करिअर करता येते असेही डॉ.सरोदे यांनी सांगितले. डॉ.जाधव यांचेही यावेळी भाषण झाले.

डॉ. लोणकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. संशोधकांच्या शोधनिबंधाच्या सीडीचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रीय परिषदेत महाराष्ट्रासह विविध राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविशंकर झिंगरे यांनी केले. अतम टेकाळे यांनी आभार मानले.

समर्थ दिलासा

बुधवार, दि.३१ जानेवारी २०१८ पान नं.४

# रसायनशास्त्रात समाजासाठी उपयुक्त संशोधनाची गरज

## डॉ.डी.अशोक यांचे प्रतिपादन: शिवाजी महाविद्यालयात एक दिवशीय राष्ट्रीय परिषद, शास्त्रज्ञांची उपस्थिती

परभणी, दि.३०(प्रतिनिधी): रसायनशास्त्रामध्ये समाजासाठी उपयुक्त मोठ्या संशोधनाची गरज असून त्यासाठी संशोधकांनी पुढे यावे असे आवाहन उस्मानिया विद्यापीठातील डॉ.डी.अशोक यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत डॉ.डी.अशोक बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर हे होते. उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परिक्षा, मुल्यमापन संचालक डॉ.रवि सरोदे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर सदस्य केशव दुधाटे, अधिष्ठाता डॉ. वामनराव जाधव, परिषदेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, आयक्युएसीचे संचालक डॉ.रोहीदास नितोंडे परिषदेचे समन्वयक डॉ.सुभाष लोणकर यांची उपस्थिती होती. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे आयोजित मॉडर्न परस्पेक्टिव्हज इन केमिकल सायन्स रिसर्च या विषयावरील परिषदेत बोलताना डॉ.अशोक म्हणाले, समाजामध्ये सर्वसामान्य माणसांची मोठी संख्या आहे.



त्यांच्या जीवनात उपयुक्त असणाऱ्या छोट्या आणि मोठ्या गोष्टींमध्ये संशोधन झाले पाहिजे. दैनंदिन जीवनात रसायनशास्त्र मोलाचे असून संशोधनामुळे जीवन, समाज, राष्ट्र प्रबळ बनू शकते. आज देशभरात विविध जीवनावश्यक तसेच इतर वस्तुंच्या भेसळीची, पर्यावरण प्रदुषणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. ती वेळीच सोडविण्यासाठी रसायनशास्त्रात संशोधन झाले पाहिजे. यासाठी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी पुढे यावे.

रसायनशास्त्राचा संबंध हा जीवन जगण्याशीच आहे. तर संपुर्ण विश्वाशी येतो. मोठ्या प्रमाणावर संशोधन झाल्यास शाश्वत विकासासह सर्व विश्वाला, माणसांना जगणे आनंददायी होऊ शकेल असे प्रतिपादन डॉ.रवि सरोदे यांनी केले. रसायनशास्त्र अवघड आहे म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करू नका. ते अत्यंत सोपे आहे. त्याकडे जाणीवपुर्वक लक्ष द्या. यामुळे तेल, पेट्रोलियम, उद्योग आदी क्षेत्रात उत्कृष्ट करीअर करता येते. असा सल्ला डॉ.सरोदे यांनी दिला. यावेळी अधिष्ठाता डॉ.जाधव यांचेही भाषण झाले. प्रारंभी मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी सर्वांचे स्वागत केले. समन्वयक डॉ.लोणकर यांनी प्रास्ताविक केले. संशोधकांच्या शोधनिबंधांच्या सीडीचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेत राज्यासह विविध राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. सुत्रसंचलन प्रा.रविशंकर झिंगरे यांनी केले. प्रा.आत्तम टेकाळे यांनी आभार मानले.

देशोन्नती

बुधवार, दि.३१ जानेवारी २०१८

# रसायनशास्त्रात उपयुक्त संशोधनाची गरज - डॉ. अशोक

## शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद ■ संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा सहभाग



परभणी : राष्ट्रीय रसायनशास्त्र परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. अशोक, हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. जाधव व इतर.

**जिल्हा प्रतिनिधी** / ३० जानेवारी

**परभणी** : रसायन शास्त्रात समाजासाठी उपयुक्त मोठ्या संशोधनाची गरज असून त्यासाठी संशोधकांनी पुढे यावे, असे आवाहने उस्मानिया विद्यापीठातील डॉ. डी. अशोक यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयात मंगळवार ३० जानेवारी रोजी एक दिवशीय राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. या परिषदेत मार्गदर्शन करताना डॉ. डी.अशोक हे बोलत होते. यावेळी मंचावर हेमंतराव जामकर, मुल्यमापन संचालक डॉ. रवि सरोदे, केशव दुधाटे, डॉ. वामनराव जाधव, प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुभाष लोणकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. अशोक म्हणाले की, सामान्यांच्या जीवनात उपयुक्त वाटणाऱ्या छोट्या मोठ्या बाबींचे संशोधन झाले पाहिजे. संशोधनामुळे जीवन, समाज आणि पर्यायाने राष्ट्र प्रबळ बनते, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक डॉ. लोणकर यांनी सुत्रंसचालन प्रा.रविशंकर झिंगरे यांनी केले.

लोकमत औरंगाबाद, बुधवार, दि. ३१ जानेवारी २०१८

# समाजासाठी उपयुक्त संशोधनाची गरज-अशोक

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : रसायनशास्त्र या विषयामध्ये समाजासाठी उपयुक्त संशोधन करण्याची गरज निर्माण झाली असून, त्यासाठी संशोधकांनी पुढे यावे, असे आवाहन उस्मानिया विद्यापीठातील डॉ. डी. अशोक यांनी केले.

येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत डॉ. डी. अशोक बोलत होते. यावेळी स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, स्वारातीम विद्यापीठाचे डॉ. रवि सरोदे, केशव दुधाटे, डॉ. वामनराव जाधव, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुभाष लोणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. दैनंदिन जीवनात रसायनशास्त्र मोलाचे असून, संशोधनामुळे जीवन, समाज, राष्ट्र प्रबळ बनू शकते. आज देशभरात विविध जीवनावश्यक व इतर वस्तूंच्या भेसळीची, पर्यावरण प्रदूषण मोठी समस्या निर्माण झाली आहे. ती वेळीच सोडविण्यासाठी रसायनशास्त्रात संशोधन झाले पाहिजे, असे ते म्हणाले. परिषदे दरम्यान, डॉ. सरोदे, डॉ. जाधव यांचेही भाषण झाले. डॉ. लोणकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संशोधकांच्या शोध निबंधाच्या सिडीचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.



परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने आयोजित मॉडर्न परस्पेटिव्हज इन केमिकल सायन्स रिसर्च या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन करताना डॉ. डी.अशोक, डॉ. रवि सरोदे, हेमंतराव जामकर, डॉ. वामनराव जाधव, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, केशव दुधाटे, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुभाष लोणकर आदी.

पुढारी | बुधवार, ३१ जानेवारी २०१८

# परभणी फिल्म क्लबमध्ये दरवळला चाफ्याचा सुगंध

**परभणी : प्रतिनिधी**

कैझन पिक्चर्स परभणी, आरभाट फिल्म क्लब पुणे व श्री शिवाजी महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या परभणी फिल्म क्लबचे ९ वे पुष्प रविवारी शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाले. त्या निमित्ताने चाफा या लघुपटाच्या दिग्दर्शिका मानसी देवधर उपस्थित होत्या. याप्रसंगी प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव व महापौर मिनाताई वरपुडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



**परभणी :** उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना दिग्दर्शिका मानसी देवधर. समवेत प्राचार्य डॉ. जाधव, महापौर वरपुडकर, रवी पाठक.

परभणीतील रसिक प्रेक्षकांनी चाफा लघुपटास भरभरून दाद दिली. लघुपट सादरीकरणानंतर मानसी देवधर यांनी त्यातील कलात्मक बाबी मनोगताद्वारे व्यक्त केल्या. आपले विचार प्रकट करताना त्या म्हणाल्या, कलेमध्ये स्त्री पुरूष हा भेद नसतो. चांगले चित्रपट करण्यासाठी वांचन करणे व आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींचे अवलोकन करणे खूप गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या. प्रास्ताविक परभणी फिल्म क्लबचे रवि रमेश पाठक यांने केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वर्षा जोशी व आभार त्र्यंबक वडसकर यांनी मानले. यासाठी अतुल साळवे, ऋतुराज भोसले, आदर्श कवळीकर, सचिन टोमके, गजानन नालटे, ईश्वर पाटोळे, शुभम ऐडके, सौरभ कुरूंदकर, सोहम खिल्लारे आदींनी पुढाकार घेतला.

सकाळ
नांदेड, बुधवार
३१ जानेवारी २०१८

३



परभणी : कार्यक्रमाचे उद्घाटन करताना मानसी देवधर, महापौर मीना वरपुडकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, रवी पाठक आदी.

# 'चाफा' लघुपटाला दाद

**परभणी, ता. ३० (बातमीदार)** : कैझन पिक्चर्स, परभणी, आरभाट फिल्म क्लब, पुणे व श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू केलेल्या परभणी फिल्म क्लबचे ९ वे पुष्प रविवार (ता. २८) शिवाजी महाविद्यालय सभागृहात पार पडले. या वेळी रसिक प्रेक्षकांनी 'चाफा' लघुपटास भरभरून दाद दिली.

त्या निमित्ताने 'चाफा' लघुपटाच्या दिग्दर्शिका मानसी देवधर उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव व महापौर मीना वरपुडकर उपस्थित होते. लघुपटाच्या सादरीकरणानंतर मानसी देवधर यांनी लघुपटातील कलात्मक बाबी मनोगताद्वारे व्यक्त केल्या.

संवादाशिवाय फक्त चित्रभाषेच्या साह्याने एक चांगला लघुपट करता येऊ शकतो. याचा अनुभव रसिक प्रेक्षकांना चाफा बघून मिळाला. दिग्दर्शक मानसी देवधर यांच्या मनोगतानंतर प्रेक्षकांनी प्रश्न विचारून शंकाचे निरसन केले. फिल्म क्लबचे रवी रमेश पाठक यांनी प्रास्ताविक, तर वर्षा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. त्र्यंबक वडसकर यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी अतुल साळवे, ऋतुराज भोसले, आदर्श कवळीकर, सचिन टोमके, गजानन नालटे, ईश्वर पाटोळे, शुभम ऐडके, सौरभ कुरुंदकर, सोहम खिल्लारे आदींनी मेहनत घेतली.

दि.०१ फेब्रुवारी २०१८
गोदातीर समाचार

# रसायनशास्त्रात समाजसाठी उपयुक्त संशोधनाची गरज- डॉ. अशोक

**परभणी/प्रतिनिधी**

रसायनशास्त्रामध्ये समाजासाठी उपयुक्त मोठ्या संशोधनाची गरज असून त्यासाठी संशोधकांनी पुढे यावे असे आवाहन उस्मानिया विद्यापीठातील डॉ.डी.अशोक यांनी केले आहे.



श्री शिवाजी महाविद्यत्तलयात आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत डॉ.डी.अशोक बोलत होते. श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर अध्यक्षस्थानी होते. उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परिक्षा, मुल्यमापन संचालक डॉ.रवि सरोदे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर सदस्य केशव दुधाटे, अधिष्ठाता डॉ.वामनराव जाधव, परिषदेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, आयक्यूएसीचे संचालक डॉ.रोहिदास नितोंडे, परिषदेचे समन्वयक डॉ.सुभाष लोणकर यांची उपस्थिती होती.

विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे आयोजित मॉडर्न परस्पेक्टिव्हज इन केमिकल सायन्स रिसर्च' या विषयावरील परिषदेत बोलतांना डॉ.अशोक म्हणाले, समाजामध्ये सर्वसामान्य माणसांची मोठी संख्या आहे. त्यांच्या जीवनात उपयुक्त असणाऱ्या छोट्या आणि मोठ्या गोष्टीमध्ये संशोधन झाले पाहिजे. दैनंदिन जीवनात रसायनशास्त्र मोलाचे असून संशोधनामुळे जीवन, समाज, राष्ट्र प्रबळ बनू शकते. आज देशभरात विविध जीवनावश्यक तसेच इतर वस्तुंच्या भेसळीची, पर्यावरण प्रदुषणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. ती वेळीच सोडविण्यासाठी रसायनशास्त्रात संशोधन झाले पाहिजे. यासाठी संशोधन, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी पुढे यावे. रसायनशास्त्राचा संबंध हा जीवन जगण्याशीच नव्हे, तर संपूर्ण विश्वाशी येतो. मोठ्या प्रमाणावर संशोधन झाल्यास शाश्वत विकासासह सर्व विश्वाला, माणसांना जगणे आनंददायी होवू शकेल. असे प्रतिपादन डॉ.रवि सरोदे यांनी केले. रसायनशास्त्र अवघड आहे म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करु नका. ते अत्यंत सोपे आहे. त्याकडे जाणिवपूर्वक लक्ष द्या. यामुळे तेल, पेट्रोलियम, उद्योग आदी क्षेत्रात उत्कृष्ट करिअर करता येते असा सल्ला डॉ.सरोदे यांनी दिला. यावेळी अधिष्ठाता डॉ.जाधव यांचेही भाषण झाले.

प्रारंभी परिषदेचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी सर्वांचे स्वागत केले. समन्वयक डॉ.लोणकर यांनी प्रास्ताविक केले. संशोधकांच्या शोधनिबंधाच्या सीडीचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. या राष्ट्रीय परिषदेत महाराष्ट्रासह विविध राज्यातील प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रविशंकर झिंगरे यांनी केले. प्रा.आत्तम टेकाळे यांनी आभार प्रदर्शन केले. सायंकाळी परिषदेचा समारोप झाला.

समर्थ
दिलासा
गुरूवार, दि. १ फेब्रुवारी २०१८

# वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप व विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण

**परभणी, दि.३१(प्रतिनिधी):** श्री शिवाजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनास दि.३० जानेवारी पासून सुरूवात झाली असून समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम दि.दोन फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता होणार आहे.

अध्यक्षस्थानी केंद्रिय कार्यकारणी सदस्य, म.शि. प्र.मंडळ,औरंगाबाद हेमंतराव जामकर तर प्रमुख पाहुणे म्हणून विनोदी कथाकार डॉ.आनंद देशपांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय नखाते, प्रताप देशमुख, रामभाऊ घाडगे, स्वराज-सिंह परिहार, केशवराव दुधाटे, परमेश्वर जाधव, प्राचार्य एस.बी.बागल आदींची उपस्थिती राहणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.एन.एन. केशट्टी, डॉ.व्ही.एस.नांदापुरकर, उपप्राचार्य प्रा.ए.एन.डहाळे, प्रा.रविशंकर झिंगरे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.जयंत बोबडे, विद्यापीठ प्रतिनिधी गोपाळ परांडे, विद्यार्थी संसद अध्यक्ष प्रतिक्षा कदम, उपाध्यक्ष कुणाल जाधव आदींनी केले आहे.

**परभणी, दि.३१(प्रतिनिधी):** शहरातील मुख्य रस्त्यांवरील नारायण चाळ ते आरआर टॉवर दरम्यान वाहतुकीची कोंडी होत असल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे

परभणी Next
एकमत
परभणी, गुरुवार, ८ फेब्रुवारी २०१८/ पान ११

# विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने समस्यांना सामोरे जावे : डॉ. देशपांडे

**परभणीः प्रतिनिधी**

विद्यार्थी जीवन हा प्रत्येकाच्या आयुष्यातील सुर्वण काळ असतो. महाविद्यालयीन जीवनातील ज्ञानाची आणि अनुभवाची शिदोरीचं आत्मविश्वास निर्माण करत असते. मित्रहो, जग जिंकण्यासाठी सज्ज व्हा, असे प्रतिपादन डॉ. आनंद देशपांडे यांनी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात केले.

नुकताच श्री शिवाजी महाविद्यालयाचा स्नेहधारा -२०१८ हा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला, त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म.शि.प्र. मंडळाचे केंद्रिय सदस्य तथा स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर हे होते. प्राचार्य बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर, ए.एन. डहाळे, बी.व्ही. आंधळे, ए.टी. पतंगे तसेच विद्यार्थी संसदेचे सर्व प्रतिनिधी मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. देशपांडे म्हणाले की, कोणत्याही राष्ट्राच्या उभारणीत युवकांचा महत्वाचा वाटा असतो. मी याच महाविद्यालयातून घडलो, भगवान बुद्धाचा अत्त-दिप-भव हा संदेश मला महत्वाचा वाटतो. तो संदेश म्हणजे व्यक्तिमत्व विकासाचे सूत्र आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आनंदनगरी, निबंध स्पर्धा, काव्यवाचन, भित्तीपत्रक, रांगोळी, क्रीडास्पर्धा आदी स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. तसेच उत्तम वाचक, एनबीटीएल प्रमाणपत्र व गुणवंत खेळाडू यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. जाधव यांनी महाविद्यालयात पुढील वर्षी नाट्यशास्त्र विभाग सुरू करून युवकांना सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करू दिले जाणार असल्याची माहिती दिली. सूत्रसंचलन प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी केले, तर आभार डॉ. नितोंडे यांनी मानले.

लोकमत
परभणी
औरंगाबाद, गुरुवार, दि. २२ फेब्रुवारी २०१८

# २२५०० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

## बारावी परीक्षा : इंग्रजीच्या पेपरला सापडली नाही एकही कॉपी

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : बुधवारपासून जिल्ह्यात बारावीच्या परिक्षांना सुरुवात झाली असून, इंग्रजीच्या पहिल्याच पेपरला ८६७ विद्यार्थ्यांनी गैरहजेरी लावली. एकूण २२ हजार ५२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून, एकाही केंद्रावर पथकाला कॉपी सापडली नाही.

उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेला २१ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात ५५ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जात आहे. इंग्रजीच्या पेपरसाठी २३ हजार ३९० विद्यार्थी पात्र होते. त्यापैकी २२ हजार ५२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ८६७ विद्यार्थी अनुपस्थित राहिले.



परभणी शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर घेतलेले छायाचित्र.

दरम्यान, कॉपीला आळा घालण्यासाठी ५५ बैठे आणि ३५ भरारी पथके स्थापन झाली आहेत. बुधवारी एकाही केंद्रावर या पथकाला कॉपी आढळली नाही. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडू नये, यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला आहे.

दैनिक समर्थ
दिलासा
रविवार, दि. ११ फेब्रुवारी २०१८

# अनुभवाची शिदोरीच आत्मविश्वास निर्माण करते

## प्रा.डॉ.आनंद देशपांडे यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

परभणी, दि.१० (प्रतिनिधी): विद्यार्थी जीवन हा प्रत्येकाच्या आयुष्यातील सुवर्णकाळ असतो. महाविद्यालयीन जीवनातील ज्ञानाची व अनुभवाची शिदोरीच आत्मविश्वास निर्माण करत असते, असे प्रतिपादन प्रसिध्द साहित्यीक प्रा.डॉ.आनंद देशपांडे यांनी व्यक्त केले.

शिवाजी महाविद्यालयात आयोजित स्नेहधारा २०१८ या वार्षीक स्नेहसंमेलनात डॉ.देशपांडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर, ए.एन.डहाळे, बी.व्ही.आंधळे, ए.टी.पतंगे आदींची उपस्थिती होती.

डॉ.देशपांडे म्हणाले, कोणत्याही राष्ट्राच्या उभारणीत युवकांचा मोठा वाटा असतो. त्यामुळे महाविद्यालयीन जीवनात युवकांनी स्वतःचे व्यक्तीमत्व विकसीत करावे असे आवाहनही डॉ.देशपांडे यांनी केले. यावेळी आनंदनगरी, निबंध स्पर्धा, काव्यवाचन, भित्तीपत्रक, रांगोळी, क्रीडा स्पर्धा आदीं स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच उत्तम वाचक, एनबीटीएल प्रमाणपत्र, गुणवत्त खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. जाधव यांनी महाविद्यालयात पुढील वर्षी नाट्यशास्त्र विभाग सुरू करून युवकांना सांस्कृतिक व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. सूत्रसंचलन प्रा.रामप्रसाद देशमुख, डॉ.रोहिदास नितोंडे, प्रा.डॉ.जयंत बोबडे, प्रा.संतोष कोकीळ यांनी केले.

सकाळ

नांदेड, गुरुवार
८ मार्च २०१८

४

# आज 'गझलरंग' कार्यक्रम

परभणी, ता. ७ : (कै.) यशवंतराव चव्हाण यांच्या जंयतीनिमित्त यशवंतराव चव्हाण स्मृती समिती अंबाजोगाई, शब्दसह्याद्री प्रतिष्ठान परभणी व श्री शिवाजी महाविद्यालय आयोजित सुरेश भट गझलमंच पुणे प्रस्तुत मराठी गझलेचा 'गझलरंग' मुशायरा गुरुवारी (ता. आठ) सायंकाळी सहा वाजता श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित केला आहे. यात सुधीर मुळीक मुंबई, अमित वाघ, शशिकांत कोळी, सुहासिनी देशमुख, दास पाटील, इंद्रजित उगले, जयेश पवार, अरविंद सगर व प्रफुल्ल कुलकर्णी हे गझलकार सहभागी होणार आहेत. शाहीर सुरेशकुमार वैराळकर हे सूत्रसंचालन करणार आहेत. या वेळी हेमंत जामकर, कवी प्रा. इंद्रजित भालेराव, आसाराम लोमटे, विठ्ठल भुसारे, डॉ.रूपेश नगराळे, राहुल देशमुख, हेमंत राजेमाने उपस्थित राहणार आहेत. या वेळी उपस्थित राहावे, असे आवाहन केशव खटिंग, डॉ. बाळासाहेब जाधव, दगडू लोमटे, प्रा. डॉ. जयंत बोबडे यांनी केले आहे.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. १ मार्च २०१८

# 'शिवाजी' मध्ये निरोप समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** : येथील श्री शिवाजी महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने बीएस्सी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी २५ फेब्रुवारी रोजी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी डॉ. एस.एन. केशेट्टी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. पी.डी. भोपे, प्रा. आर.पी. झिंगरे, डॉ. एस.एम. यन्नोरकर, प्रा.आर.आर. मिस्त्री, प्रा. आर.एस. बड्डुरे, प्रा. एस.आर.मगर यांची उपस्थिती होती. ऐश्वर्या पाटील, सीमा कदम यांनी सूत्रसंचालन केले. तर भांगे यांनी आभार मानले.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. ८ मार्च २०१८ ४

# गझल, मुशायरा कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** :यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण स्मृती समिती अंबाजोगाई, शब्द सह्याद्री प्रतिष्ठान परभणी आणि शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने ८ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता सुरेश भट गझल मंच पुणे प्रस्तूत 'मराठी गझलेचा गझल रंग' हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात सुधीर मुळीक, अमित वाघ, शशिकांत कोळी, सुहासिनी देशमुख, दास पाटील, इंद्रजीत उगले, जयश पवार, अरविंद सगर, प्रफुल्ल कुलकर्णी, शाहीर सुरेशकुमार वैराळकर हे गझलकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमास मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे हेमंत जामकर, कवी प्रा. इंद्रजीत भालेराव, डॉ. आसाराम लोमटे, विठ्ठल भुसारे, डॉ. रुपेश नगराळे, राहुल देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती राहील. कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, दगडू लोमटे, प्रा. जयंत बोबडे आदींनी केले आहे.

पुण्य नगरी
गुरुवार, ८ मार्च २०१८ | परभणी- 

# यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त मराठी गझल मुशायरा

परभणी / प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण यांच्या १०५ जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाई येथील शब्दसह्याद्री प्रतिष्ठान व श्री शिवाजी महाविद्यालय आयोजित सुरेश भट गझल मंच पुणे प्रस्तुत मराठी गझलेचा गझलरंग मुशायरा गुरूवारी (दि.८) सायंकाळी ६.३० वा. शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात सुधीर मुळीक मुंबई, अमित वाघ (अकोला), शशिकांत कोळी (सातारा), सुहासिनी देशमुख (नांदेड), दास पाटील (तुळजापूर), इंद्रजित उगले (बीड), जयेश पवार (मुंबई), अरविंद सगर (परभणी) व प्रफुल्ल कुलकर्णी (नांदेड) हे गझलकार सहभागी होणार आहेत. शाहीर सुरेशकुमार वैराळकर हे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहेत. यावेळी हेमंत जामकर, इंद्रजित भालेराव, आसाराम लोमटे, विठ्ठल भुसारे, डॉ. रूपेश नगराळे, राहुल उर्फ मुन्ना देशमुख, हेमंत राजेमाने आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केशव खटींग, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, दगडू लोमटे, डॉ.जयंत बोबडे यांनी केले आहे.

पुढारी | गुरुवार, ८ मार्च २०१८

# परभणीत आज मराठी गझल मुशायरा

**परभणी : प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण यांच्या १०५ जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण स्मृती समिती अंबाजोगाई, शब्दसह्याद्री प्रतिष्ठान परभणी व श्री शिवाजी महाविद्यालय परभणी आयोजित सुरेश भट गझल मंच पुणे प्रस्तुत मराठी गझलेचा गझलरंग दर्जेदार मुशायरा दि. ८ मार्च रोजी श्री शिवाजी महाविद्यालयांच्या सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता आयोजित केला आहे.

यात सुधीर मुळीक (मुंबई), अमित वाघ (अकोला), शशिकांत कोळी (सातारा), सुहासिनी देशमुख (नांदेड), दास पाटील (तुळजापूर), इंद्रजित उगले (बीड), जयेश पवार (मुंबई), अरविंद सगर (परभणी) व प्रफुल्ल कुलकर्णी (नांदेड) हे गझलकार सहभागी होणार आहेत. शाहीर सुरेशकुमार वैराळकर हे सूत्रसंचालन करणार आहेत. यावेळी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य हेमंत जामकर, कवी प्रा. इंद्रजित भालेराव, साहित्यिक आसाराम लोमटे, शब्दसह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विठ्ठल भुसारे, डॉ. रूपेश नगराळे, मुन्ना देशमुख, हेमंत राजेमाने हे उपस्थित राहणार आहेत. रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन सचिव केशव खटिंग, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचिव दगडू लोमटे, प्रा. जयंत बोबडे, अक्षर मानव आदींनी केले आहे.

देशोन्नती गुरुवार, दि. १ मार्च २०१८

# श्री शिवाजी महाविद्यालयात निरोप समारंभ

शहर प्रतिनिधी / २८ फेब्रुवारी

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील भौतीकशास्त्र विभागाच्या वतीने बीएसस्सी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी भौतीकशास्त्र विभागप्रमुख तथा उपप्राचार्य डॉ. एस.एन. केशेट्टी तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.पी.डी. मोपे, प्रा. आर.पी. झिंगरे, डॉ.एस.एम. येनोरकर, प्रा.आर.आर. मिस्त्री, प्रा.आर.एस. बडुरे, प्रा.एस.आर. मगर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. बीएसस्सी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रा. मोपे यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा विकास कसा करावा व एक आदर्श नागरीक कसे होता येईल यावर विस्तृत असे मार्गदर्शन केले. डॉ. केशेट्टी यांनी नैतीकमुल्यांची जपणुक करत यश संपादन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. ऐश्वर्या पाटील, कु. सिमा कदम तर आभार मांगे या विद्यार्थ्याने मानले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती.

देशोन्नती बुधवार, दि. २८ फेब्रुवारी २०१८



**परभणी :** शिवाजी महाविद्यालय आणि पूणे येथील संस्थेच्यावतीने घेण्यात आलेल्या सी.ए. सराव परिक्षेत वैष्णवी अजमेरा जिल्ह्यात प्रथम आल्याबद्दल तिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव, समवेत उपप्राचार्य डहाळे, प्रा. मुंडे, प्रा. चव्हाण, प्रा. वाघमारे, पत्रकार सुरज कदम व इतर.

सकाळ
नांदेड, सोमवार
१२ मार्च २०१८
४

## 'शिवाजी'त विद्यार्थ्यांना निरोप

परभणी, ता. ११ : येथील श्री शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागात एम.ए. द्वितीय व बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून हिंदी विभागप्रमुख डॉ. एस. एल. राठोड, प्रा. डॉ. श्रीदेवी कडगे, प्रा. राजेश बड्डे उपस्थित होते. विभागप्रमुख प्रा. डॉ. टी. आर. फिसफिसे यांनी प्रास्ताविक केले, सुनील लहाने यांनी सूत्रसंचालन केले, विठुकाका भारती या विद्यार्थ्यानी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रा. व्ही. एम. सूर्यवंशी, प्रा. एस. बी. देशमुख, प्रा. अहिल्या अंजनडोहकर, प्रा. एस. ए. शेटे, प्रा. अर्चना बंग, प्रा. अनिल बडगुजर, प्रा. प्रवीण कदम यांनी पुढाकार घेतला.

लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि. ९ मार्च २०१८

## विद्यार्थ्यांना निरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र विषयातील द्वितीय पदव्युत्तर विद्यार्थी व पदवीच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना नुकताच निरोप दिला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ. एस.एल. राठोड, प्रा.डॉ.श्रीदेवी कडगे, प्रा. राजेश बड्डे आदींची उपस्थिती होती. यावेळी रामा साळवे, पूजा कदम, रामदास पवार, भाऊराव जुंबडे, कल्पना थोरात आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा.डॉ. टी.आर. फिसफिसे यांनी प्रास्ताविक केले.

पुण्य नगरी
शुक्रवार, २ मार्च २०१८ परभणी- हिंगोली

# अभ्यास सहल उत्साहात

परभणी / प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील पदवी आणि पद्व्युत्तर विद्यार्थ्यांची एकदिवसीय अभ्यास सहल नुकतीच पार पडली. यात औंढा, वाशिम, शेगाव या स्थळांना विद्यार्थ्यांनी भेट दिली. यात स्थळांचा इतिहास व महत्व विद्यार्थ्यांनी जाणून घेतले. शेगाव येथील आनंदसागरमधील नियोजन, व्यवस्थापन, स्वच्छता आदींविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. सहल यशस्वीतेसाठी तुकाराम फिसफिसे, व्ही.एम. सूर्यवंशी, रामदास पवार, विठू भारती, कल्पना थोरात, नेहा जाधव, कल्पना लहाने, जुमडे यांनी पुढाकार घेतला.

पुण्य नगरी
शुक्रवार, ९ मार्च २०१८ । परभणी

# श्री शिवाजी महविद्यालयात निरोप समारंभ

परभणी- येथील श्री शिवाजी महाविद्यायातील समाजशास्त्र विभागाच्या एम. ए. द्वितीय व बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते. प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. एस. एल राठोड, डॉ. श्रीदेवी कडगे, राजेश बडुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. टी. आर. फिसफिसे यांनी केले. यावेळी बी. ए. तृतीय वर्षाच्या रामा साळवे, पुजा कदम, शत्रुघ्न ढवळे, संतोष शितळे तसेच एम. ए. द्वितीय वर्षाच्या रामदास पवार, भाऊराव जुमडे, कल्पना थोरात आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील लहाने यांनी केले तर आभार विठूकाका भारती यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी व्ही. एम. सूर्यवंशी, एस. बी. देशमुख, अहिल्या अंजनडोहकर, शेट्टे, अर्चना बंग, अनिल बडगुजर, कदम आदींनी पुढाकार घेतला.

देशोन्नती शुक्रवार, दि. २ मार्च २०१८

# शिवाजी महाविद्यालयात मराठी भाषा दिन विविध उपक्रमांनी साजरा

*कार्यालय प्रतिनिधी/ १ मार्च*

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात कवीवर्य कुसुमाग्रज यांचा ज़न्म दिन मराठी भाषा गौरव दिन म्हणुन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, भितीपत्रक स्पर्धा घेण्यात आल्या. सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत मनोज कुलकर्णी, आरती तोरडमल, वामन ठेंगल यांनी अनुक्रमे प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक पटकावला. मातृभाषेचे महत्व व सोशल मिडीया व तरुणाई या विषयावरील निबंध स्पर्धेत अनघा झांबरे, आश्विनी चापके, मनोज कुलकर्णी यांनी अनुक्रमे प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक पटकाविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणुन मराठी विभाग प्रमुख डॉ. श्रीदेवी कडगे, हिंदी विभाग प्रमुख डॉ.एस.एल. राठोड, संगीत विभाग प्रमुख प्रा. सविता कोकाटे, डॉ. जयंत बोबडे, प्रा. कावेरी जाधव, प्रा. ऋतुजा वनकर यांची उपस्थिती होती. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काव्य गितांची सुरेल संगीतमय मैफिल रंगली. आभार प्रा. प्रल्हाद भोपे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा.डॉ. श्रीदेवी कडगे, प्रा. राजेश बडुरे यांनी परिश्रम घेतले.

सकाळ
नांदेड, शुक्रवार
२ मार्च २०१८
3

## 'संविधान' भित्तिपत्रकाचे प्रकाशन

परभणी, ता. १ : येथील श्री शिवाजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त समाजशास्त्र विभागातर्फे तयार केलेल्या भारतीय संविधान या भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, केशव दुधाटे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, डॉ. विजया नांदापूरकर यांच्यासह समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. टी. आर. फिसफिसे, प्रा. व्ही. एम. सूर्यवंशी, प्रा. अर्चना बंग, प्रा. अहिल्या अंजनडोहकर, प्रा. स्वाती देशमुख आदी उपस्थित होते. या भित्तिपत्रकाचे संपादन किरण जोशी, रामदास पवार, हरिभाऊ भारती, राम धुमाळे या विद्यार्थ्यांनी केले.

पुण्य नगरी
शुक्रवार, २३ मार्च २०१८ । परभणी

## बडुरे यांना पीएच.डी.

परभणी - येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापक आर.एस. बडुरे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने पीएच.डी पदवी प्रदान केली आहे. प्रा.बडुरे यांनी प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री जीवन : एक अभ्यास ' या विषयावर विद्यापीठाकडे शोध प्रबंध सादर केला होता.

6

दि. २३ मार्च २०१८
गोदातीर समाचार

## आर.एस.बडुरे यांना पीएच.डी.प्रदान

**परभणी**-येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागातील सहायक प्राध्यापक आर.एस.बडुरे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली. प्रा.बडुरे यांनी प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्रीजीवन:एक अभ्यास या विषयावर विद्यापीठाकडे प्रबंध सादर केला होता. प्रा.बडुरे यांच्या या यशाबद्दल स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख श्री.हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, ॲड.विजया नांदापुरकर, प्राध्यापक वर्ग व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि. २५ मार्च २०१८ ३

## बडुरे यांना पीएच.डी.

परभणी- येथील श्री शिवाजी



महाविद्यालयातील मराठी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक आर.एस. बडुरे यांना स्वारातीम विद्यापीठाने नुकतीच पीएच.डी. प्रदान केली आहे. प्रा. बुडरे यांनी प्राचार्य नागनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री जीवन : एक अभ्यास' या विषयावर विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला होता.

देशोन्नती शुक्रवार, दि.२३ मार्च २०१८

# थोडक्यात

## बडुरे यांना पीएचडी प्रदान

**परभणी :** येथील शिवाजी



महाविद्यालयातील मराठी विभागातील सहाय्यक प्रा. आर.एस. बडुरे यांना स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान करुन त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला आहे. प्रा. बडुरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री जीवन - एक अभ्यास या विषयावर विद्यापीठाला संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यांनी हा प्रबंध प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. हा प्रबंध विद्यापीठाने स्विकारुन त्यांना पीएचडी पदवी प्रदान केली आहे. प्रा. बडुरे यांच्या यशाबद्दल स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्राचार्य डॉ श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर, प्राध्यापक व इतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

पुण्यनगरी | गुरुवार, २९ मार्च २०१८ | परभणी

# रसास्वाद कार्यक्रम उद्या

परभणी - परभणी फिल्म क्लबच्या वतीने शुक्रवारी (दि.३०) सायंकाळी ६ वा. शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या चित्रपट रसास्वाद कार्यक्रमा अंतर्गत पुरस्कार प्राप्त माहितीपट 'बबई'चे सादरीकरण होणार आहे. कैझन पिक्चर्स परभणी, अरभाट फिल्म क्लब पुणे, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात आलेल्या परभणी फिल्म क्लबच्या ११ वा चित्रपट रसास्वाद कार्यक्रम आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. फौजिया खान, प्राचार्य डॉ.बी.यू. जाधव तसेच बबईचे दिग्दर्शक कविता दातीर व अमित सोनावणे उपस्थीत राहणार आहेत. कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन परभणी फिल्म क्लबचे रवी रमेश पाठक यांनी केले आहे.

सकाळ
नांदेड, सोमवार
२६ मार्च २०१८
४

# ग्रंथमहोत्सवातूनच वाचन संस्कृतीची चळवळ गतिमान

## खासदार संजय जाधव : जिल्हास्तरीय ग्रंथ महोत्सावाचे उद्‌घाटन

**परभणी, ता. २५ (बातमीदार) :** ग्रंथ हेच मानवाचे जीवन समृद्ध करतात. तर ग्रंथमहोत्सवातूनच वाचन संस्कृतीची चळवळ गतिमान होते, असे प्रतिपादन खासदार संजय जाधव यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात शनिवारी (ता. २४) जिल्हा परिषद राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय ग्रंथोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. पी. पृथ्वीराज, जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा भावना नखाते, शिक्षणाधिकारी बी. आर. कुंडगीर, प्राचार्या डॉ. बाळासाहेब जाधव, उपशिक्षणाधिकारी नासेरखान, माधव सलगर, विठ्ठल भुसारे, गटशिक्षणाधिकारी संतोष राजूरकर, शिक्षण विस्तार अधिकारी सतीश निरुपणे, गणराज यरमळ, मुख्याध्यापक अनंत पांडे, जिल्हा शिक्षण संवर्धन मंडळाचे अध्यक्ष गणेश शिंदे, बबन आव्हाड, राजेंद्र गहाळ, शिवदास पोटे, अण्णा जगताप यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी बी. पी. पृथ्वीराज म्हणाले, ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन व नैतिक संवर्धन होते. या वेळी ग्रंथदिंडी काढण्यात आली तसेच ग्रंथदालनाचे मान्यवरांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. श्री. कुंडगीर यांनी प्रास्ताविक, तर श्री. भुसारे यांनी सूत्रसंचालन केले. सारिका गिरी यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी सुनील खांडवीकर, संजय पेडगावकर, सुरेश हिवाळे, नवनाथ जाधव, सुभाष ढगे, गणेश शिंदे, भरतकुमार लाड, मनीषा नागरगोजे यांनी पुढाकार घेतला.



परभणी : जिल्हास्तरीय ग्रंथ महोत्सावाचे शनिवारी उद्‌घाटन करताना खासदार संजय जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. पी. पृथ्वीराज, भावना नखाते, बी.आर. कुंडगीर, प्राचार्य बाळासाहेब जाधव.

॥ दिनांक : २७ मार्च २०१८ ॥ वार : मंगळवार ॥ पान ६

झुंजार नेता

# प्रा.वृषाली फुके यांना पीएचडी प्रदान

परभणी(प्रतिनिधी)दि.२७:– येथील श्री शिवाजी महाविदयालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख व सहाय्यक प्राध्यायपक सौ.वृषाली लक्ष्मीकांत फुके यांना स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विदयापीठाने पीएचडी पदवी प्रदान करुन त्यांच्याच संशोधन कार्याचा गौरव केला आहे. प्रा.फुके यांनी भारतीय लोकशाहीचे सुदृढीकरण आणि माहितीचा अधिकार : एक अभ्यापस विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयावर विदयापीठाला संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यां नी हा प्रबंध प्रा.डॉ. डी आर भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केला. हा प्रबंध विदयापीठाने स्विकारुन त्यांणना पीएचडी पदवी प्रदान केली आहे. प्रा. फुके यांच्या यशाबद्दल स्थारनिक नियामक मंडळाचे प्रमुख श्री हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर, प्राध्यायपक व इतर कर्मचारी यांनी त्यां चे अभिनंदन केले आहे.

देशोन्नती परभणी - मंगळवार, दि. २७ मार्च २०१८

# थोडक्यात

## प्रा. वृषाली फुके यांना पीएचडी प्रदान



**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविदयालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक सौ. वृषाली लक्ष्मीकांत फुके यांना स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विदयापीठाने पीएचडी पदवी प्रदान करुन त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला आहे. प्रा.फुके यांनी 'भारतीय लोकशाहीचे सुदृढीकरण आणि माहितीचा अधिकार : एक अभ्यास' विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयावर विद्यापीठाला संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यांनी हा प्रबंध प्रा.डॉ. डी आर भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केला. हा प्रबंध विदयापीठाने स्विकारुन त्यांना पीएचडी पदवी प्रदान केली आहे. प्रा. फुके यांच्या यशाबद्दल स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख श्री हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर, प्राध्यापक व इतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सकाळ
नांदेड, मंगळवार
२७ मार्च २०१८
परभणी

# प्रा. फुके यांना पीएच.डी. प्रदान

परभणी, ता. २६ : येथील श्री शिवाजी महाविदयालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख व सहायक प्राध्यापक वृषाली लक्ष्मीकांत फुके यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान करुन त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला आहे. प्रा. फुके यांनी 'भारतीय लोकशाहीचे सुदृढीकरण आणि माहितीचा अधिकार : एक अभ्यास' विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयावर विदयापीठाला संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यांनी हा प्रबंध प्रा. डॉ. डी. आर. भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. हा प्रबंध विद्यापीठाने स्वीकारून त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

सामना परभणी

६ | बुधवार, दि. २८ मार्च २०१८

## प्रा. वृषाली फुके यांना पीएच.डी.



*परभणी :* येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख व सहायक प्राध्यापक वृषाली लक्ष्मीकांत फुके यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान करून त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला आहे. प्रा. फुके यांनी 'भारतीय लोकशाहीचे सुदृढीकरण आणि माहितीचा अधिकार : एक अभ्यास' विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयावर प्रा. डॉ. डी. आर. भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. प्रा. फुके यांच्या यशाबद्दल स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, प्राध्यापक व इतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

लोकमत औरंगाबाद, बुधवार, दि. २८ मार्च २०१८ ४

## वृक्षाली फुके यांना पीएच.डी.

लोकमत न्यूज नेटवर्क



**परभणी:** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख वृक्षाली लक्ष्मीकांत फुके यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. प्रदान केली आहे.

प्रा.फुके यांनी 'भारतीय लोकशाहीचे सदृढीकरण आणि माहितीचा अधिकार: एक अभ्यास, विशेष संदर्भ परभणी जिल्हा' या विषयावर विद्यापीठाला शोध प्रबंध सादर केला होता. त्यांनी हा प्रबंध प्रा.डॉ. डी.आर. भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला.

6

पुण्य नगरी

मंगळवार, २७ मार्च २०१८ परभणी- हिंगोली

## फुके यांना पीएच.डी.

परभणी - येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक वृषाली लक्ष्मीकांत फुके यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली. फुके यांनी भारतीय लोकशाहीचे सुदृढीकरण आणि माहितीचा अधिकारः एक अभ्यास विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयावर विद्यापीठाला संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यांनी हा प्रबंध प्रा. डॉ. डी.आर.भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला.

बुधवार, दिनांक २८ मार्च २०१८

पुरोगामी विचाराचे एकमत

## विभागप्रमुख फुके यांना पीएच.डी.

परभणी - येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक वृषाली लक्ष्मीकांत फुके यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली. फुके यांनी भारतीय लोकशाहीचे सुदृढीकरण आणि माहितीचा अधिकारः एक अभ्यास विशेष संदर्भ परभणी जिल्हा या विषयावर विद्यापीठाला संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यांनी हा प्रबंध प्रा.डॉ. डी.आर.भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला.

सकाळ Today | २
नांदेड, मंगळवार, २२ मे २०१८



परभणी : येथील शिवाजी महाविद्यालयात १९९६ च्या बॅचच्या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात २१ वर्षांनंतर एकत्र आलेले मित्र-मैत्रिणी.

# वर्गमित्रांनी दिला आठवणींना उजाळा

**परभणी, ता. २१ (बातमीदार) :** श्री शिवाजी महाविद्यालयातील १९९६ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळा रविवारी (ता. २०) महाविद्यालयात घेण्यात आला. या वेळी माजी विद्यार्थ्यांनी आठवण म्हणून महाविद्यालयाच्या प्रांगणात लावण्यासाठी रोपे दिली. या वेळी जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

या वेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य किसन चोपडे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, प्रा. आर. टी. देशमुख, प्रा. पी. एन. मोरे, प्रा. रविशंकर झिंगरे यांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले, माजी विद्यार्थी हे महाविद्यालयाची संपत्ती असून सामाजिक, शैक्षणिक उपक्रमासाठी त्यांनी एकत्र यावे. दरम्यान, प्रा. सावित्री हरदास-चिताडे, प्रा. पी. एन. डाके, प्रा. रोहिदास नितोंडे, प्रा. यशवंत घारे या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. जया तुरूकमाने, सुदाम चव्हाण, रंजना भालेराव या माजी विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. गोपाळ नगरसाळे यांनी प्रास्ताविक केले. सुरेश हिवाळे यांनी सूत्रसंचालन आणि आभार मानले. विलास जैन, वागेश पोपडे, बाळासाहेब काळे, हिरालाल देवतवाल, प्रा. रामप्रसाद देशमुख, सुनील डाके, अण्णासाहेब सोनवणे, अनिल मोरे, अरुण झांबरे, दीपाली काळे, विद्या मालेवार, विद्या गायकवाड यांनी यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. २२ मे २०१८ | ४

**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयात उपक्रम; जुन्या आठवणींत हरवून गेले सोबती...

# स्नेहमेळाव्यात २१ वर्षांनी भेटले वर्गमित्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील १९९६ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा नुकताच स्नेह मेळावा घेण्यात आला. तब्बल २१ वर्षांनंतर वर्गमित्र, मैत्रिणींनी एकत्र येत जुन्या आठवणी ताज्या केल्या.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात २० मे रोजी हा स्नेह मेळावा पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य किशन चोपडे, डॉ.श्रीनिवास केशेट्टी, प्रा.यशवंत घारे, प्रा.पी.एन.डाके, प्रा.सावित्री हरदास-चिताडे, प्रा.आर.टी. देशमुख, प्रा. पी.एन. मोरे, प्रा. रविशंकर झिंगरे, प्रा. रोहिदास नितोंडे आदींची उपस्थिती होती. २१ वर्षानंतर ५५ वर्गमित्र एकत्र आल्याने त्यांच्या चेहऱ्यावर भेटीचा आनंद ओसंडून वाहत होता. सर्व माजी विद्यार्थ्यांनी यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण केले. महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे, होतकरू विद्यार्थ्यांना दत्तक घेणे असा उपक्रम राबविण्याचे यावेळी ठरविण्यात आले. जया तुरुकमाने, सुदाम चव्हाण, रंजना भालेराव या माजी विद्यार्थ्यांनी प्राथमिक स्वरुपात मनोगत व्यक्त केले. गोपाळ नगरसाळे यांनी प्रास्ताविक केले. सुरेश हिवाळे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विलास जैन, वागेश पोपडे, बाळासाहेब काळे, हिरालाल देवतवाल, प्रा.रामदास देशमुख, सुनील डाके, अण्णासाहेब सोनवणे, अनिल मोरे, अरुण झांबरे, दीपाली काळे, विद्या मालेवार, विद्या गायकवाड आदींनी प्रयत्न केले.



परभणी येथे श्री शिवाजी महाविद्यालयात पार पडलेल्या स्नेहमेळाव्याच्या प्रसंगीचे छायाचित्र.

## कार्यसंस्कृती जोपासा - चोपडे

◆ बदलत्या काळाबरोबर चालताना खऱ्या विकासासाठी कार्य संस्कृती जोपासा, असे आवाहन उपप्राचार्य किसन चोपडे यांनी केले. सोशल मीडियाचा सकारात्मक वापर करुन आपले सामाजिक उत्तरदायित्व योग्य रीतीने पार पाडत असताना नागरिकांच्या कर्तव्याची जाणीवही सतत मनात प्रज्वलित राहू द्या, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमात प्राचार्य बाळासाहेब जाधव यांनीही मार्गदर्शन केले.

सकाळ
नांदेड, शुक्रवार
९ मार्च २०१८

# जुनी इमारत पाडण्यासाठी निविदा

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथील मुलांचे वसतिगृह जुनी इमारत अंदाजे १६०० स्क्वे. मी. असुन छत व भिंतीसह पाडणे आहे. सदरील इमारत तोडून निघालेल्या मलब्याचे योग्यप्रकारे विल्हेवाट लावणे याकरिता मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून छत भिंतीसह पाडून मलबा महाविद्यालयास आवश्यक तेवढा परिसरात टाकणे व उर्वरित घेऊन जाण्यासह आपले निविदा दरपत्रक जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या आठ दिवसाच्या आत खालील पत्यावर सादर करावे.

**निविदा पाठविण्याचा पत्ता**

**प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, वसमतरोड, परभणी.**

**दूरध्वनी क्र. (०२४५२) २२६०८५, ९४२३४४२६६७**

**नियम :** (१) बांधकाम पाडणे व मलबा घेऊन जाणे / फुटींगासह कॉंक्रीट काढून घेऊन जाण्याचे दरपत्रक देणे. (२) निघालेले साहित्य जसे दरवाजे, चौकटी, खिडक्या, फरशी, गज /स्टील इत्यादी बांधकाम साहित्याचे खरेदी दरपत्रक देणे. (३) निघालेला मलबा काही प्रमाणात महाविद्यालयास आवश्यक असल्यास त्या ठिकाणी भरती करून देणे. (४) निविदा दरपत्रक मान्य करण्याचा अधिकार राखीव ठेवण्यात आलेला आहे. (५) मान्यताप्राप्त ठेकेदारांनी सदरील इमारतीची पाहणी करून निविदा दरपत्रक सादर करावे.

स्वाक्षरित/-
प्राचार्य